**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत**

**देण्यात आलेले प्रस्ताव**

**सभापती** : माझ्याकडे माननीय सदस्यांकडून नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव देण्यात आलेले आहेत. यामध्ये पहिला प्रस्ताव सकाळी 9.10 वाजता देण्यात आलेला आहे. तो माननीय सदस्य सर्वश्री दीपक सावंत, कपिल पाटील, अरविंद सावंत यांचा आहे. दुसरा प्रस्ताव सकाळी 9.20 वाजता देण्यात आलेला आहे. तो माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, दीपक सावंत, मधुकर चव्हाण यांचा आहे. नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ दोन-दोन मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडण्याची माननीय सदस्यांना मी संधी देतो. प्रथम माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आपले म्हणणे मांडावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये महाविद्यालयीन प्रवेशाच्या संदर्भात चर्चा करण्याकरिता प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी प्रस्ताव दिलेला आहे. आज मुंबई आणि महाराष्ट्रामधील 11 वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची समस्या अतिशय हलाखीची झ ाालेली आहे. 80 ते 85 टक्के मार्क्स मिळवून देखील विद्यार्थी महाविद्यालयीन प्रवेशाच्या प्रतिक्षेमध्ये आहेत. दुसरी गोष्ट अशी की, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी विद्यार्थ्यांनी चांगले मार्क्स मिळविल्यामुळे कट ऑफ परसेंटेज 2 टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत. त्यांना आपल्या पसंतीचे कॉलेज मिळत नाही. सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. परीक्षेचे वाढते आक्रमण एस.एस.सी. बोर्डवर सुरु झाले आहे. या दोनही बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी जास्त मार्क मिळविले आहेत. तसेच, एस.एस.सी. परीक्षेत गणितामध्ये 30 मार्क्स जास्त दिल्यामुळे 80 टक्के रिझ ल्ट लागला व त्यामुळेही प्रवेशाचे कट ऑफ परसेंटेज 2 टक्क्यांनी वाढले आहे. सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई.च्या 8 हजार विद्यार्थ्यांनी मुंबईमधील चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. दीपक सावंत...

घेतल्यामुळे त्यांची संख्या वाढली आहे. मुंबईमधील उपलब्ध महाविद्यालयामधील प्रवेश संख्या 1 लाख 30 हजार आहे. यामध्ये सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. चे 10 हजार विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांपेक्षा गुणवत्तेमध्ये पुढे आहेत. त्यामुळे आज

चांगले मार्क मिळविलेल्या 23 हजार विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या कॉलेजमध्ये प्रवेश देणे शक्य नाही. 23 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल असे शासन सांगत असले तरी 11 वी आणि 12 वी च्या ज्युनिअर कॉलेजमध्ये...

**सभापती** : प्रस्ताव कां स्वीकारण्यात यावा ? याबाबत आपले म्हणणे थोडक्यात मांडण्यास मी आपणास परवानगी दिलेली आहे, प्रस्तावावर सविस्तर बोलण्यास परवानगी दिलेली नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी फक्त एकच मुद्दा मांडतो. शासनाकडून सांगितले जाते की, आमच्याकडे 23 हजार प्रवेश क्षमता उपलब्ध आहे. मुळात आज 23 हजार जागा अस्तित्वातच नाहीत. सर्व मोठ-मोठया कॉलेजमधून जागा भरल्या गेल्या आहेत. आज 80 टक्के डिग्री कॉलेज आहेत, बाकीचे 300 ज्युनिअर कॉलेज आहेत. त्याठिकाणी फक्त 11 वी आणि 12 वीपर्यंत प्रवेश उपलब्ध आहे. त्यामुळे 13 वी आणि 14 वीला काय करावयाचे ? असा प्रश्न पालकांच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे. अशाप्रकारे या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेशाच्या निर्माण झालेल्या ज्वलंत प्रश्नावर चर्चा करण्याकरिता आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा, आणि सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवण्यात यावे अशी मी विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, या वर्षी विद्यार्थ्यांच्या शालेय प्रवेशासंदर्भात दोन महत्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. आजपर्यंत मोठया महानगरांमध्ये विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन प्रवेशाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. परंतु या वर्षी तासगाव सारख्या लहान शहरामध्ये सुध्दा 300 हून अधिक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित झाले आहेत. शहरी भागातील महाविद्यालयीन प्रवेशाच्या समस्येमध्ये हा एक मुद्दा समाविष्ट झालेला आहे. आज सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. सारख्या केंद्रीय बोर्डामार्फत चांगल्या मार्कांनी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पुढे गेल्यामुळे सी.ई.टी. व इतर महत्वाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील बहुजन समाजातील, ग्रामीण भागातील गरीब मुले पिछाडीवर आहेत. त्यामुळे आपल्या एस.एस.बी. बोर्डाच्या अभ्यासक्रमाबद्दल आणि परीक्षेच्या मूल्यांकनाबद्दल गंभीर मुद्दा निर्माण झाला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (पुढे सुरु...

केंद्रीय बोर्ड आणि अन्य बोर्डांच्या तुलनेत राज्याच्या बोर्डाच्या समान दर्जाबद्दल मुलांमध्ये आणि पालकांमध्ये शंका निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमध्ये प्रवेशाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. तेव्हा प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून यावर चर्चा करणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. सीबीएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा 500 गुणांची असते आणि आपल्या एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ही 750 गुणांची असते. त्यामुळे एसएससी बोर्डाच्या गुणवत्ता यादीत पहिली आलेली मुंबईतील मुलगी प्रवेशाच्या यादीत दहाव्या क्रमांकावर गेलेली आहे. अनेक विद्यार्थी आज अकरावीच्या प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत, यामुळे पालक अतिशय त्रस्त झालेले आहेत. दहावीच्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना 85 टक्के गुण मिळूनही चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळू शकत नाही. यामुळे विद्यार्थी आणि पालक चिंताग्रस्त झालेले आहे. कॉलेजमध्ये जागा नाहीत अशातला भाग नाही परंतु वाईट एका गोष्टीचे वाटते की, माझा कोटा आहे, मी प्रवेश मिळवून देतो, असे सांगून प्राध्यापक अकरावी सायन्स शाखेला प्रवेश मिळवून देण्याकरिता 25 ते 50 हजार रुपयापर्यन्त मागणी करतात. हा गंभीर प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आजचा प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घडवून आणावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशाचा मुद्दा समोर आलेला आहे. भाषिक अल्पसंख्यांची कॉलेजेस आहेत, त्या ठिकाणी इतर समाजाच्या मुलांना प्रवेश मिळू शकत नाही. सिंधी भाषिक कॉलेज असेल तर त्या ठिकाणी सिंधी विद्यार्थ्यांना 50 टक्के आरक्षण आहे, गुजराती भाषिक संस्थेचे कॉलेज असेल तर त्या ठिकाणीही 50 टक्के गुजराती विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. घटनेतील आर्टिकल 30 चा आधार घेऊन अल्पसंख्यांक कालेजेस प्रवेश प्रक्रिया करतात. त्यामुळे इतर समाजातील मुले मागे रहातात. या अल्पसंख्यांक कॉलेजांसाठी देखील राज्य सरकारमार्फत सरकारी सुविधा दिल्या जातात, त्यांना वीज, जमिनीमध्ये सवलत मिळते, परंतु त्या कॉलेजमध्ये बाकीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून याचा विचार केला पाहिजे असे मला वाटते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना अकरावीमध्ये प्रवेश मिळण्याच्या संबंधात प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाशी शासन पूर्णपणे सहमत आहे. दहावीचा निकाल चांगला लागल्यामुळे अनेक शहरांमधील कॉलेजेसमध्ये अकरावीच्या तुकड्या कमी पडतात. ग्रामीण भागामध्येसुध्दा अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे शहरामधील चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून विद्यार्थ्यांची मागणी असते. आजपर्यन्तचा अनुभव पाहिला तर काही कॉलेजमध्ये प्रवेश नाकारला जातो, त्याचबरोबर इतरही कॉलेजेसमधील जागा रिकाम्या रहातात. स्वत: पालकांचा चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा, असा नेहमीच आग्रह असतो. तालुक्यातील, जिल्ह्यातील एकूण किती विद्यार्थी पास झालेले आहेत, अकरावीमध्ये प्रवेश देण्यासाठी त्या शहरामध्ये एकूण कॉलेजमधील जागांची संख्या किती आहे ? शिल्लक रहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणामध्ये आणखी किती तुकड्या वाढवाव्या लागतील, याचा अंदाज घेण्याचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. कोणतेही विद्यार्थी प्रवेशाशिवाय रहाणार नाहीत या दृष्टीने तुकड्या वाढविण्याची भूमिका शासनामार्फत स्वीकारली जाईल. किती तुकड्या वाढविल्या पाहिजेत याचा अंदाज घेतल्यानंतर त्यांना मान्यता देण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यापूर्वी चार बैठका झाल्या. 15 दिवसापासून आम्ही या प्रवेशाच्यादृष्टीने आग्रही आहोत. परंतु अजूनही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही. या संबंधाने आपण निर्देश द्यावेत.

श्री.कपिल पाटील : केवळ प्रवेशाचाच प्रश्न नाही. सीबीएससी, आयसीएसई च्या विद्यार्थ्यांना सीईटीमध्ये अधिक गुण मिळतात आणि ते पुढे जातात. तामिळनाडू, केरळ राज्याने सीईटी परीक्षा रद्द केलेली आहे, त्यामुळे त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना संरक्षण मिळालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड....

श्री. कपिल पाटील ...

महाराष्ट्रातील मुलांचे संरक्षण करावयाचे असेल तर यादृष्टीने सर्वंकष चर्चा करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सरकारने पावले उचलली पाहिजेत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सी.ई.टी.च्या बाबतीत केरळ आणि तामीळनाडू राज्यांनी आपल्या राज्यातील मुलांच्या हितासाठी ज्या भूमिका स्वीकारलेल्या आहेत, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जे मार्ग अवलंबिले आहेत त्याचा अभ्यास केला जाईल आणि महाराष्ट्रातील मुलांच्या हिताचे संरक्षण करण्याची भूमिका राज्य सरकारमार्फत स्वीकारली जाईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण यासंदर्भात निदेश द्यावेत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी जो आणखी एक प्रश्न गांभीर्याने उपस्थित केला गेला त्याची गांभीर्याने नोंद घेऊन "पैसे द्या, अकरावीला प्रवेश देऊ" असे जर काही प्राध्यापक सांगत असतील आणि त्याबाबत स्पेसिफिक तक्रारी दिल्या तर त्यांची पोलिसामार्फत चौकशी केली जाईल आणि त्यात थोडे जरी काही आढळून आले तर अशा प्राध्यापकांवर, प्राचार्यांवर गुन्हे नोंद करण्यात येतील आणि संस्था चालकांना सुध्दा जबाबदार धरण्यात येईल.

**सभापती** : ज्या विषयाच्या अनुषंगाने नियम 289 अन्वये हा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी दिलेला आहे तो विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दाखविलेल्या कामकाजामध्ये नसल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा प्रस्ताव मी नाकारीत आहे. परंतु या अनुषंगाने मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना सांगेन की, त्यांनी आज किंवा उद्यापर्यंत इयत्ता 11वीच्या प्रवेशाच्या अनुषंगाने जी वस्तुस्थिती आहे त्याबाबत निवेदन करावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबत आजच निवेदन करण्यात येईल.

**सभापती** : नियम 289 अन्वये दिलेल्या या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, डॉ. दीपक सावंत तसेच श्री. अरविंद सावंत यांनी दुसऱ्या एका प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा त्याचा उल्लेख केलेला आहे. या अनुषंगाने सर्वंकष चर्चा करण्याकरिता काय करता येईल याबाबतीत आपल्याबरोबर चर्चा करुन मी वेगळा निर्णय घेईन.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

यानंतर नियम 289 अन्वये दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत व मधुकर चव्हाण यांनी दिलेला आहे. हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो याबाबत सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये आपल्याला एक सूचना दिलेली आहे. या सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी विनंती मी माझ्या सूचनेत केलेली आहे. ज्याअर्थी राज्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मालकीच्या जमीन खरेदी-विक्री गैरव्यवहाराची स्फोटक माहिती उघडकीस आलेली आहे, ज्याअर्थी वक्फ मंडळाने औरंगाबाद येथील एम.पी. कॉलेज जवळील 14 एकर जमीन निर्माण भारती लँडमार्क प्रा. लि. या कंपनीस देण्यात आली आहे ज्या कंपनीचे संचालक माननीय मुख्यमंत्री महोदयांचे भाऊ आहेत, आणि, ज्याअर्थी, नांदेड येथील मौजे वाजेगांव येथील वक्फ सेवा ईनामी जमीन 22 एकर 23 गुंठे एवढी जागा अगदी अल्प दरामध्ये श्री. भास्करराव खतगावकर यांच्या नावे विकल्याचे उघडकीस आले आहे, आणि, ज्याअर्थी, केज, जिल्हा बीड येथील 10 एकर जमीन वक्फ मंडळाकडून फक्त 10 लाखात राज्यातील एका मंत्र्यांच्या संस्थेला विकण्यात आल्याचे प्रसिध्द झालेले आहे. यावरुन राज्यामध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणामध्ये....

**सभापती** : हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो एवढ्या मर्यादेपर्यंत आपले म्हणणे मांडावे. मी जर प्रस्तावाला परवानगी दिली तर मग अन्य जे काही मुद्दे असतील ते सांगावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दिलेल्या सूचनेमध्ये हे सर्व लिहिलेले आहे. वक्फ मंडळाच्या हजारो एकर जमिनी अतिशय अल्प दरामध्ये या राज्यातील अनेक मंत्र्यांनी लाटलेल्या आहेत अशा बातम्या आलेल्या आहेत. त्यामुळे या राज्य सरकारबद्दल आणि एकंदर या राज्याबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. वक्फ बोर्डाला ज्या जमिनी दिल्या जातात त्यामध्ये परमेश्वराला, अल्लाला स्मरुन धार्मिक भावनेने सर्व मुस्लीम पुण्याचे काम म्हणून आपल्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर ......

जमिनी दान देतात त्याला आपण वक्फ म्हणतो. अशा जमिनी लाटण्याची प्रकरणे या राज्यामध्ये झालेली असतील तर मुस्लीम समाजाच्या श्रध्देवर घाला घालण्याचे काम हे सरकार करीत आहे. याबाबत राज्यामध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न असल्यामुळे सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या सभागृहामध्ये सर्वप्रथम या विषयाची चर्चा झाली पाहिजे अशा पध्दतीची नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. त्याला आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

----

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्रातील एका ज्वलंत प्रश्नासंबंधी या सदनामध्ये तातडीने चर्चा व्हावी यासाठी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी अशा प्रकारचा प्रस्ताव आमच्या सर्व विरोधी पक्षातर्फे देण्यात आलेला आहे. या संदर्भातील संपूर्ण चर्चा तातडीने होणे आवश्यक आहे. या चर्चेसाठी आपण वेळ द्याल. परंतु ही चर्चा आजच व्हावी अशी आमची आग्रहाची मागणी आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने अनेक व्यक्तींची नावे पुढे येण्याची शक्यता आहे. या व्यक्ती सदनाच्या बाहेरच्या असत्या तर गोष्ट निराळी होती. या सदनाचे आमदार म्हणून काम करणा-या काही व्यक्तींची नावे यामध्ये गुंतलेली आहेत. त्यामुळे याबाबतीत योग्य ती नोटीस द्यावी अशा प्रकारची मागणी कदाचित होईल. हे प्रकरण बहुतांशी चर्चेमध्ये आहे. ख-या अर्थाने अधिवेशनाचा आजचा पहिला दिवस आहे. काल जरी अधिवेशन सुरु झाले असले तरी काल शोकप्रस्ताव घेण्यात आला होता. अन्यथा कालच आम्ही हा प्रस्ताव दिला असता. तेव्हा आज या विषयावर चर्चा व्हावी म्हणून आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सभापती महोदय, धर्माच्या जमिनींवर अतिक्रमण करुन त्यांचा बाजार मांडण्याची प्रवृत्ती काही लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. त्याला शह देण्यासाठी या प्रस्तावावर चर्चा होणे गरजेचे आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. म्हणून या प्रस्तावावर तातडीने चर्चा होणे आवश्यक असल्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : महाराष्ट्र राज्यातील वक्फ जमिनींचे संरक्षण करण्याकरिता वक्फ बोर्डाची स्थापना झालेली आहे. या वक्फ बोर्डामध्ये सरकारने दिलेल्या आकडेवारी नुसार 23566 संस्था वक्फ म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील एकूण 37330 हेक्टर म्हणजे जवळपास 1 लाख एकर जमीन वक्फ बोर्डाकडे आहे. परमेश्वराच्या म्हणजे अल्लाच्या नावे देण्यात आलेल्या जमिनी....

**सभापती :** हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो एवढे सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री. नितीन गडकरी : हा विषय 289 मध्ये कसा बसतो हेच मला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, आपण लक्षात घ्यावे की, मी नियम सोडून कधी बोलत नाही...

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी नियमाला धरुन आणि अल्लाला सोडून बोलावे...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : अल्लाच्या नावाखाली गल्ला मारण्याचे काम सुरु आहे आणि त्याबाबत मी बोलत आहे.

श्री. उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी असे म्हणाले की, नियम 289 आपण समजून घ्या. सन्माननीय सदस्यांनी असे म्हणणे हा माननीय सभापतींचा अपमान आहे. हे शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

**सभापती** : हा विषय नियम 289मध्ये कसा बसतो एवढेच सन्माननीय सदस्यांनी सांगावे. मी परवानगी दिल्यानंतर या विषयावर सविस्तर चर्चा होईल असे मी सांगितले.

श्री. नितीन गडकरी : हा विषय सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना अडचणीचा जरी असला तरी त्यांनी असे करु नये...

श्री. उल्हास पवार : वर्तमानपत्रामध्ये कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती देऊन खुलासा करण्यात आलेला आहे.

श्री. नितीन गडकरी : 1973चे गॅझेट आणि जाहिरातीतील एकेका मुद्यांचे मी उत्तर देतो. माझे सुसंस्कृत मित्र सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे या विषयाच्या बाबतीत एवढे संवेदनशील का होतात, हे मला काही कळत नाही. या सभागृहाच्या प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत सदस्यांमध्ये पहिले नाव माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांचे घेतले जाते. माझे मित्र इतके अस्वस्थ का होत आहेत ?... मी या सभागृहाचा 18 वर्षे सदस्य आहे. माझा मुद्दा विकसित करुन तो सभागृहापुढे मांडण्याचा माझा अधिकार आहे. माननीय सभापतींचे स्थान हे सर्वोच्च आहे. या सभागृहाचा सन्मानच माझ्या हातून होईल, अवमान कधीही होणार नाही. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्या मनामध्ये शंका का आली, हे काही मला कळत नाही.

...नंतर कु.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.........

माननीय सभापती यांच्याबद्दल संपूर्ण सन्मान ठेवून माझ्या म्हणण्याचे महत्व मी सभागृहाला पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. I am speaking in a letter of spirit that, anyone can interprete that point. अध्यक्ष महाराज, आपण ज्यावेळी मला थांबविले, त्यावेळी मी हेच सांगत होतो की, नियम 289 अन्वये या प्रस्तावाचे महत्व कसे आहे ? आपल्याला पूर्ण अधिकार आहे, आपण माझा हा प्रस्ताव रिजेक्ट करु शकता. या सार्वभौम सभागृहातील आपले स्थान अतिशय महत्वाचे आहे. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे माझा कोणत्याही प्रकारचा उद्देश नव्हता आणि आपल्याला जर तसे वाटत असेल तर मी या सभागृहामध्ये माननीय सभापतींची माफी मागतो.

श्री.दिवाकर रावते : झाले समाधान ?

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज मला बोलू द्या. राष्ट्रवादीचे सन्माननीय सदस्य श्री. आर.आर.पाटील हे माझे म्हणणे शांतपणे बसून ऐकून घेत आहेत, परंतु सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे उठून उठून माझ्या प्रस्तावाबाबत का बोलत आहेत ? हेच मला समजत नाही. श्री.अरुणभाई गुजराथी देखील माझे या प्रस्तावावरील भाषण ऐकतांना कसे स्मितहास्य करीत आहेत आणि सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे का असे अस्वस्थ होत आहेत ? वक्फ बोर्डाचे महत्व मी या सन्माननीय सभागृहाला वक्फ ॲक्ट,1995 यामधील एका वाक्याच्या माध्यमातून पटवून देणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई आपण इतक्या अस्वस्थ होऊ नका, माझ्या या चर्चेमधून तुम्हालाही फायदाच होण्याची शक्यता आहे. माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम आणि आपणास यानंतर चांगली संधी मिळेल. आपण काळजी करु नका, आपल्या हिताकरिताच मी हा प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे. वक्फ ॲक्ट,1995 मधील हे जे वाक्य आहे ते मी या सभागृहामध्ये वाचून दाखवू इच्छितो. It reads as under:

" Wakf " means the permanent dedication by a person professing Islam, of any moveable or immovable property for any purpose recognized by the Muslim Law as pious, religious or charitable and includes:

(i) a wakf by user but such wakf shall not cease to be a wakf by reason only of the user having ceased irrespective of the period of such cesser."





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.......

अध्यक्ष महाराज, या सर्व इंग्रजी वाक्याचा मराठी अनुवाद पुढील प्रमाणे आहे. "अल्लाच्या नावाने जर कोणी एका मुस्लिम धर्मीय व्यक्तीने आपल्या चल-अचल संपत्तीवरील हक्क कायमस्वरुपी सोडला आणि ती संपत्ती वक्फ बोर्डाला दानाच्या स्वरुपामध्ये दिली तर या दानकर्माला अतिशय पवित्र व शंभर जन्मांच्या पुण्याएवढे महत्व लाभते." संपत्ती म्हणजे कब्रस्तान, दरगा, इदगाह, मसजिद, अनाथालय, मदरसा, शरियत अनिसभाई और कुछ भी है इसमे ? अध्यक्ष महाराज, हे दानकर्म करणा-याला 100 जन्मांचे पुण्य मिळते, असे या ॲक्टमधील उपरोल्लेखित वाक्यांमधून सांगितलेले आहे.

**सभापती** : हे सर्व सांगण्याकरिता मी आपल्याला परवानगी दिलेली नाही. सदर विषय नियम 289 मध्ये कसा बसतो हेच कृपया आपण सभागृहाला सांगावे.

श्री.नितीन गडकरी : एकूण 40,000 कोटी रुपयांच्या या जमिनी आहेत......

**सभापती** : सदर प्रस्ताव नियम 289 मध्ये कसा बसतो हे तुम्ही दोन मिनिटांच्या मर्यादेत सांगा.

श्री.नितीन गडकरी : यासंदर्भात मुस्लिम धर्मियांकरिता पवित्र असलेल्या या जमिनी सांभाळण्याकरिता 23,566 संस्था वक्फ म्हणून कार्यरत आहेत. सुमारे 1,00,000 लाख हेक्टर जमीन ट्रान्सफर करण्यासंदर्भात मोठा गैरव्यवहार घडलेला आहे, त्यामुळे अल्पसंख्यांक समाजामधील भावना तीव्र झालेल्या आहेत. वक्फ बोर्डाचे मंत्री देखील यावर बोलतांना अतिशय तडफदारपणे,बाणेदारपणे,परखडपणे बोलले की, " माझ्या धर्मियांच्या बाबतीत मी असे कधीही घडू देणार नाही. " अशा प्रकारे माननीय वक्फ मंत्र्यांनी उत्तर दिल्यामुळे माननीय मंत्र्यांनी देखील या आरोपाला स्वीकृती दिल्यासारखे आहे आणि म्हणून हा विषय तातडीचा आहे. महाराष्ट्र सरकारने देखील या आरोपाला स्वीकृती दिलेली आहे. सन 1995 मध्ये लाखो करोडो मुस्मिल बांधवांच्या भावना लक्षात घेता 1995 च्या वक्फ ॲक्ट नुसार वक्फ बोर्डाच्या कोणत्याही जमिनीला यु.एल.सी. कायदा लागू होणार नाही, असे ठरले होते. मोठमोठया लोकांनी वक्फ बोर्डाला एक पवित्र कार्य म्हणून दान केलेल्या या जमिनी लीजवर देणे, मलबार हिलची जमीन देऊन डोंबिवलीची जमीन दिली, असे सांगितले जाणे, हे असे प्रकार या बोर्डाच्या कारभारामध्ये घडत आहेत.

यानंतर श्री.कानडे......

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, या तातडीच्या आणि महत्वाच्या अशा प्रश्नावर सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करुन ताबडतोब याठिकाणी चर्चा झाली पाहिजे अशी माझी आपणांकडे आग्रही विनंती आहे. दूध का दूध आणि पानीका पानी झाले पाहिजे. या जमीन घोटाळयामध्ये जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मला असा विश्वास आहे की, सभागृहाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब अशा गोष्टींचे कधीच समर्थन करणार नाहीत. त्यांनी सुसंस्कृतपणाचे प्रत्यंतर यापूर्वी दिलेले आहे. त्यामुळे या विषयावरील चर्चा ते ताबडतोब मान्य करतील अशी मला आशा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील खालच्या सभागृहात सरकारची याविषयावर चर्चा करण्याची ताबडतोब तयारी आहे, या क्षणाला तयारी आहे असे सांगितलेले आहे आणि ते मी ऐकले आहे. म्हणून माझी सभापती महोदयांना विनंती आहे की, त्यांनी याविषयावरील चर्चेला तात्काळ मान्यता द्यावी. माननीय उपमुख्यमंत्री यांना देखील माझी विनंती आहे की, त्यांनी या विषयावरील चर्चेला पटकन तयारी दर्शवावी जेणेकरुन सभागृहात चर्चा सुरु होईल. या चर्चेला माननीय मंत्री श्री. अनिस अहमद हे उत्तर देतील आणि या चर्चेमधून जे सत्य आहे ते सभागृहाच्या समोर येईल.

सभापती महोदय, म्हणून माझी पुन्हा एकदा आपल्याला विनंती आहे की, आजचे सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करुन नियम 289 प्रमाणे या विषयावर चर्चा सुरु करण्यास परवानगी द्यावी. त्याचप्रमाणे माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना देखील विनंती आहे की, या विषयावर तातडीने चर्चा सुरु करण्यास सहमती दर्शवावी.

श्री. आर.आर.पाटील : माननीय सभापती महोदय, कालपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु झालेले आहे. काल माजी पंतप्रधान श्री. चंद्रशेखर यांना श्रध्दांजली अर्पण करुन सदनाचे कामकाज तहकूब करण्यात आले होते. सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीने आजचा पहिला दिवस आहे. जे प्रश्न सदनामध्ये उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे. या सदनामध्ये खुलेपणाने या विषयावर चर्चा करण्यासाठी सरकारच्या बाजूने कोणतीही हरकत नाही. मला भारतीय जनता पक्षाला मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत. मुस्लिमांच्या श्रध्दा, अल्ला हे शब्द आपल्या तोंडून अधिक उठावदारपणे आणि शोभून दिसतात. पण आपल्या पक्षाच्या या भावना कायम राहिल्या पाहिजेत अशा प्रकारची मी विनंती करतो. कारण

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

त्याचा देशाला उपयोग होईल. वक्फ बोर्डाच्या प्रॉपर्टीज् आणि मशिदी याचे संरक्षण झाले पाहिजे ही आपली नवी भूमिका आहे. देशामध्ये त्याचे जरुर स्वागत होईल. एकच करण्याची आवश्यकता आहे की, ज्या काही चुका आपल्या हातून झालेल्या असतील ......

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर शहरामध्ये एक कब्रस्तान आहे ते स्थानिक नेत्यांनी दाबण्याचा प्रयत्न केला होता. ते मंत्री आहेत आणि गेल्या 11 वर्षापासून आपल्या मांडीला मांडी लावून बसतात. माझ्या आमदार निधीतून हे कब्रस्तान वाचविण्यासाठी मी निधी उपलब्ध करुन दिला. कब्रस्तानची जागा वाचवली. माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांना माहीत आहे की, कब्रस्तान मी वाचविले आहे. छोटा ताजबाग भागातील हे कब्रस्तान होते. मजीद छोला हे तेथील नगरसेवक आहेत. तरी देखील नागपूर भागातून 60 टक्के मते मला मुसलमानांची मिळतात. मात्र अफझल गुरुच्या विरोधात आम्ही आहोत त्याला फाशी दिली पाहिजे. मजीद मेमनना आम्ही आमच्या पक्षाचे जनरल सेक्रेटरी करणार नाही कारण त्यांनी बॉम्ब स्फोटातील आरोपींची वकीलपत्रे घेतलेली आहेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी माननीय गडकरी साहेबांना सांगू इच्छितो की, आपले असलेले मोठे वजन वापरुन बाबरी मशीद वाचवली असती तर बरे झाले असते. मुसलमानांच्या प्रॉपर्टीज तसेच मशिदी यांचे संरक्षण झाले पाहिजे हे आपण सांगण्याची आवश्यकता नाही. ज्या प्रस्तावावर चर्चा करण्याची गरज आहे त्या प्रस्तावावर चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी आहे. मी सभापती महोदयांना विनंती करीन की, कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलवावी आणि त्यामध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी जी वेळ निश्चित होईल त्यावेळी या प्रश्नावर चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता बाळगावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बाबरी मशीद पडली That was a disputed structure as far as the supreme court decision is concerned. Hindus claim that it is a "Mandir" and Muslims claim that it is a "Masjid". गेल्या 50 वर्षात बाबरी मशिदीच्या ढाच्यावर कोणीही नमाज पडलेला नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करणाऱ्यांना, धर्मा-धर्मांमध्ये संघर्ष निर्माण करणाऱ्यांना मुस्लीम समाजाचे हितकर्ते बनण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. बाबरी मशीद पडली त्याच दिवशी त्यांचा हा हक्क कायमचा निघून गेला. तरी सुध्दा राजकारणासाठी या प्रश्नावर चर्चा हवी असेल तर चर्चा घेण्यात यावी. चर्चेमधून काय खरे आहे हे जनतेसमोर आणण्यासाठी शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : कृपया सभागृहात शांतता राखावी. नियम 289 च्या अनुषंगाने सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे......

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. विरोधी पक्षातर्फे नियम 289 च्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. आम्ही जो विषय मांडला तो महाराष्ट्राच्या संदर्भातील विषय आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री बोलता बोलता बाबरी मशिदीकडे जाऊन पोहोचले. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना बाबरी मशिदीच्या विषयावर चर्चा करावयाची असेल तर स्वतंत्र दिवस ठरवून चर्चा घ्यावी, विरोधी पक्षातर्फे या विषयावर चर्चा करण्याची तयारी आहे. आम्ही प्रत्येक मुद्याचे उत्तर देऊ. बाबरी मशिदीचा ढोल वाजवून मुस्लीम समाजाची सहानुभूती मिळविण्याचा शासनाने प्रयत्न करु नये एवढीच माझी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : कोणत्याही प्रश्नावर चर्चा करावयाची असेल तर शासनाची चर्चेची तयारी आहे. चर्चा होऊ द्या.

**सभापती** : नियम 289 च्या अनुषंगाने माझ्यासमोर जो प्रस्ताव आहे तो वक्फ बोर्डाच्या जमिनीपुरता मर्यादित विषयाचा आहे. त्या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने चर्चा करण्याची तयारी आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : बाबरी मशिदीचा संबंध कुठे येतो? त्यांनी बाबरी मशिदीचा उल्लेख का केला?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.आर.आर.पाटील : शासनाने चर्चा करण्यास कुठेही नकार दिलेला नाही. चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. सभापती महोदय, आपण चर्चेसाठी वेळ निश्चित करावी.

**सभापती** : नियम 289 च्या अनुषंगाने जो प्रस्ताव दिलेला आहे तो आजच्या कामकाज पत्रिकेतील विषय नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हा प्रस्ताव मला स्वीकारता येणार नाही. मात्र.....(गोंधळ)... माझे वाक्य पूर्ण झालेले नाही........(अडथळा).....माझे वाक्य पूर्ण झालेले नाही......(गोंधळ)...........नियम 289 संबंधी जी सूचना दिलेली आहे ती तांत्रिकदृष्टया मला स्वीकारता येणार नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले की, शासनाची या संदर्भात चर्चा करण्याची तयारी आहे. विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेची मागणी केली असल्यामुळे आपण वेळ निश्चित करावी. या प्रश्नाबाबत केवळ राजकारण करावयाचे असेल तर ते योग्य नाही. शासनाची चर्चेस पूर्ण तयारी आहे. ज्या पध्दतीने सभागृहात विरोधी पक्षाकडून वर्तन केले जात आहे ते योग्य नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातात कापडी फलक घेऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : मी असे म्हटले आहे की, दिवसाच्या कामकाज प्रत्रिकेमध्ये जेव्हा 289 अन्वयेच्या प्रस्तावातील विषयाचा अंतर्भाव असतो तेव्हा आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा स्वीकारीत असतो. समजा तशी चर्चा स्वीकारता आली नाही तर आपल्याला अन्य मार्गाने चर्चा उपस्थित करता येते. आणि त्या अनुषंगाने मला असे म्हणावयाचे आहे की, आज या ठिकाणी नियम 97 अन्वये अडीच तासाची अल्पकालीन चर्चा करण्यास मी अनुमती देत आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातात कापडी फलक घेऊन घोषणा देत असतात.)

प्रश्नोत्तराच्या तासाचे एक वेगळे महत्व आहे, त्यामुळे प्रश्नोत्तराच्या कामकाजाला आता आपण सुरुवात करु या. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर नियम 97 अन्वयेच्या चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातात कापडी फलक घेऊन घोषणा देत असतात.)

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातात कापडी फलक घेऊन घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील वस्ती शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी उच्च स्तरीय अभ्यास गटाच्या अहवालातील शिफारशींबाबत**

**(१) * २९२८० प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. दिलीपराव सोनवणे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ, श्री. वसंतराव खोटरे, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वस्ती शाळांचे रूपांतर नियमित शाळात करण्यात येत असल्याबाबत व वस्ती शाळात काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी शासनाने नेमलेल्या उच्च स्तरीय अभ्यास गटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अभ्यास गटाने वस्ती शाळात काम करणाऱ्या शिक्षकासंबंधी व वस्ती शाळा संबंधी कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) होय.

(२) बहुसंख्य वस्तीशाळांचे रुपांतर नियमित शाळामध्ये करणे व स्वयंसेवी शिक्षकांना या शाळांमध्ये सामावून घेण्यासंबंधात प्राप्त झालेल्या शिफारशींची छाननी चालू आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, वस्ती शाळात काम करणा-या शिक्षकासंबंधी व वस्ती शाळा संबंधी कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत असा आम्ही प्रश्न विचारला होता परंतु या प्रश्नाचे माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. त्यामुळे वस्तीशाळेच्या संदर्भात समितीने कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन हातात कापडी फलक घेऊन घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे. अशा गोंधळाच्या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12 वाजून 36 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली. )

-----------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपल्याला काही वस्तुस्थिती नजरेस आणून द्यावयाची आहे. आम्ही माननीय सभापतींकडे नियम 289 अन्वये "23,666 संस्था, 39 हजार हेक्टर म्हणजे जवळपास 1 लाखपेक्षा जास्त जमिनींबाबत झालेल्या घोटाळ्यांबाबत" सूचना दिलेली आहे. हे घोटाळे मुस्लीम समाजावर दूरगामी परिणाम करणारे आहेत. अल्लाच्या नावाने मुस्लीम समाजाच्या उपयोगाकरिता दिलेल्या जागेवर अल्लाच्या नावाने डल्ला मारला गेला. या डल्ला मारु प्रकरणाबाबत मंत्रिमहोदय श्री.अनिस अहमद यांनी बाणेदारपणे कठोर भूमिका घेतली.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

श्री.अनिस अहमदांच्या भूमिकेचे मी स्वागत करतो. ..(अडथळा)... राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाच्या मंत्रिमंडळातील श्री.अनिस अहमद हे एक बाणेदार मंत्री आहेत. यासंदर्भातील एक तासाची सी.डी.माझ्याकडे आहे, ती आपण पहावी व सांगावे की, गडकरी जे सांगत आहेत ते बरोबर आहे की नाही ? त्यांनी यामध्ये अतिशय स्पष्टपणे कबूल केले आहे की, हा घोटाळा झालेला आहे. त्यामुळे या गंभीर विषयावर चर्चा करण्याच्या दृष्टीने आपण सभागृहाचे पुढील कामकाज स्थगित करुन या गंभीर विषयावर चर्चा करावी, अशी आम्ही मागणी केली. अशाप्रकारची मागणी केल्यानंतर सत्तारुढ पक्षाचे माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब उभे राहिले व त्यांनी सांगितले की, आमची चर्चा करण्याची तयारी आहे. आपण म्हणाल त्या विषयावर, म्हणाल त्या क्षणी आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. त्यांच्या मनातील सद्सद्विवेकबुध्दीला दाद देऊन मी सांगू इच्छितो की, काहीवेळा आपल्याला एखाद्या माणसाच्या मनात काय आहे आणि पोटात काय आहे हे समजून येत नाही. परंतु याठिकाणी मंत्रिमहोदयांच्या अंत:करणात आणि मनात एकच गोष्ट आहे, असे मला वाटते. माननीय अरुणभाई गुजराथी साहेबांच्या तोंडावर स्मित हास्य दिसून येत आहे, त्यांना कायद्याबद्दल आणि लोकशाहीबद्दल चाड आहे. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी सांगितले की, आम्ही या विषयावर चर्चा करण्यास तयार आहोत. स्वाभाविकपणे हे सभागृह म्हणजे लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. माननीय श्री.डावखरे साहेबांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील या गंभीर प्रश्नावरील चर्चा मान्य करण्यात आली, असा मेसेज बाहेर जाईल. विरोधी पक्षाने मागणी केल्याप्रमाणे सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांनी ती मान्य केली. याबाबतीत संकेत आणि प्रथा असून सत्तारुढ पक्षाचे व विरोधी पक्षाचे याबाबतीत एकमत झाल्यामुळे आपण या गंभीर विषयावर चर्चा सुरु करावी, अशी माझी मागणी आहे. अशी चर्चा सुरु करण्यापूर्वी फार तर 10 मिनिटे सभागृह स्थगित केले जाते. याठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य, प्रा.बी.टी.देशमुख साहेब उपस्थित आहेत, त्यांना यासंदर्भातील सर्व माहिती आहे. त्यामुळे याबाबतीत दोन्ही बाजूने चर्चा करण्याची तयारी असल्यामुळे आपण या चर्चेस सुरुवात करावी, अशी माझी विनंती आहे. "मियाँ बीबी राजी तो क्या करेगा काझी" ते चर्चा करण्यासाठी तयार आहेत. ...(अडथळा)... "कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे" उल्हास दादा, भजन, किर्तन वगैरे करतील, श्रीमती सुधा ताईंचे भविष्य

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

उज्वल आहे. याठिकाणी माझी एवढीच विनंती आहे की, आपण या विषयावरील चर्चेला सुरुवात करावी, कारण या विषयी दोन्ही बाजूकडून एकमत झालेले आहे.

**उपसभापती** : या विषयावर चर्चा करण्याच्या दृष्टीने नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेस माननीय सभापती महोदयांनी परवानगी दिलेली आहे. त्यांनी अशाप्रकारचा निर्णय दिल्यानंतर पुन्हा या विषयी वेगळा निर्णय वा वेगळी माहिती देणे योग्य होणार नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात सन्माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिलेला होता व नंतर प्रश्नोत्तराचा तास सुरु झाला होता, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी प्रश्नही विचारलेला होता. त्यामुळे माझी याठिकाणी विनंती आहे की, यासंबंधी माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिलेला असल्यामुळे आता आपण पुढील कामकाज घ्यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी प्रश्न विचारावा.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

प्रा.शरद पाटील : राज्यातील वस्ती शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी उच्चस्तरीय अभ्यास गटाच्या अहवालातील शिफारशी कोणत्या ?

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांत बसावे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

**उपसभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पुढे चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.59 वाजता, दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासानंतर नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा सुरु होईल, असे आदेश मघाशी माननीय सभापतींनी दिले होते. प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ही चर्चा आता सुरु करावी.

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता आपण सुरु करणार आहोत. तत्पुर्वी मला सदनाला विनंती करावयाची आहे. या अल्पकालीन चर्चेनंतर लेईंगचे जे कामकाज आपण करणार आहोत ते चर्चेपूर्वी दोन-तीन मिनिटात पूर्ण करुन घेऊ व त्यानंतर चर्चा सुरु करु.

...2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री.रणजित कांबळे (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2007 चा अध्यादेश क्रमांक 4 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2007 चा अध्यादेश क्रमांक 3 - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 213 (2) (अ) अन्वये सन 2007 चा अध्यादेश क्रमांक 5 - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--------------

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.** : आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधान परिषदेचे सन 1990 चे चौथे अधिवेशन ते सन 2006 चे तिसरे अधिवेशन या कालावधीमध्ये दिलेल्या 290 आश्वासनांवर शासनाने केलेल्या कारवाईबाबतची विवरणपत्रे मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : विवरण पत्रे सभागृहासमोर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली विवरण पत्रे छापावीत.)

-----------

..4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2007 च्या पहिल्या अधिवेशनात दिनांक 14 मार्च 2007 ते दिनांक 17 एप्रिल 2007 या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या 1199 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची यादी छापावी.)

--------------

...5............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-2008 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007-2008 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे, आणि तसे करीत असतांना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस करीत आहेत.

**उपसभापती** : सन 2007-2008 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

---------------

..6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मंगळवार, दिनांक 17 जुलै 2007 रोजी विधानमंडळाला सादर करण्यात आलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात, ज्यांच्या बाबतीत पूरक मागण्या समाविष्ट करण्यात आल्या नव्हत्या अशा, आकस्मिकता निधीतून दिनांक 16 जुलै 2007 रोजी मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची सूची मी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उपसभापती** : सूची सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात जी चर्चा होणार आहे. त्या चर्चेशी संबंधित असलेले औकाफ खात्याचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. औकाफ खात्याच्या मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, औकाफ मंत्री श्री.अनिस अहमद सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : औकाफ मंत्री श्री.अनिस अहमद सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 36 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

श्री.जयंत प्र.पाटील : वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या व्यवहारासंबंधी चर्चा संपल्यानंतर विषयपत्रिकेवरील उर्वरित कामकाज आजच घेतले जाणार आहे का ? कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये असे ठरले आहे की, सायंकाळी 6 नंतर सभागृहाचे कामकाज घ्यावयाचे नाही. म्हणून मी विचारु इच्छितो की, उर्वरित कामकाज आज कशा प्रकारे पूर्ण होणार आहे ?

**उपसभापती** : आज कामकाज पूर्ण झाले नाही तर उद्या सकाळी विशेष बैठक घेऊन कामकाज घेतले जाईल.

प्रा.शरद पाटील : आज स्थगित करण्यात आलेला प्रश्नोत्तराचा तास उद्या घेणार का ?

**उपसभापती** : आजचा प्रश्नोत्तराचा तास उद्या घेता येत नाही.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

**अल्पकालीन चर्चा**

**पृ.शी.**: वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीन खरेदी-विक्रीतील गैरव्यवहार.

**मु.शी.**: वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीन खरेदी विक्रीतील गैरव्यवहाराबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी अनौपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 2 तास 30 मिनिटे वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण वि.प.स. यापैकी एक सन्माननीय सदस्य आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"राज्यात वक्फ मंडळाच्या मालकीच्या जमीन खरेदी-विक्री गैरव्यवहाराची माहिती नुकतीच उघडकीस येणे, वक्फ मंडळाने औरंगाबाद येथील एम.पी. लॉ कॉलेजजवळील 147 एकर जमीन निर्माण भारती लँडमार्क प्रा.लि. या कंपनीस देणे, नांदेड येथील मौजे वाजेगाव येथील वक्फ सेवा निनामी जमीन 22 एकर 23 गुंठे अल्प दरामध्ये विकणे, बीड जिल्हयातील केज तालुक्यातील 10 एकर जमीन वक्फ मंडळाकडून फक्त 10 लाख रुपयात विकण्यात येणे, औकाफ मंत्र्यांनीच या जमीन गैरव्यवहाराप्रकरणी मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यावर आरोप करणे, वक्फ मंडळाच्या अधिकार क्षेत्रात जमीन विक्रीचे अधिकार नसताना अवैधरित्या वक्फ मंडळाच्या अध्यक्षांनी मोठया प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करुन वक्फ मंडळाचे आर्थिक नुकसान करणे, सदर मंडळाच्या जमीन खरेदी विक्रीच्या तक्रारीची चौकशी करुनही त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, या प्रकरणी जनमानसात संशयाचे वातावरण निर्माण झाले असून या प्रकरणी सी.बी.आय.चौकशी करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी".

नंतर श्री.सुंबरे.....

श्री. गडकरी ....

सभापती महोदय, हा सेक्युलर भ्रष्टाचार असल्याने सगळ्याच सेक्युलरवाद्यांनी तो ऐकला पाहिजे, आता येथे नामदार डॉ.पतंगराव कदम साहेब उपस्थित झालेले आहेत त्यांनी देखील ऐकले पाहिजे. सभापती महोदय, आपण सभागृहाचे सगळे कामकाज स्थगित करून या अल्पकालीन चर्चेसाठी आम्हाला अनुमती दिली त्याबद्दल प्रथमत: मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील धार्मिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करून आणि त्या संस्थानांच्या कारभारामध्ये गैरप्रकार करण्याच्या घटना वाढत आहेत. शिर्डी संस्थानाच्या बाबतीत देखील अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत आणि त्याबद्दल या सभागृहात अनेकदा चर्चाही उपस्थित केली गेली आहे. तेथील गैरव्यवहाराबद्दलचे अनेक विषय वेगवेगळ्या निमित्ताने येथे मांडले गेले आहेत. त्यानंतर मुंबईतील सिद्धी विनायक ट्रस्टच्या बाबतीत देखील असेच झाले. मंदिरामध्ये लोकांनी पैसे टाकले आणि तत्कालीन जे मंत्री होते त्यांनी आपल्या संस्थांसाठी म्हणून ते पैसे डोनेशन म्हणून काढून घेतले. मंदिरामध्ये आलेले पैसे अशा प्रकारे मंत्र्यांनी आपल्या संस्थेसाठी घेतले म्हणून हायकोर्टाने देखील तीव्र शब्दात आपली नापसंती व्यक्त केली. त्यानंतर आता वक्फ बोर्डाचे प्रकरण पुढे येत आहे. त्याबद्दल मी सविस्तर बोलणारच आहे. परंतु या बोर्डाच्या जमिनी हडप करण्याचे काम साऱ्या महाराष्ट्रात होत आहे वा झालेले आहे आणि दुसरीकडे हिंदू मठ-मंदिरासंबंधातील कायद्याचे एक विधेयक शासनाकडून आणले जाणार आहे. कदाचित त्याद्वारा त्या मठ-मंदिरांच्या जमिनी लाटण्यासाठी प्रयत्न होणार आहे. सभापती महोदय, त्याही पुढे जाऊन मी आपल्याला सांगू इच्छितो की, पुढे मागे कदाचित बौद्ध विहार, जैन मंदिर इत्यादी सारख्या वेगवेगळ्या मठ, विहार, जैन मंदिरे आदी विविध धर्मांच्या, समाजाच्या जमिनीं त्यांच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करून कशा मिळवावयाच्या यासाठी सेक्युलरवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला जातो आहे असे मला वाटते. सभापती महोदय, खरे म्हणजे या गंभीर प्रश्नावर राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून गंभीरपणे चर्चा होण्याची गरज आहे.

सभापती महोदय, वक्फ म्हणजे काय ? आपल्या भारताच्या घटनेमध्ये तीन याद्या आहेत. एक राज्य यादी, दुसरी कंकरन्स लिस्ट आणि तिसरी सेंट्रल लिस्ट. तेव्हा भारतीय घटनेप्रमाणे भारताच्या पालर्मेंटने अनेक राज्यांमध्ये जे वेगवेगळे कायदे होते त्या संदर्भात कायदे केले. त्यानुसार 1944 साली हैद्राबाद संस्थानचा कायदा करण्यात आला. त्यानंतर आपल्या राज्यात

...... एन 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

देखील वेगवेगळे कायदे होते. ते सारे लक्षात घेऊन 1995 मध्ये वक्फ बोर्डाचा कायदा केंद्र सरकारने मंजूर केला. या वक्फ ॲक्टमध्ये जी सुरूवात आहे त्यात त्यांनी 'वक्फ' या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. पण ती इंग्रजीतील व्याख्या मी येथे आपल्याला वाचून दाखवून वेळ घेत नाही. मात्र याबाबत एवढेच सांगतो की, अल्लाच्या नावाने मस्जिद, दर्गा, कबरस्तार, इदगाह वगैरेंसाठी एखाद्या व्यक्तीने वा संस्थेने आपली चल-अचल संपत्ती काही धार्मिक कार्यासाठी म्हणून कायम स्वरूपी दान केली असेल, त्यावरील आपला हक्क सोडला असेल तर अशी सारी संपत्ती वक्फ मानली जाते. ही संपत्ती कोणत्या कारणासाठी वापरली जाते ? तर मस्जिद, दर्गाह, इदगाह, कबरस्तान, अनाथालय, मदरसे वगैरे जे आहेत त्यांच्यासाठी म्हणून वापरली जाते. म्हणजे असे म्हटले जाते, आता या ठिकाणी उपस्थित असणारे माननीय मंत्री तसेच अन्य जे मुस्लिम सदस्य आहेत ते देखील सांगतील की, वक्फची संपत्ती घेणे, वापरणे हे फार मोठे पाप मानले जाते. इसके बारे में शरियत और कुरान में जो लिखा हुआ है, वह मैंने पढ़ा नहीं है, लेकिन मैं यह मानता हूँ कि अल्लाह के नाम पर जो गरीबों के लिए दान किया जाता है, उस जमीन पर नजर रखना, उसका फायदा लेना और उस जमीन को ले लेना, यह मुस्लिम धर्म में बहुत बड़ा अपराध माना गया है. लेकिन महाराष्ट्र में मसजिद, दरगाह, कब्रिस्तान, मदरसे की सम्पत्ति के बारे में किस प्रकार से क्या-क्या चल रहा है, इस पर गंभीरता से सोचने का समय आया आ गया है.

( यानंतर श्री. सरफरे ..... ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मी माझे भाषण पुन्हा मराठीमध्ये सुरु करतो. या देशाच्या मुस्लीम धर्माच्या इतिहासामध्ये माननीय श्री. अनिस अहमद आपले नाव लिहिले गेले आहे. आपण मंत्री पदावर असा किंवा नसा, आपल्या धर्माची जमीन वाचविणारा क्रांतिकारी नेता म्हणून, मुस्लीम समाजातील एक क्रांतिकारी मंत्री म्हणून मुस्लिम धर्माच्या इतिहासामध्ये तुमचे नाव लिहिले गेले आहे. तुम्ही चिंता करु नका. तुम्ही क्रांतिकारक आहात, तुम्ही मंत्रिपदाच्या तुकडयाची काय चिंता करता? तुम्ही इतिहास लिहिला आहे. सभापती महोदय, या वक्फ बोर्डामध्ये 23 हजार 566 संस्था नोंदणीकृत झाल्या आहेत, बोर्डाकडे 37 हजार 330 हेक्टर जमीन आहे. या वक्फ बोर्डाचे मेंबर कोण आहेत? बोर्डाचे अध्यक्ष डॉ. अझिज साहेब आहेत. त्याचबरोबर श्री. दिलीपकुमार, श्रीमती शबाना आझमी, शिया पंथाचे मौलाना इजद्दीन, मौलाना इराणी आणि लातूरचे चाँद पाशा इनामदार, त्याचबरोबर श्री. हाफिज धत्तुरे, एम.एल.ए., राज्याचे जॉईंट सेक्रेटरी श्री. अे. बी. पटेल असे हे या सदस्यांचे वक्फ बोर्ड आहे. या वक्फ बोर्डाबाबत उलट सुलट चर्चा सुरु असते. म्हणून पहिल्यांदा हे वक्फ बोर्ड समजून घेतले पाहिजे. पहिली गोष्ट अशी की, या वक्फ बोर्डाला अधिकार काय आहेत? Powers and functions of the Board त्यांना असलेल्या अधिकाराप्रमाणे तीन वर्षापर्यंत त्यांना जमीन लीजने देता येते. जर त्यांना जमीन विकावयाची असेल तर 1995 च्या ॲक्टमध्ये दोन तृतियांश बहुमताची तरतूद आहे. त्यांना दोन तृतियांश बहुमताशिवाय जमीन विकता येत नाही. त्यांनी किती जमीन विकली? किती जमीन ट्रान्सफर केली, किती जमीन लिजवर दिली? हे मी नंतर सांगणार आहे. माननीय डॉ. अझिज साहेबांचे कार्यालय औरंगाबाद येथे आहे. त्यांना मुंबईमध्ये कार्यालय हवे म्हणून त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, आम्हाला मंत्रालयामध्ये कार्यालयासाठी जागा द्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांची विनंती अमान्य केली. तेव्हा डॉ. अझिज साहेबांनी मॅजेस्टिक आमदार निवासातील दोन खोल्यामध्ये बोर्डाच्या सर्व शासकीय फायली ठेऊन आपले कार्यालय सुरु केले. डॉ. अझिज साहेबांना काय माहीत नाही? ज्याप्रमाणे शासनाचे अवर सचिव, उपसचिव ऑर्डर काढतात त्याप्रमाणे ते शासनाच्या आदेशानुसार ऑर्डर काढतात. डॉ. अझिज साहेबांनी अध्यक्ष म्हणून आपल्या सहीने अनेक ऑर्डर काढल्या आहेत. आणि त्या ऑर्डर त्यांनी इंम्प्लिमेंट केल्या आहेत. त्यांनी बोर्डामध्ये रेझ्युलेशन केला. हा पार्लमेंटचा ॲक्ट आहे, यामध्ये अशाप्रकारे रेझ्युलेशन करण्याचा त्यांना अधिकार नाही. त्यांनी बोर्डाचे अधिकार स्वत:कडे घेतले आहेत. बोर्डाच्या मिटींगला दोन तृतियांश सभासदांची उपस्थिती कधीही नव्हती. श्री. दिलीपकुमार आणि श्रीमती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

शबाना आझमी यांना पाच वर्षामध्ये एकदाही बोर्डाच्या मिटींगला जायला वेळ मिळाला नाही. ॲडव्होकेट पठाण यांचे पत्र माझ्याकडे आहे ते मी आपल्याला नंतर वाचून दाखवितो. त्यामध्ये त्यांनी मनोरंजक गोष्टी सांगितल्या आहेत. अशा परिस्थितीत बोर्डाची मालमत्ता विकण्याचा अधिकार नसतांना विकण्यात आलेल्या 25 मालमत्तांची यादी मी आपणास वाचून दाखविणार आहे. माननीय श्री. नवाब मलिक आणि मी टी.व्ही. कॅमेऱ्यासमोर असतांना ते म्हणाले होते की, तुम्ही 25/26 काय बोलता?. यह 25/26 क्या चल रहा है, यह 4 हजार प्रॉपर्टीज का घोटाला है. ते राष्ट्रवादीचे मुंबईचे कार्याध्यक्ष आहेत. यासंबंधी राष्ट्रवादी कॉंग्रेसची भूमिका प्रहारी आहे, राष्ट्रावर अंकुश ठेवणारी आहे. माननीय श्री. भुजबळ साहेब स्मितहास्य करीत आहेत, माननीय श्री. विजयदादा मोहिते पाटील यांच्या चेह-यावर प्रसन्नतेचा भाव आहे आणि माननीय डॉ. पतंगराव कदम हे गदगदून राहिले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.बरवड.... 14:10

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य हे मनामधील नव्यानव्या कल्पना घेऊन मांडे मांडायला लागलेले आहेत, हे वस्तुस्थितीला धरून नाही.

श्री.दिवाकर रावते : आपल्याला मुख्यमंत्री व्हायचे आहे ना ?

डॉ.पतंगराव कदम : मला आपल्या मदतीने मुख्यमंत्री व्हायचे नाही. माझा पक्ष काय ते ठरवेल.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय डॉ.पतंगराव कदम यांचे भाग्य चांगले लिहिण्याकरिता सन्माननीय सदस्य श्री.रावते आणि मी प्रयत्न करत आहोत. आता कशाला खोड्या घालायच्या ? त्यांना ते पाहिजे आहे. परंतु काही गोष्टी या बोलायच्या नसतात. ऐकायच्या असतात....

**उपसभापती** : आपण लिहिलेले भाग्य खरे होत असेल तर आम्ही आपल्याकडे लाईन लावतो.

श्री.नितीन गडकरी : मी तयार आहे परंतु पहिला क्रमांक सन्माननीय डॉ.पतंगराव कदम यांचा राहील आणि दुसरा क्रमांक आपला राहील.

उपसभापती : चालेल. ते माझे गुरुबंधू आहेत.

श्री.नितीन गडकरी : खरे म्हणजे त्यांचा प्रोटोकॉल सभापतींपेक्षाही मोठा आहे. मुख्यमंत्री पद हे त्यांना मामुली आहे. ते 'कुलपती' आहेत. ते गव्हर्नरांच्या बरोबरीचे आहेत. खरे म्हणजे त्या बाजूला आपल्यापेक्षा उंच खुर्ची द्यायला पाहिजे. ते कर्तृत्ववान आहेत, त्यांनी शिक्षणक्षेत्रात मोठे काम केलेले आहे. हे राज्य त्यांच्याकडे भविष्यामध्ये आशेने आणि अपेक्षेने पहात आहे.

सभापती महोदय, या मंडळाची मालमत्ता विकण्याच्या बाबतीमध्ये पार्लमेंटचा ॲक्ट आहे. "Elimination of Wakf property without sanction of Board to be void." "Notwithstanding anything contained in the Wakf deal, "notwithstanding" हा शब्द विदर्भ, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाच्याबाबतीत भारताच्या घटनेमध्ये आलेला आहे. "notwithstanding anything contained in the wakf deal any gift, sale, exchange or mortgage of any immovable property which is wakf property shall be void unless such gift, sale, exchange or mortgaged is effected with the prior permission of the Board" बोर्डामध्ये या संबंधाने निर्णय घ्यावयाचा असेल तर बोर्डातील सदस्यांचे दोन तृतियांश बहुमत असायला पाहिजे.

...2...



SKK/ MAP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे. अझीज : मी नंतर उत्तर देतो.

श्री.नितीन गडकरी : आपले उत्तर आम्ही ऐकू. आपण या सभागृहाचे सदस्य आहात, त्यामुळे आम्ही आपल्यावर अन्याय करणार नाही. आम्ही आपले उत्तर जरूर ऐकू. यापैकी किती ट्रान्स्फर लिस्ट केल्या ? आज सन्माननीय मंत्री श्रीमती विमलताई मुंदडा उपस्थित नाहीत. मी मंत्री असतांना एका मुस्लीम कॉन्ट्रॅक्टरला बीओटीवर प्रोजेक्ट दिलेला होता. सन्माननीय मंत्री श्रीमती मुदडा आणि त्यांचे चांगले संबंध आहेत. मला लोक म्हणत असत की, त्या त्यांच्या पार्टनर आहेत. परंतु असे काही नसेल. मी त्याबाबत काही उल्लेख करत नाही.

श्री.आर.आर.पाटील : कृपया हे रेकॉर्डवर येऊ नये.

श्री.नितीन गडकरी : मी त्यांच्यावर आरोप करत नाही. वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आलेली होती ती चुकीची आहे असेच मला म्हणावयाचे आहे. आपल्याला अधिक माहिती हवी असेल तर मी ती नंतर देईन. सन्माननीय मंत्री श्रीमती विमलताई मुंदडा यांच्या पतींनी वफ्क बोर्डाकडे तक्रार केली होती. सन्माननीय श्री.अझीझ साहेब मी जे काही म्हणतो ते बरोबर आहे ना ? यामध्ये काही चुकले तर ते आपण दुरुस्त करा. सन्माननीय श्री.विमलताई मुंदडा यांच्या पतींने तक्रार केली. सभापती महोदय, या जमिनी लिजवर देण्याबद्दल कायद्याप्रमाणे दोन तृतियांश मेजॉरिटी असायला पाहिजे, अशी तरतूद आहे. कायद्यामधील 56 कलमामध्ये म्हटलेले आहे की, "Restriction on power to grant lease of wakf properties. A lease or sub-lease for any period exceeding three years of any immovable property which is wakf property shall notwithstanding anything contained in the deed or instrument of wakf for in any other law for the time being in force be void and of no effect. तीन वर्षाच्या वर काही करताच येत नाही. आता त्या जमिनीवर मॉल उभे राहिलेले आहेत. सेक्युलर ॲप्रोच आहे त्यामुळे जमिनीवर जोरात मॉल उभे आहेत. एक्स्चेंज ऑफ प्रॉपर्टी म्हणजे शहरातील मध्यवर्ती भागातील 10 एकर जमीन घ्या. जसे टक्कल पडलेले असते त्यावर एकही केस उगवत नाही तसे इकडे 10 कोटीची जमीन द्या आणि तिकडे टेकडीवर 10 लाखाची 10 एकर जमीन घ्या आणि एक्स्चेंज करा. म्हणजे एक तोळ्याचा लोखंडाचा तुकडा द्या आणि एक तोळे सोने घ्या, असा व्यवहार या बोर्डामध्ये झालेला आहे. किती प्रॉपर्टी आहे ती मी वाचून दाखवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू...

अजून एक गोष्ट सांगावयाची आहे, ती फार गंभीर स्वरुपाची आहे. 1995 साली ॲक्ट जेव्हा झाला त्यातील 112 वे कलम आहे.

( यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्यामध्ये असे म्हटले आहे की, " The wakf Act and the Wakf Amendment Act 1984 are hereby repealed." म्हणजे ते संपले. पुढे असे म्हटले आहे की, "Notwithstanding such repeal anything done or any action taken under the said Act, shall be deemed to have been done or taken under the corresponding provision of this Act." पुढे (3) मध्ये असे म्हटले आहे की, "If immediately before the commencement of this Act in any State, there is in force in that State any law which correspond to this Act and corresponding law shall stand repeal." 1995 च्या या कायद्यानंतर त्या आधी केंद्राने केलेले सगळे कायदे, राज्य सरकारने केलेले सगळे कायदे रिपील झाले म्हणजेच रद्द झाले. आता सगळ्या कायद्यांकरता 1995 चा एकच कायदा आहे. या कायद्यामध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनीला अर्बन अँड सिलिंगचा कायदा लावला आणि जादा जमिनी काढल्या. अर्बन लँड सिलिंगचा कायदा चॅरिटी कमिशनरच्या अधिकारक्षेत्रात नसताना चॅरिटी कमिशनरने कलम 38 खाली किंवा कोणत्या तरी कलमाखाली अनेक सरप्लस जमिनी विकण्यास परवानगी दिली. मोठमोठ्या उद्योगपतींनी स्वस्तात मोठमोठ्या जागा बळकावल्या. चॅरिटी कमिशनरनी या परवानग्या दिल्या. चॅरिटी कमिशनरला अशी परवानगी देण्याचा अधिकार आहे काय ? जर 1995 च्या कायद्याप्रमाणे वक्फ बोर्डाच्या जमिनीला कोणताही कायदा लागत नाही आणि केवळ 1995 चा वक्फ कायदा लागू होतो तर चॅरिटी कमिशनरने या सरप्लस जमिनी काढून ज्या परवानग्या दिल्या त्यामध्ये अर्बन लँड सिलिंग ॲक्टखाली किती जमिनी काढल्या आणि या सरप्लस जमिनी कोणाला वाटलया ? सभापती महोदय, 1995 च्या कायद्याप्रमाणे जर आधीचे सगळे कायदे रिपील झाले असतील तर 1995 नंतर या वक्फच्या जमिनीच्या बाबतीत 2004 सालचे असतील, 2005 सालचे असतील, गेल्या दहा वर्षात घेतलेले सर्व निर्णय व्हाइड आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी हा कायदा वाचावा. हे सगळे कायदे रद्द झाले असतील तर गेल्या 10 वर्षात घेतलेले सर्व निर्णय कायदेशीररित्या वैधानिक आहेत काय ? जर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी असे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

म्हणत असतील की, गडकरी, तुम्ही चुकत आहात तर मी सभागृहाची क्षमा मागेन. याबाबत यांनी घुडगूस घातला. अर्बन लँड सिलिंग ॲक्टखाली ज्या जागा काढून घेतल्या त्याबाबत मराठवाड्यातील बीडच्या सन्माननीय सदस्या श्रीमती दराडेताई यांना सांगू इच्छितो की, माझे चुकत असेल तर आपण हरकत घ्यावी. बीड, केज येथील वक्फच्या जमिनीच्या बाबतीत काय झाले ? जसे सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिस अहमद यांनी उत्स्फुर्तपणे सत्य सांगण्याचे धाडस दाखवले तसे सत्य आपण बीड आणि केज येथील वक्फच्या जमिनीच्या बाबतीत सभागृहात सांगावे. आपले नाव इतिहासात लिहिले जाईल.

**उपसभापती** : आपण सगळ्यांना इतिहासजमा करावयास घेतलेले आहे काय ? श्री. अनिस अहमद इतिहासजमा. श्रीमती उषाताई दराडे इतिहासजमा. काही वेळाने आपण मला इतिहासजमा कराल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या अभूतपूर्व चर्चेचे आपण साक्षात सभापती आहात. या महाराष्ट्राच्या इतिहासात हे लिहिले जाणार आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:20

(श्री. नितीन गडकरी...)

सभापती महोदय, या वक्फ बोर्डाच्या 1995 च्या कायद्यातील तरतुदी मी सांगितल्या. त्या आधी 1913चा कायदा होता. 1954चा केन्द्रीय कायदा होता. केन्द्र सरकारने वक्फच्या संदर्भातील सर्व जुने कायदे रद्द करुन 1.1.1996 पर्यन्त केलेला कायदा 1995 पासून अंमलात आणला. हा कायदा संपूर्ण भारतात लागू झाला. महाराष्ट्रामध्ये राज्य शासनाने 25.7.1996 रोजी राजपत्रात प्रसिध्द करुन हा केन्द्राचा कायदा राज्यात लागू केला. त्यानंतर 10 वर्षे हा कायदा राज्यात लागू असताना देखील गैरलागू गोष्टी घडलेल्या आहेत. या गैरलागू गोष्टींची चौकशी करण्याचे धाडस माननीय मुख्यमंत्री दाखविणार आहेत की नाही हा खरा प्रश्न आहे. या कायद्याच्या संदर्भात जॉईण्ट पार्लमेण्टरी कमिटी नेमण्यात आलेली होती. शिवसेना मुस्लिमांच्या विरोधात आहे असे बोलले जाते. परंतु कॉँग्रेस किंवा राष्ट्रवादी कॉँगेस पक्षाचे नाही तर शिवसेनेचे खासदार श्री. चंद्रकांत खैरे हे माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले आणि त्यांनी काद्री कमिटीच्या रिपोर्ट बाबत निर्णय घेण्याची विनंती केली. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले की, "तुमच्याकडे तीन महिने फाईल पडून आहे, रिपोर्टबाबत कडक कारवाई करावी." त्यानंतर 25 तारखेला माननीय मुख्यमंत्र्यांनी फाईलवर सही केली. सभापती महोदय, या वक्फ समितीने काय रिपोर्ट दिला ? हा रिपोर्ट आता केन्द्राकडे जाणार आहे. या रिपोर्टची मला माहिती आहे. परंतु त्याचा उल्लेख मी या ठिकाणी करणार नाही. या काद्री कमिटीचे निष्कर्ष मी वाचून दाखवितो. अर्थ समजणारे अधिकारी पाहिजेत म्हणून अर्थ विभागाचे लेखा व कोषागार संचालक श्री. काद्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सरकारने ही समिती नेमली. या समितीने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष मी आपणास वाचून दाखवितो :-

"औरंगाबाद येथील श्री. कैलाश बाफना व अंबरनाथ येथील महाराष्ट्र न्यास व वक्फ संस्थेचे श्री. अझीज पठाण हे साक्ष देण्यास उपस्थित होते. त्यांनी अंबरनाथ मशीद ट्रस्ट बद्दल डॉ. एम.अे.अझीज यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयाची कागदपत्रे सादर केली आणि वस्तुस्थिती विशद केली." वक्फच्या बाबतीत काय सांगितलेले आहे ? "वक्फ जमिनीची बेकायदेशीर विक्री किंवा अदलाबदली करणे, प्रामुख्याने नांदेड व मुंबईतील जमीन मुतवल्ली किंवा व्यवस्थापन समित्या बेकायदेशीरपणे हटविणे, चुकीच्या नवीन समित्या स्थापन करणे, वक्फ बोर्डामध्ये कर्मचारी नेमणे, चुकीच्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे व बेकायदेशीर नियुक्त्या करणे..."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

"वरील मुद्यांवर अर्जदार व साक्षीदार डॉ. एम.ए.अझीज तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून जी माहिती मिळाली त्यावरुन खालीलप्रमाणे परिस्थिती दिसून येते.

13(अ) अनियमित जमीन विक्री किंवा अदलाबदल प्रकरणे या संबंधी नांदेड येथील दोन वक्फ संस्थेच्या जमिनीसंबंधीच्या चौकशीअंती उपलब्ध झालेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

13(अ)(1) मक्का शहावली दर्गा, नांदेड येथील सर्व्हे नं. 57, गट नं. 120 मधील 26 एकर जागा हजरत मक्का शहावली, गांधीपुरा, नांदेड या दर्ग्याची असून ही जमीन 13.11.2005च्या बैठकीत बेकायदेशीर ठराव घेऊन अतिशय कमी किंमतीत विकण्यात आली व त्यामध्ये रुपये 50 कोटीचा गैरव्यवहार झाला अशी तक्रार आहे. याबाबत प्राप्त माहितीवरुन असे दिसून येते की, नांदेड येथील मक्का शहावली दर्गा सर्व्हे नं. 57 मधील 28.21 एकर जमीन शहराला लागून आहे. त्यामुळे तिची किंमत फार जास्त आहे. पण दिनांक 30.11.2005मध्ये बोर्डाच्या बैठकीत ही जमीन तालुका लोहा, येथील मौजा कामलंबर व पिंपरवाडी तसेच बोरगाव तालुका हदगाव येथील एकूण 26.22 एकर जमिनीची अदलाबदल केली." हा काय फॉर्म्युला आहे ? हे जादुचे प्रयोग आहेत काय? लोहा डाला और सोना निकला.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. ......... 14:25

श्री.नितीन गडकरी........

नांदेड शहरातील 30 एकर जमिनीच्या बदल्यात लोहा,बोरगावं तालुका हादगांव येथील 26.22 एकर जमिन अदलाबदल केली. तुम्हाला अधिकार आहे का सदर जमीन अदलाबदल करावयाचा ? सन 1995 चा वक्फ कायदा काय सांगतो ? सदर जमीन बिनविक्री अदलाबदल करावयाची असेल तर त्यालाही वक्फ बोर्डाच्या 2/3 मेजॉरिटीचा ठराव पाहिजे. वक्फ बोर्डाच्या एकातरी बैठकीला 2/3 उपस्थिती होती का ? दिलीप कुमार आणि शबाना आझमी बोर्डाच्या बैठकीला कधी आलेच नाहीत. उपरोक्त जमिनींच्या संदर्भात तुम्ही हा जो अदलाबदलीचा ठराव केलेला आहे तो बेकायदेशीर आहे. बोर्डाचे याबाबतीतील अधिकार बोर्डाचे अध्यक्ष आणि सदस्य व लातूरचे जे थोर नेते आहेत ते श्री.चांदपाशा इनामदार जे पूर्वी एक सहकारी होते त्यांना देण्यात आलेले आहेत. श्रेयस इन्फ्रास्ट्रक्चर यांचे भागीदार श्री. सपान, श्री.सुशील कुमार यांनी यासंदर्भात जे पुण्यकार्य केले यांच्याकडून 25 लाख रुपयांची देणगी घेऊन ही जमीन अदलाबदली करण्याची परवानगी दिली. नांदेडमधील जमिनीची किंमत 10 कोटी रुपये ठरवून ती विकत घेतली जाते 10 लाख रुपयांना वक्फ बोर्डाला डोनेशन केली जाते 25 लाख रुपयांना. दर्ग्याच्या जमिनीची किंमत 10 कोटी तर ही जमीन देणगी म्हणून देतांना याची किंमत 10 कोटी 50 लाख रुपये एवढी होती हे सर्व बोर्डाचे अध्यक्ष आणि श्री.चांदपाशा इनामदार यांनी सर्व अधिकार आपल्या हातात घेऊन हा व्यवहार केलेला आहे,असे नितीन गडकरी म्हणत नाहीत तर असे महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेले सरकारी अधिकारी श्री.काद्री यांनी त्यांच्या अहवालामध्ये देखील म्हटलेले आहे.

आता या अहवालातील निष्कर्ष क्रमांक ( 2) 13 (अ ) (क )मध्ये अधार्पूर,जि.नांदेड येथील जमिनींबाबत तक्रार अर्धापूर जमिनींपैकी दर्गा असवदा रसूल 11.16 हेक्टर जमीन व 16.8 हेक्टर जमीन ही बेकायदेशीरपणे भाडेपट्टयाने देण्यात आल्याची शेख हयात इनामदार यांनी केली. शेख हयात इनामदार हे या उपरोल्लेखित जमिनींचे सेवाकरी आहेत. या प्रकरणासंदर्भात ज्यावेळी डॉ.एम.अझिझ यांची साक्ष घेण्यात आली त्यावेळी त्यांनी सांगितले की, सदर जबाबदारी या बोर्डाच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एम.वाय.पटेल यांची आहे,अशा प्रकारे डॉ.एम.ए.अझिझ यांनी आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच,मुटवल्ली म्हणजे आपल्यामध्ये ज्यांना आपण पूजारी म्हणतो. म्हणजे प्रॉपर्टीचे सेवाकरी.

श्री.उल्हास पवार : मुटवल्ली नाही मुतवल्ली

श्री.नितीन गडकरी : मला त्याचा नेमका अर्थ माहीत नाही. ......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सदर भाषा उर्दू असल्यामुळे त्या भाषेमधील जेवढा अर्थ आपल्याला कळला तेवढा शब्द आपण येथे वापरला.

श्री.नितीन गडकरी : A person who is a guardian or custodian of a property is called as "मुटवल्ली " म्हणजेच " सेवाकरी " त्यांनी यासंदर्भात मुटवल्ली हयात नाही म्हणून संचिलित उपलब्ध नाही असे लेखी विधान केले, याबाबत चौकशी निष्कर्ष पूर्वपृष्ठावर देण्यात आलेले आहे. सदर प्रकरणात ते मुतवल्ली हयात नाही असे तहसिलदार अर्धापूर यांनी पत्र क्रमांक 4597 /6 मध्ये म्हटलेले आहे आणि हा रेफरन्स आमच्याकडे आलेला आहे. माननीय मुख्यमंत्री साहेब आपण बरोबर बोलला होता की, या प्रकरणासंदर्भात तुमच्यापेक्षाही जास्त रेफरन्स आमच्याकडे आलेले असतील.

श्री.विलासराव देशमुख : Your efforts are targetted.

श्री.नितीन गडकरी : नाही नाही, मी अद्यापही आपले नाव काढलेले नाही. सध्या ही तर सर्व चिल्लरवाडीच चालू आहे.

श्री.विलासराव देशमुख : Your efforts are targetted and to the point आणि म्हणूनच तर या चर्चेला मजा येत आहे.

श्री.नितीन गडकरी : But you are competent enough to answer my discussion.

श्री. विलासराव देशमुख : होय कॉंपीटंट आहे, म्हणूनच तर येथे उत्तर देण्याकरिता बसलो आहे.

श्री.नितीन गडकरी : Yes, I like it. परंतु माझ्या चर्चेला उत्तर देण्याकरिता तुम्ही कॉंपीटंट आहात, हेच तर काही लोकांना बघवत नाही.

श्री.आ.आर.पाटील : त्या लोकांमध्ये आपलाच क्रमांक पुढे येईल.

श्री.नितीन गडकरी : काय आर.आर.पाटील साहेब तुम्ही पण ! सदर प्रकरणासंदर्भात घडलेल्या या एकूण 189.06 कोटी रुपयाच्या या व्यवहाराला वक्फ बोर्डाने दिनांक 25 मार्च,2006 रोजी मान्यता दिली. या आधारावर भाडेपट्टी करार करण्याचे आदेश दिनांक 12 एप्रिल,2006 ला काढले. हा अधिकार तुम्हाला नाही. तीन वर्षाच्या वर वक्फ बोर्डाची कोणतीही जमीन लीजवर देण्याचे अधिकार कोणालाही नाही किंवा अदलाबदल करण्याचेही अधिकार नाहीत.

यानंतर श्री.कानडे.....

अप्रकाशित / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.................

विक्री करण्याचा अधिकारच नाही. जर तुम्हांला जमिनीची विक्री करावयाची असेल तर बोर्डाच्या 2/3 बहुमताची आवश्यकता आहे. जाहिरात काढून माहिती दिली पाहिजे. पण तसे केले नाही. अल्ला हो अकबर. 25.3.06 रोजी बोर्डाची बैठक झालेली नसताना बैठक घेण्यात आली आणि त्यामध्ये हा ठराव मंजूर झाला. ठराव मंजूर झाला असा खोटा अभिलेख तयार करण्यात आला. हा सर्व अहवाल काद्री समितीने दिलेला आहे. प्रत्यक्ष बैठक झालेली नाही. पण कागदपत्र तयार करण्यात आले. खोटे अभिलेख तयार करण्यात आले. त्या आधारे सर्व व्यवहार पार पाडण्यात आला. खोटी कागदपत्रे तयार करुन बेकायदेशीर भाडेपट्टा करण्यात आलेला आहे आणि संबंधितांची फसवणूक करण्यात आलेली आहे असे स्पष्ट दिसते. या तक्रारीशिवाय बऱ्याच तक्रारींविषयीची माहिती माझ्याकडे आहे. केज,जि.बीड येथील जामा मशीद सर्वे नं. 13/1, 13/2 आणि 17/1 व 17/2 येथील जामा मशिदीच्या मालकीची 10 एकर जमीन बेकायदेशीरपणे अदलाबदल करुन देण्यात आली . तसेच जमिनीचे मूल्यांकन चुकीचे करण्यात आले. अशी तक्रार आरोग्यमंत्री डॉ. विमल मुंदडा यांचे पती श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी केलेली आहे. अंबाजोगाई येथील प्रकरणाची जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन अहवाल दिलेला आहे. जामा मशीद येथील जमिनीचे मूल्यांकन 1 कोटी 50 लाख प्रतिहेक्टर असताना प्रत्यक्ष नोंदीवरुन जमिनीचे मूल्यांकन कमी दाखविण्यात आले आहे. 4 हेक्टर जागेचे मूल्यांकन 4 कोटी रुपये असताना 1 कोटी रुपयात ही दान केलेली आहे. मशीद,दर्गा,इदगाह काय सुरु आहे या सेक्युलर राज्यामध्ये असा प्रश्न पडतो. मौ.सातारा,जि.औरंगाबाद येथील गट नं.304 मधील 24 हेक्टर 41 आर जमीन अदलाबदल करण्याचा प्रस्ताव अन्वर खान यांनी दाखल केला. मौ.आहेर,जि.औरंगाबाद येथील गट नं. 75,76,77 येथील जमिनीची अदलाबदल करण्याचा प्रस्तावासंदर्भात केलेल्या तक्रारीसंबंधी काही कागदपत्रे चौकशी दरम्यान उपलब्ध झाली. त्यावर बोर्डाचे अध्यक्ष श्री.एम.ए.अझीज यांच्या दिनांक 3.11.06 च्या पत्रानुसार अदलाबदल करण्यास मान्यता कळविली. पण त्यामध्ये बोर्डाच्या ठरावाचा कुठलाही उल्लेख करण्यात आलेला नाही. सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावर नमूद केले आहे की, मौ.सातारा. जि.औरंगाबाद येथील जमीन औरंगाबाद शहराला लागून आहे आणि त्याची किंमत फार जास्त आहे. तेव्हा ही जमीन अदलाबदल करण्याचा प्रस्ताव अनियमित आहे. परंतु निर्णय घेतला गेला. अधिसूचना प्रसिध्द न करण्याचा निर्णय घेतला. बोर्डाचे अध्यक्ष

श्री.नितीन गडकरी............

श्री. एम.ए.अझीज यांनी मुंबईच्या कार्यालयात बसून आदेश परस्पर निर्गमित केले आहेत.....

डॉ. एम.ए.अझीज : सभापती महोदय, सातारा येथील जागेबाबत काहीही झालेले नाही. फक्त या जमिनीबाबत आम्हाला ट्रान्सफर करावयाचा आहे. परंतु असे काही झालेले नाही. माननीय सदस्यांकडे जी बरीचशी माहिती आहे त्याबाबत मी खुलासा केलेला आहे. कुठलीही जागा विकलेली नाही. माननीय सदस्यांकडे कुठून तरी आणि काहीतरी माहिती आलेली आहे. सर्व गोष्टींचा मी खुलासा केलेला आहे. आमदारांना पत्रे पाठविली आहेत. मी सोईस्कर उत्तर दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात जी काद्री समिती नेमली होती त्या समितीच्या अहवालाचे मी वाचन करीत आहे. समितीचा रिपोर्ट महाराष्ट्र सरकारला दिलेला आहे आणि सरकारने तो स्वीकारला आहे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझीज : काय प्रश्न उपस्थित केले आणि मी काय उत्तरे दिली त्याच्या प्रती मी सर्व सन्माननीय सदस्यांना वाटल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : आपण जेव्हा भाषण कराल तेव्हा जरुर खुलासा करावा. मी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या काद्री समितीचे निष्कर्ष वाचत आहे. अंबरनाथ मशीद ट्रस्ट, पांढरकवडा, जि.यवतमाळ येथील विश्वस्ताची भानगड, वक्फ बोर्डात कर्मचारी भरतीमध्ये अनियमितता असा हा सगळा अहवाल आहे. या चौकशीत संस्थांचा निधी वेतनाकडे वळविणे हेही निष्पन्नास आले असे त्यांनी लिहिले आहे. कर्मचाऱ्यांना अनियमित वेतनश्रेणी देणे, निधीची अफरातफर, वक्फ बोर्ड कार्यालयाचे मागील तीन वर्षापासून लेखापरीक्षण करण्यात आले नाही. तुम्ही ऑडिट केले नाही हे खरे आहे ना?

डॉ.एम.ए.अझीज : ऑडिटचा संबंध हा प्रशासनाशी आहे. चेअरमनशी संबंध येत नाही. ऑडिटचा विषय माझ्या गळ्यात का घालीत आहात?

श्री.नितीन गडकरी : हे सत्य आहे की, तीन वर्षे ऑडिट झालेले नाही. हे काद्री समितीने अहवालात नमूद केले आहे. मोठ्या प्रमाणात रु.4.15 कोटी इतक्या निधीची अफरातफर झाली. यात बोर्डाचे 7 कर्मचारी गुंतले आहेत. महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्र्यांनी ज्या फाईलवर सही केली त्या काद्री समितीचा हा अहवाल आहे. टेंडरमध्ये अनियमितता होणे हा भयंकर प्रकार आहे. 11 वर्षात चामडे विक्रीपासून दर्ग्याला 79.11 लाख रुपये उत्पन्न मिळाले, त्यातील 53.43 लाख रुपये बोर्डाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वळविण्यात आले. हा खर्च उत्पन्नाच्या 72 टक्के इतका आहे. ही तांत्रिक बाब आहे. पगार दिले असल्यामुळे मी त्याबाबत दोष देत नाही. दर्ग्याच्या उत्पन्नातील 90 टक्केपेक्षा जास्त रक्कम अनधिकृतपणे खर्च करण्यात आली. अध्यक्षांच्या कार्यालयाबद्दल तक्रारी आहेत. मुंबईतील अध्यक्षांचे कार्यालय हे समांतर कार्यालय चालवित आहे.

डॉ.एम.ए.अझीज : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीची माहिती देत आहेत. मॉयनॉरिटी कमिशनचा ठराव झाला. वक्फ बोर्डाचा सुध्दा ठराव झाला. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांना आम्ही असे कळविले की, भारतात जितकी राज्ये आहेत त्या राज्यातील वक्फ बोर्ड त्यांच्या राजधानीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या वक्फ बोर्डाचे कार्यालय मुंबईत असावे यासाठी परवानगी द्यावी. त्यावेळी त्यांनी मंत्रालयात आमच्या कार्यालयासाठी दोन खोल्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझीज..........

मंजूर केल्या. त्यांनी असेही सांगितले होते की, तुम्हाला कार्यालयासाठी कुठेतरी जागा उपलब्ध करुन देऊ. त्यांच्या पत्राची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. वक्फ बोर्डाचे कार्यालय अनधिकृत आहे असे म्हणणे ही चुकीची कल्पना आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने दोन खोल्या दिल्या हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे. परंतु बोर्डाचे मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे आहे. महाराष्ट्र सरकारने या दोन खोल्यांचा वापर मुख्यालय म्हणून करण्याचे अद्याप आदेश किंवा अधिसूचना काढलेली नाही. ती अधिसूचना काढली असेल तर सन्माननीय सदस्यांनी दाखवावी. अध्यक्ष त्यांचे स्वतंत्र कार्यालय अनधिकृतपणे चालवित आहेत. ते आदेश काढतात, कामकाज करतात, त्यांच्या कार्यालयात 3 कर्मचारी कार्यरत आहेत असे काद्री समितीचे म्हणणे आहे. अध्यक्ष त्यांचे कार्यालय अनधिकृतरित्या चालवित असून मुंबईतून अनेक महत्वाच्या नस्त्या आणि कागदपत्रे मागवून स्वत:कडे ठेवून घेतात. सद्यस्थितीत त्यांच्याकडे महत्वाच्या जमिनीच्या हस्तांतरण नस्त्या आहेत. त्यापैकी काही नस्त्या त्यांनी जाळून टाकल्या अशी तक्रार आहे.

डॉ.एम.ए.अझीज : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बिनबुडाचे आरोप करीत आहेत. काद्री समितीच्या अहवालाची सभागृहाला माहिती होणे आवश्यक आहे.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही तुमच्या भाषणात खुलासा करावा. काद्री समिती शासनाने नेमली होती. मी आरोप करीत नाही. त्या समितीचा अहवाल शासनाने स्वीकारला आहे. आता ट्रेलर सुरु झाला आहे. फिल्म कुठे सुरु झाली?

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए. अझिज : महोदय, काद्री समितीच्या प्रत्येक प्रश्नाला मी उत्तरे दिलेली आहेत. त्यासंदर्भात ज्या कॉपीज आहेत त्याचे सुध्दा वाचन या ठिकाणी झाले पाहिजे. आपण सभागृहाला केवळ एकच बाजू सांगता आहात ते चुकीचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय मुख्यमंत्रीसाहेब मी आणि माननीय अनिस अहमद साहेबांची काल सहारा टी.व्ही. वर या मुद्याच्या संदर्भात मुलाखत घेण्यात आली होती.

**उपसभापती** : आपण आपले विचार अजून किती वेळेत पूर्ण करणार आहात?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही. आमच्या बाजूने सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेबच बोलणार आहेत, त्या व्यतिरिक्त अजून कोणीही बोलणार नाही. मी माझे भाषण लवकरच पूर्ण करुन माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना उत्तर देण्यासाठी बराच वेळ देणार आहे.

वक्फ बोर्डाचे अध्यक्ष असतांना त्यांनी बोर्डाचे कार्यालय अनाधिकृतपणे चालविले आहे याची माहिती बाहेर आलेली आहे परंतु यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी अहवाल स्वीकारलेला आहे त्यामुळे त्यांनाच यासंदर्भात आता निर्णय घ्यावा लागणार आहे. चौकशीच्या संदर्भात काद्री कमिटीने माननीय मुख्यमंत्र्यांना काही मुद्दे सूचविलेले आहेत. त्यामध्ये म्हटले आहे की, वरील अनियमितता लक्षात घेता शासनाने वक्फ अधिनियम 1995 मधील कलम 97 अन्वये निदर्शनास आलेल्या गैरव्यवहाराबाबत महालेखापाल, ए.जी. ऑडीट, लेखा परीक्षा यांना 2002 पर्यंतचे लेखा परीक्षण करण्याचे आदेश द्यावेत, म्हणजे सन 2002 पासून ते आतापर्यंत सर्व अनियमित प्रकरणांची सखोल तपासणी होऊ शकेल. वरील विवेचनावरुन एक गोष्ट सिध्द होते ती म्हणजे बोर्डाचे अध्यक्ष म्हणून डॉ. एम.ए. अझिज यांनी संगनमताने आणि हेतुपुरस्सर बोर्डाची मालमत्ता, निधी इत्यादींच्या त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करुन अनेक अनियमितता केलेल्या आहेत. या संस्थेच्या चौकशीमध्ये सर्व सिध्द होऊ शकले नाही म्हणून माझी शिफारस आहे की, या सर्व प्रकरणाची चौकशी राज्य गुप्त वार्ता विभाग ( स्टेट सीआयडी ) यांच्याकडून करण्यात यावी. माननीय उपमुख्यमंत्री साहेब आपण बाणेदार गृहमंत्री आहात त्यामुळे काद्री कमिटीने असे म्हटले आहे की, हे प्रकरण राज्य गुप्त वार्ता विभाग ( स्टेट सीआयडी ) यांच्याकडे देऊन सविस्तर चौकशी करावी. सभापती महोदय, मला माननीय गृहमंत्र्यांबद्दल विश्वास आहे की, आपल्या सारखा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

बाणेदार, स्पष्टवक्ता माणूस कधीही अशा प्रकारची तक्रार आल्यावर एक मिनिटात सीआयडीच्या चौकशीचे आदेश दिल्या शिवाय राहणार नाही. माननीय गृहमंत्र्यांच्या कर्तृत्वावर माझा आणि या सभागृहाचा पूर्ण विश्वास आहे. या विषयाच्या संदर्भात काद्री कमिटीचे पुष्कळ निष्कर्ष आहेत त्या खोलात आता मी जात नाही.

सभापती महोदय, काल मी आणि माननीय मंत्री श्री. अनिस अहमद दोघांचीही सहारा टी.व्ही. वर मुलाखत झाली होती. त्या मुलाखतीमध्ये माननीय अनिस अहमद काय बोलले होते त्यासंदर्भातील सीडी मी माननीय मुख्यंमत्र्यांना देतो त्यांनी ती पहावी अशी माझी विनंती आहे. (अडथळा) सभापती महोदय, माझी माननीय अनिस साहेबांना विनंती आहे की, आपण या विषयाच्या संदर्भात बाहेर जे बोलता ते सभागृहामध्ये सुध्दा बोलले पाहिजे. आपले या विषयाच्या संदर्भात सभागृहात मत प्रदर्शित झाले पाहिजे, दूधका दूध और पानी का पानी झाले पाहिजे, सत्य बाहेर आले पाहिजे. माननीय अनिस साहेबांनी सांगितलेले आहे की,

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..........

महत्वाच्या फाईल्स दडवून ठेवल्या आहेत. विभागाचे सचिव श्री.हुसैन यांनी विनंती केली की, या फाईल्स आम्हाला द्या, त्यास त्यांनी नकार दिला. त्या फाईल्स त्यांच्याकडे आहेत. या प्रकरणातील फाईल्स जाळल्या जातील, पुरावे जाळले जातील, फाईल्स गायब होण्याची शक्यता आहे असा संशय त्यांनी व्यक्त केला की नाही ? या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यांची कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती केली आणि वक्फ बोर्डाचा कारभार सोपविला त्यांनी अशी भीती व्यक्त केली की, या संदर्भातील फाईल्स जाळल्या जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एम.ए.अझीज हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या जवळचे सहकारी आहेत असे म्हणतात. हे वक्फ प्रकरण अतिशय भयंकर आहे. हा बॉम्ब दिल्लीत जाऊन फुटणार आहे. कारण या देशात काँग्रेस पक्षाच्या विरुध्द अल्पसंख्याक समाजाच्या मनात भीती निर्माण होणार आहे. दर्गा, मस्जिद, इदगाह, कब्रस्तान आणि अनाथालय इत्यादी जागा महाराष्ट्रातील नेत्यांनी हडप केल्या आहेत त्यामुळे संपूर्ण हिंदुस्थानातील अल्पसंख्याक समाज काँग्रेस पक्षावर नाराज झाल्याशिवाय राहणार नाही. वक्फचा बॉम्ब श्रीमती सोनिया गांधी यांच्या घरात फुटल्याशिवाय राहणार नाही असा मला दृढ विश्वास आहे. आप आगे बढ़िए, देखिए क्या होता है.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अनिस अहमद यांच्या विरुध्द तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. या तक्रारी सन्माननीय सदस्य डॉ.एम.ए.अझीज यांनी करायला लावल्या असे श्री.अनिस अहमद यांचे म्हणणे आहे. त्या कोणत्या तक्रारी आहेत याची माहिती श्री.अनिस अहमद यांना आहे, तेव्हा त्या तक्रारी मी वाचत नाही. श्री.अनिस अहमद यांच्या विरुध्द ज्या खोट्या तक्रारी केलेल्या आहेत त्याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेला बाणेदारपणे देण्याची संधी श्री.अनिस अहमद यांना मिळालेली आहे. तेव्हा त्यांनी आजच उत्तर द्यावे. त्यांचा आवाज महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील प्रत्येक मुसलमानाच्या हृदयात पोहोचणार आहे. चाटुकारी करने से मंत्रीपद नहीं मिलता है. दुनिया झुकती है, झुकाने वाला चाहिए. मर्द खिलाड़ी है, ताकत से लड़ेगा. हार घालून, फोटो लावून कोणी नेते होत नाहीत.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 14:50

श्री.नितीन गडकरी...

डॉ.अझीज साहेब, आपण मंडळाच्या अनेक महत्वाच्या फाईल्स्, मंडळ बैठकीत स्वत:चे तयार केलेले...(अडथळा) याबाबतीत मला 100 मुस्लीम लोकांचे फोन आले. This is the first time in the history. भिवंडी, मालेगांव येथील मुस्लीम लोकांनी मला फोन करुन सांगितले.

सभापती महोदय, दिनांक 15.3.2007 ला आपल्याकडील सगळी महत्वाची कागदपत्रे, महत्वाच्या फाईल्स ताबडतोब शासनाकडे द्या, असे आदेश शासनाने ॲड.अझीज यांना दिलेले आहेत.

डॉ.एम.ए.अझीज : त्याचे उत्तर मी शासनाला दिलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा कोणता प्रकार आहे ? सहाव्या मजल्यावर मंत्रालय असताना मुख्यमंत्री जवळचे आणि त्यांचे खास आहेत म्हणून मंत्रालयातील महत्वाच्या फाईल्स आमदार निवासाच्या दोन खोल्यामध्ये नेऊन भरुन ठेवायच्या ? हा कोणता प्रकार आहे ? आपल्या बोर्डाचे मंत्री श्री.अनिस अहमद आहेत. Your boss is Anees Ahmed. You have to accept it. जोपर्यंत ते वक्फ खात्याचे मंत्री आहेत, तोपर्यंत आपल्याला कितीही मुख्यमंत्र्यांचा आतून सपोर्ट असला तरी....

डॉ.एम.ए.अझीज : माननीय गडकरी साहेब, आपण वक्फ ॲक्ट वाचावा. माझे बॉस कोण आहेत, ते त्यावेळी आपल्याला कळेल. सेक्शन 97 मध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन आम्हाला काही डायरेक्शन देऊ शकतात, मंत्री नव्हे. सेक्शन 96 चा वापर करुन अशाप्रकारचे डायरेक्शन द्यावयास पाहिजेत. हे स्टॅच्युटरी बोर्ड असून हे बोर्ड राज्य सरकारचे नाही. With due respect to Hon. Chief Minister, या इलेक्टरल रोलमध्ये मुख्यमंत्री इलेक्ट होऊन येतात. माझी डेप्युटी सेक्रेटरीमार्फत चौकशी केली असे म्हणता, त्यासंबंधी श्री.बागुल नावाच्या अधिकाऱ्यांस चौकशी करण्यास सांगितले होते. परंतु या अधिकाऱ्याने माझी चौकशी करण्याचे चक्क नाकारले. मी ही चौकशी करु शकत नाही, असे त्यांनी सांगितले. या चौकशीचे आदेश महाराष्ट्र शासनाने नव्हेतर फक्त मंत्र्यांनी दिलेले आहेत. याबाबत माहितीच्या अधिकाराखाली जेव्हा विभागाला विचारण्यात आले तेव्हा असे सांगण्यात आले की, याबाबत आम्हाला विचारण्यात आलेले नाही. मंत्रिमहोदयांच्या आदेशानुसार काद्री चौकशी करीत आहेत, अशाप्रकारची ही पोझिशन आहे.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आपण जे मंत्रिमहोदयांवर आरोप लावले आहेत, त्याबाबत ते नंतर खुलासा करतील. या मंडळाचे एक सदस्य ॲड.पठाण यांनी मुख्यमंत्र्यांना असे सांगितले की, ॲड.एम.ए.अझिज यांनी कोणतेही आदेश काढू नयेत, मुंबईच्या सर्व फाईल्स मुख्यालयात हस्तांतरीत कराव्यात. याबाबतीत उप सचिव, श्री.अ.हजारे यांनी एक अर्धशासकीय पत्रही लिहिलेले आहे. ॲड.पठाण यांनी लिहिलेल्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, डॉ.एम.ए.अझिज यांनी शासनाचे सर्व आदेश धुडकावून लावले, ते अजूनही अनियमित आदेश काढीत आहेत व एकही फाईल त्यांनी हस्तांतरित केली नाही, त्यांचा कार्यकाळ दिनांक 16.8.2007 रोजी संपणार आहे, त्यापूर्वी ते सर्व फाईल्स नष्ट करतील, म्हणून शासनाने या फाईल्स त्वरित आपल्या ताब्यात घ्याव्यात, अशी कळकळीची विनंती वक्फ बोर्डाचे सदस्य ॲड.पठाण यांनी मुख्यमंत्र्यांना केलेली आहे. सभापती महोदय, ज्या जमिनी देण्यात आल्या, त्याचे गॅझेट मी येथे आणलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, मी माझ्याबरोबर गॅझेट आणले आहे. मला एक कळत नाही हे सर्व जमिनीवर एवढे प्रेम का करतात ? मागे लातुरच्या जमिनीबद्दलही मी बोललो होतो. खरे म्हणजे, एवढे मोठे विश्व आहे, थोडा लोकांचा, कार्यकर्त्यांचाही विचार करा. शासनाने काढलेले हे नोटिफिकेशन आहे. 257, डिस्ट्रिक्ट औरंगाबाद, महाराष्ट्र राजपत्र 3 मे 1976, वैशाख 13, 1895. 257 (2) मस्जिद डिबिलेटेड यार्ड ॲण्ड दरगाह ऑन द सदर्न साईड ऑफ एम.पी.लॉ कॉलेज, ॲरिया 450 x 425 फूट, व्हॅल्यू 2.5.... या ठिकाणी करोड, हजार वगैरे काही लिहिले नाही. तसेच वेस्टला आहे हाऊस ऑफ अब्दुल रहेमान, ॲडव्होकेट, नॉर्थला हाऊस ऑफ तेली, साऊथला महात्मा गांधी भवन, हे या जमिनीच्या बाबतीतील शासनाचे सन 1973 चे गॅझेट आहे. तुम्ही सुप्रिम कोर्टात सांगाल की, या जमिनीचा आणि वक्फ बोर्डाचा काहीही संबंध नाही.

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी हे या ठिकाणी काही माहिती सांगत आहेत. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी मस्जिदचा उल्लेख केला व त्याचे क्षेत्रफळ सांगितले. आजही त्या ठिकाणी मस्जिद जशीच्या तशी आहे. जेवढे क्षेत्र रेकॉर्डवर दाखविले आहे तेवढयाच जागेवर मस्जिद आहे. तेवढया बाबतच ती जागा मस्जिदीची आहे, असे माझ्या माहितीप्रमाणे रेकॉर्डवर आहे. कोर्टाच्या निर्णयाचा त्यांनी जो उल्लेख केला त्याबाबतीत मी माझ्या भाषणात खुलासा करणार आहेच.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी एक विषय सभागृहात मांडत आहेत. ज्यांच्या संदर्भात हा विषय आहे ते सर्व संबंधित सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात जर काही चुकीची माहिती सांगितली तर इतर सन्माननीय सदस्यांना त्यांच्या भाषणात ती चुकीची माहिती दुरुस्त करण्याची संधी मिळणार आहे. सदनाला माझी विनंती आहे की, सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांनी भाषणातील त्यांच्याशी संबंधित मुद्यांची नोंद घ्यावी आणि आपल्या भाषणाच्या वेळी त्याबाबत सदनाला अधिक माहिती द्यावी.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी सातत्याने त्यांच्या भाषणात 'क्या बराबर है की नही ?' 'क्या बराबर है की नही ?' अशा प्रकारचे प्रश्न सन्माननीय सदस्यांचे नांव घेऊन उपस्थित करीत आहेत. सन्माननीय सदस्यांची बोलण्याची स्टाईल वेगळी आहे, त्यांनी ती आता डेव्हलप केली आहे. त्यामुळे उद्देशून बोललेल्या सन्माननीय सदस्यांना प्रत्येक वेळी उठून सांगावे लागते. जर सन्माननीय सदस्यांनी इतर कोणत्याही सन्माननीय सदस्यांचे नाव न घेता सरळ भाषण केले तर हा प्रश्न उपस्थित होणार नाही. प्रत्येक वेळी सदस्याचे नांव घेऊन, "क्या ये बराबर है क्या नही" वगैरे विचारले जाते त्याचे हे परिणाम आहेत.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले ते जरी खरे असले तरी मी सन्माननीय सदस्यांना उद्देशून बोललो म्हणून त्यांनी लगेच उत्तर देणे, अशी सभागृहाची प्रथा नाही. ही औरंगाबाद येथील जमीन सन 1944 च्या हैद्राबाद गॅझेटमध्ये वक्फ बोर्डाची असल्याची नोंद आहे. ज्या फाईलला हे गॅझेट लागले होते ती आता गायब झाली आहे. 1944 मध्ये अब्दुल वहाब यांनी ही जमीन इनाम केली, वक्फ केली. सन 1958 मध्ये जागेचे मूळ मालक अब्दुल वहाब यांच्या नातवाने सदर मालमत्ता विकण्याकरिता बिल्डरबरोबर करार केला. करारनाम्यानुसार ही मालमत्ता विक्री न केल्यामुळे खरेदीदार न्यायालयात गेले. ही जमीन वक्फ बोर्डाची आहे किंवा नाही याबाबत ते कोर्टात गेलेले नाहीत. ज्या अब्दुल वहाब यांच्या नातवाने बिल्डरला जमीन विकली होती त्यामध्ये डिसप्यूट झाल्यामुळे खरेदीदार न्यायालयात गेले. त्यांनी जो खटला दाखल केला आहे तो Special performance of contract या खाली केला आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या प्रकरणावर चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या प्रकरणावर चर्चा उपस्थित केल्यामुळे दुसरी बाजू मांडण्याची देखील संधी मिळाली. चर्चेच्या सुरुवातीला माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी बाबरी मस्जिदचा उल्लेख केल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी असे म्हणाले की, त्याबाबतीत सुप्रिम कोर्टाचे आदेश आलेले आहेत. सुप्रिम कोर्टाच्या आदेशांचा आम्ही आदर करतो. याही केसमध्ये अनेक वेळा वेगवेगळया कोर्टांनी काही आदेश दिलेले आहेत. माझी सभागृहाला आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना एवढीच विनंती आहे की, कोर्टाच्या आदेशाचा रेफरन्स घेण्यास काहीच हरकत नाही. अन्य प्रकरणांमध्ये लागलेल्या निर्णयांचा देखील रेफरन्स घेण्यास काही हरकत नाही. परंतु माननीय न्यायालयाने वेळोवेळी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशांचे आपल्या वक्तव्यामुळे उल्लंघन होणार नाही, अपमान होणार नाही याची सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी काळजी घ्यावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्याकडून कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होणार नाही. हा जो खटला होता तो लघु न्यायालयामध्ये गेला होता. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाबद्दल मी नापसंती व्यक्त केली तर ती गोष्ट चुकीची होईल. बेसिकली हा खटला विक्रीसंबंधीचा होता. टायटल डिस्प्यूटबद्दल हा खटला नव्हता. या खटल्यामध्ये वक्फ बोर्डाला सुध्दा पार्टी केलेले होते. न्यायालयाने सन 1963 मध्ये या खटल्याबाबत निर्णय देतांना आपल्या कक्षेबाहेर जाऊन सांगितले की, प्रिलीमिनरी इश्यूज डिसाईड करतांना हे टायटल डिसाईड केले व त्यावेळी वक्फ बोर्ड मालमत्तेसंदर्भात आपला पुरावा सादर करु शकले नाही. सदर न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात वक्फ बोर्ड अपिलमध्ये गेले नाही. का गेले नाही हे मला माहित नाही. पण वक्फ बोर्ड अपिलमध्ये गेले नाही आणि त्यांनी पुरावेही सादर केले नाही, सन 1944 चे गॅझेटही दाखविले नाही.

डॉ.एम.ए.अझिज : सभापती महोदय.......

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री.एम.ए.अझिज साहेब मला बोलू द्या. तुम्ही माझे मुद्दे लिहून घ्या आणि नंतर त्यासंबंधी बोला. सन 1973 मध्ये महाराष्ट्र शासनाने जे वक्फ गॅझेट तयार केले त्यामध्ये ही मालमत्ता वक्फ बोर्डाची मालमत्ता असल्याचे नोंदविले. मघाशी मी सन 1973 चे गॅझेट वाचून दाखविले. महाराष्ट्र शासनाचे या गॅझेटचे रेकॉर्ड मी आपल्याला दाखवितो. हे त्या जागेचे फोटो आहेत. त्या जागेवर मस्जिद अस्तित्वात आहे. ही मस्जिदची जागा होती. मस्जिदचे काही लोक असे म्हणतात की, ही जागा वक्फ बोर्डाची आहे आणि काही लोकांचे असे म्हणणे आहे की, ही जागा व्यक्तिगत मालमत्ता आहे. तेथे मस्जिद अस्तित्वात आहे. सध्या ती मस्जिद पडिक अवस्थेत आहे. त्यातील काही जागेवर रिझर्वेशन आहे. त्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख या सापळयामध्ये कसे काय अडकले ? हे मला कळत नाही. आता चूक त्यांच्या लक्षात आलेली आहे. माझ्याकडे या जमिनीची रजिस्ट्री आहे. या रजिस्ट्रीमध्ये निर्माण भारती लँडमार्कस् प्रायव्हेट लिमिटेड, 104, परमार चेंबर, संधू वसंत रोड, पुणे ही कंपनी 1956 च्या कंपनी ॲक्ट खाली रजिस्टर झालेली आहे. कंपनीच्या डायरेक्टरांची नावे मी सभागृहाला वाचून दाखवितो. पहिले नाव श्री.दिलीपराव दगडोजीराव देशमुख, श्री.विक्रमसिंग दत्तसिंग चव्हाण, श्री.जगदीश चंद्रनाथ सुर्यवंशी, शेख जुबेर अहमद शेख खुर्शीद अहमद, शेख परवेज अहमद शेख खुर्शीद अहमद, श्री.कृष्णलाल बोधराज नागपाल, श्री.रमेश बोधराज नागपाल, श्री.निलकंठ रमेश नागपाल, श्री.रणजित अशोक धारप असे कंपनीचे 9 डायरेक्टर आहेत. पहिल्या क्रमांकाचे डायरेक्टर आहेत श्री.दिलीपराव दगडोजीराव देशमुख. असो किंवा नसो. परंतु मस्जिदीची जागा असलेली डिस्प्यूटेड लँड तुम्ही विकत घेतली. ही जमीन विकत घेतल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. राजीनामा का दिला ?

यानंतर श्री.गागरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.नितीन गडकरी .....

कर नाही त्याला डर कशाला. मी सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख यांना विचारु इच्छितो की, तुम्ही या कंपनीचा राजीनामा का दिला आहे ? याचे उत्तर तुम्ही नंतर द्या. सभापती महोदय, गॅझेट नोटीफिकेशन काढताना सरकारने एक वर्षाची मुदत दिली होती. एक वर्षाच्या मुदतीमध्ये यावर आक्षेप घेता आले असते. त्यावेळी कोणी काही आक्षेप का घेतले नाहीत ? सेटलमेंट कमीशनरने कायद्यानुसार ही मालमत्ता वक्फ बोर्डाची असल्याची मंजूरी दिली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांनीही मंजूरी दिली आहे. सदरहू मालमत्तेच्या संदर्भात उच्च न्यायालयात अपील दाखल केले तेव्हा टायटल बदलले होते. यास Specific performance of contract असे टायटल दिले होते. त्यावेळी उच्च न्यायालयात सदरहू मालमत्तेच्या टायटलबाबत मुद्दा उपस्थित झाला नव्हता. याबाबत सरकारने उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे जजमेंट सभागृहात सादर करावे अशी मी मागणी करतो. या मालमत्तेच्या टायटलबद्दल दोन्ही न्यायालयात माहिती सादर केलेली नाही. सर्वोच्च न्यायालयात कन्सेंटींग पार्टीने कॉंप्रमाईस करुन सदर जागेची खरेदी विक्री करण्यात आलेली आहे. विक्री पत्राचा वाद होता परंतु याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झालेला नाही. वक्फ कायद्यानुसार प्रसिध्द झालेले गॅझेट सेटलमेंट कमीशनरने कायम केलेले असून ते महाराष्ट्र सरकारच्या रेकॉर्डवर आहे. 2006 मध्ये भारती निर्माण लॅंडमार्क प्रा.लि. कंपनीला वक्फ बोर्डाचे अध्यक्ष श्री.एम.ए.अझीज यांनी नोटीस पाठविली आहे. कोर्टाचे जजमेंट बरोबर असेल तर तुम्ही भारती लॅंडमार्कला नोटीस का पाठविली आहे ?

When you are convinced by it that it is the decision of the Supreme Court and there is a judicious, independent and impartial Supreme Court then Mr.M.A. Aziz, why have you given a notice to the Bharati Nirman Pvt.Ltd. Company and Shri Diliprao Deshmukh ?

वक्फ बोर्डाची जमीन असल्यामुळे त्यावेळी बोर्डाच्या अध्यक्षांनी कंपनीला नोटीस दिलेली आहे. त्यावेळी केलेली कृती बरोबर असेल तर अद्यापपर्यंत बोर्डाने निर्णय घेऊन नोटीस परत का घेतली नाही ? याबाबत वक्फ बोर्डाने ॲड.सतिष गोडसे यांचा कायदेशीर सल्ला घेतला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.नितीन गडकरी .....

सभापती महोदय, याबाबत ॲड.सतिष गोडसे, औरंगाबाद यांनी दिलेल्या कायदेशीर सल्लाचे पत्र मी सभागृहाला वाचून दाखवितो.

"Dear Sir,

With the above reference I have been placed in my hands the relevant documents including the Muntakhat-ul-Aukaf, the other correspondence in respect of the Dargah and the sale deed executed on 21.7.2005, along with the relevant documents. After having gone through in detail the above documents, I have formed my opinion as below.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MAP/ MAP/ SBT/ 15:10

Shri Gadkari contd.

At the outset from the entries in Kitabul Aukaf, the property in question appears to be the Wakf property as from the record; the documents appear to be of 1354 fasli. It further appears that litigation was going on between some parties bearing a Regular Suit No.139 of 1959 for a specific performance of contract. Reference to the judgement delivered in the said suit reveals that the President of Wakf Board, Marathwada as then it was, a party who defended the said suit. It further reveals that a specific stand was taken and issues were also framed bearing Issue No.14 and 15 in respect of the nature of the property. While giving negative findings on these issues, the Hon'ble Court has held that no evidence has been produced by the Defendant President of Wakf Board and as such both these issues have been answered in negative and as a result of which, the property in dispute is held to be not a Wakf property.'

Mr. Chairman, Sir, here it is stated that: "no evidence has been produced by the Defendant President of Wakf Board and as such both these issues have been answered in negative and as a result of which, the property in dispute is held to be not a Wakf property."

डॉ.एम.ए.अज़ीज : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीचे सांगत आहेत ... ते जे काही सांगत आहेत ते 1963 सालचे आहे. आजच्या मुख्यमंत्र्यांशी त्याचा काय संबंध आहे ?

Shri Nitin Gadkari: Sir, what the hon. Member, Dr.M.A. Aziz says is correct. This is a 1963 case and it is not related with Hon. Shri Vilasraoji Deshmukh. मात्र यामध्ये एक गोष्ट सत्य आहे आणि ती म्हणजे वक्फ बोर्डाच्या लोकांनी त्या बाबतची कागदपत्रे कोर्टात सादर केली नाहीत. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... बीबी 2 ...

Shri Gadkari contd. ....

Sir, the opinion further reads as under: "...The Court has further held that the creation of valid Wakf is also not established and therefore it is held that there is no valid Wakf created. I am afraid whether such a finding can be said to be within the jurisdiction of the Civil Court.? However, the fact remains that the finding regarding the nature of the property has been arrived at without any evidence as has been held in the said judgement for paucity of the evidence. The revenue records also make a reference that the property was a Wakf property". माननीय नामदार श्री.नारायण राणे यांच्याकडे असलेल्या महसूल खात्याचे रेकॉर्ड सांगते आहे की, ही वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी आहे. It is a Wakf property. Sir, it is further stated that: " After having considered the record placed in my hands, in my opinion, the property in question is a Wakf property and ought not to have been alienated. The judgement in the Civil suit would not come in the way nor it will operate as a resjudicata as in my opinion the findings recorded are without evidence, jurisdiction and uncalled for. The Chief Executive of the Wakf Board can initiate the action under Section 52 of Wakf Act by issuing notice holding that the alienation is void and not legal. The Wakf Board will have to further challenge the sale deed that the sale deed is void ab initio, and as such the same deserves to be cancelled for this purpose, the Board will have to incur the expenses of court fees which would be to the tune of Rs.3 lakhs. Hence, the opinion is given. " Sir, this opinion is given on 02.09.2005

सभापती महोदय, या कोर्टामध्ये टायटलबद्दल चर्चाच झालेली नाही. मात्र दै.सामनामध्येच केवळ या संबंधातील जाहिरात प्रकाशित झालेली आहे, बाकी इतर कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये ती दिलेली नाही. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... सीसी 1 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, ही कंपनी साधी असल्यामुळे फक्त एकाच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिलेली आहे. परंतु माननीय श्री. अण्णा हजारे यांनी आपल्यावर टीका केली होती. आपण महाराष्ट्रातील प्रत्येक दैनिकामध्ये दिलेल्या जाहिरातीचा हिशेब केला तर तो दीड ते दोन कोटींचा होईल. तेव्हा आपण ते करु शकता. याठिकाणी दै. सामना सारखे वर्तमानपत्र वाचले जात असल्यामुळे या संस्थेने ती जाहिरात दिली असेल.

श्री. नितीन गडकरी : या बाबत मी आपणास उत्तर देतो. या खुर्चीवरुन बोलण्याची माझ्यामध्ये हिंमत आहे. मी काचेच्या घरामध्ये रहात नाही. दादा, मला जाणीव आहे की, मी माझ्या आयुष्यामध्ये साहेबांकडे एखादे रिझर्व्हेशन बदलण्याकरिता कधी गेलो नाही. त्याची योग्य ती किंमत चुकविली आहे. तुम्ही काळजी करु नका. मी 15 लाख रुपये खर्च करुन माननीय श्री. अण्णा हजारे यांचेविरुध्द जाहिराती छापल्या आहेत.

श्री. उल्हास पवार : तुम्ही 2 कोटी रुपये खर्च करु शकता...

श्री. नितीन गडकरी : दादा तुमचा गैरसमज आहे. माननीय श्री. दिलीपराव देशमुख साधे? 80 कोटींची मालमत्ता 7 कोटींमध्ये घेणारे अल्पभूधारक आहेत काय? दादा, तुमची चीड मी समजू शकतो. तुमचा स्वभाव नाही, तरीपण तुम्ही कां नाराज होत आहात?

श्री. उल्हास पवार : मी वस्तुस्थिती सांगितली.

श्री. नितीन गडकरी : तुम्हाला या सभागृहात आपल्या मित्राकरिता काहीतरी बोललो हे दाखववायचे आहे. दादा, तुम्ही चिडू नका. मी तुमचा आदर्श मानतो, तुमचे कौतुक करतो. तुम्ही मोठी माणसे असे कां वागता?

**सभापती** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आपली भाषणाची दोन मिनिटे शिल्लक आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या भाषणामध्ये अडथळा आणला जात आहे. माझ्यावर आरोप करण्यात आला की, मी दीड कोटीच्या जाहिराती दिल्या? हे आपण रेकॉर्डवरुन काढून टाकावे. आणि माननीय सदस्यांनी जर माझ्यावरील आरोप सिध्द केले तर मी राजीनामा देण्यास तयार आहे.

श्री. उल्हास पवार : तुम्ही सामना दैनिकाचा उल्लेख केला त्यामुळे तुम्ही सर्वच दैनिकामध्ये जाहिराती दिल्या असे मी म्हटले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : आम्ही दीड कोटीच्या जाहिराती छापल्या असा तुम्ही उल्लेख केला. सभापती महोदय, माझी बदनामी करणारा दीड कोटींचा उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावा. ती कंपनी गरीब आहे. 7 कोटी रुपये देणारी कंपनी अल्पभूधारकाची आहे. माननीय सदस्य श्री. दिलीप देशमुख यांच्याबाबत माझे मन स्वच्छ आहे. मी त्यांचे नाव जास्त घेत नाही. मी माननीय सदस्य डॉ. अझिज साहेबांचे नाव घेत नाही. सभागृहातील दोन्ही माननीय सदस्य माझे मित्र आहेत. मी संभाळून बोलत आहे, तो माझा स्वभाव नाही. तुम्ही चिडून मला दुसऱ्या ट्रॅकवर घेऊन गेला तर मी सर्व काही सांगण्यास सुरुवात करीन.

श्री. उल्हास पवार : तुम्ही जवाहर सूतगिरणीबाबत या सभागृहामध्ये असेच आरोप केले. त्यामध्ये काहीही निष्पन्न झाले नाही. तुम्ही हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट केले. तरी देखील हायकोर्टाने ते ॲफिडेव्हिट फेटाळून लावले. ज्यांना तुम्ही तयार केले ते बिचारे आज घरी बसले. तेव्हा कृपाकरुन आपण असे करु नका.

श्री. नितीन गडकरी : ॲफिडेव्हिट कुणी केले? दादा तुम्ही आणि मी हा विषय सोडून देऊ. दिल्लीला ते अहमद पटेल साहेब बसले आहेत, माननीय सोनियाजी गांधी बसल्या आहेत, आणि राज्याच्या प्रदेशाध्यक्षा माननीय श्रीमती प्रभा राव बसलेल्या आहेत. तेव्हा सभापती महोदय, दीड कोटीबाबत माझ्यावर करण्यात आलेले आरोप निराधार आहेत ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी इतिवृत्त तपासून घेतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी दीड कोटी रुपये खर्च केल्याचे त्यांनी सिध्द करुन दाखवावे. मी याठिकाणी बोलत आहे याचे कारण असे की, मी यांच्या कचाटयात सापडलो असतो तर यांच्यापैकी एकाही माणसाने मला जीवंत ठेवले नसते. मी दोस्तीचा पक्का आहे. एकदा माननीय श्री. भुजबळ साहेबांनी सांगितल्यानंतर मी नाव घेतले नाही. यांनी माझ्यावर कोर्टामध्ये केस टाकली होती. मी यांची माफी मागितली नाही.

**सभातपी** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आपण मुद्दयावर बोलावे.

श्री. नितीन गडकरी : मी दीड कोटी कोठून आणणार. माझे बँकेतील अकाऊंट एन.पी.ए. झाले आहेत. बँकांच्या नोटीसा माझ्याकडे येत आहेत. सद्या साखरेमध्ये घाटा आला आहे, सर्व

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

बँकाकडे मी अर्ज करीत आहे. मला एखादी एस.आर.ए. योजना द्या. सगळे 60 कोटींचे एन.पी.ए. आहे. साखर कारखान्यांची हालत खराब आहे हे आपणास माहीत आहे. तुम्ही मान्य करता की, 8 कोटींची मालमत्ता 60 कोटींची असावी...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आपले काही महत्वाचे मुद्दे असतील तर ते आपण मांडावेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर जर टीका केली जात असेल तर मी काय करणार? सन 1944 च्या हैद्राबादच्या गॅझेटमध्ये औरंगाबाद शहरातील कॉलेजच्या सर्व्हे क्रमांक 83/91 क्षेत्र 13 एकर 30 गुंठे ही जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची असल्याची नोंद आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू...

असा "सामना" दैनिकामध्ये खुलासा आला. त्यावर कंपनीने याबाबतीत कोणताही खुलासा केलेला नाही. उक्त जमिनीचे मूळ मालक अब्दुल वहाब हुसेन यांच्य मालकीची जमीन होती ती त्यांनी इमानी केली, वफ्क केली. हैद्राबाद गॅजेटमध्ये त्याची नोंद असून कंपनीने मात्र याबाबत खुलासा केलेला नाही. अब्दुल वहाब हुसेन यांचे नातू सय्यद नदिमुल्ला हुसेन यांनी सदर जागेवर 26 ऑक्टोबर 1956 रोजी विजेंद्र हिरालाल काब्रा व इतर लोकांशी करारनामा केला. उत्तरा "उक्त जागा ज्या लोकांना विकण्यासाठी करारनामा केला ते बिल्डर असून ही मालमत्ता विकण्याचा सय्यद नदिमुल्ला हुसेन यांना अधिकार नाही. उक्त करारानुसार श्री. विजेंद्र काब्रा यांनी ती जमीन न विकता ती जमीन परस्पर दिनांक 4 नोव्हेंबर 1957 रोजी जनरल पॉवर ऑफ अटर्नी श्री.शिरीष आसाराम संधानी व लक्ष्मीनारायण अग्रवाल यांना खरेदीदाराने विकली. याचा अर्थ सय्यद नदिमुल्ला हुसेन यांना अधिकार नसतांना खोटे करारनामे केलेले आहेत. सदर व्यवहाराच्या विरोधी विजेंद्र काब्रा आणि सय्यद नदिमुल्ला हुसेन यांनी शिरीष संधानी यांच्यावर खटला दाखल केला हा खटला दिवाणी न्यायालयामध्ये आरसी क्रमांक 139/59 दाखल केला याचा अर्थ जो खटला दाखल केला तो स्पेशिफिक परफॉर्मन्स ऑफ कॉन्ट्रॅक्टकरिता दाखल केला. जागेच्या टायटलकरिता नव्हे.सन 1961 मध्ये नदीमुल्ला हुसेन यांनी वफ्क बोर्डात जाऊन ही जागा वफ्क करण्याकरिता अर्ज केला. याचा अर्थ जमिनीच्या मूळ मालकाच्या कुटुंबाला ही जमीन वफ्क बोर्डाची आहे हे माहीत असल्यामुळे त्यांनी पुनश्च अर्ज 1961 ला अर्ज केलेजा दिसतो. सदर खटल्यात दिवाणी न्यायालयाने दिनांक 29 नोव्हेंबर 1963 व 14 नोव्हेंबर 1967 मध्ये निर्णय दिला. प्रिलिमिनरी इश्यु डिसाईड करताना टायटलचा विषय नव्हता. मालमत्तेचा पुरावा वक्फ बोर्ड सादर करू शकले नाहीत, त्यांनी दिलाच नाही. काय कारण आहे मला माहीत नाही. त्याचबरोबर वक्फ बोर्डाने वर अपीलही केलेले नाही. "सदर कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निकाल हा विजेंद्र काब्रा यांच्या बाजूने दिलेला आहे. परंतु हा निकाल सैय्यद नदीममुल्ला हुसेन यांनी केलेल्या करारनामाची शक्यता प्रत्यक्षात निदर्शनास येते. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिलामध्ये दिनांक 22 नोव्हेंबर 1968 रोजी निर्णय दिलेला आहे. हा निर्णयसुध्दा करारनाम्यासाठी होता, याचे कारण वक्फ बोर्डाला या केसमध्ये पार्टी केलेली नाही. त्यानंतर श्री.शिरीष संधानी आणि इतरांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. या ठिकाणी विजेंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

काब्रा आणि श्री.संधानी यांनी तडजोड केली. There is no decision from the supreme court. It is a compromise between the party related with the contract. It is not the decision of the Supreme Court on the basis of merit who is the owner of the land. The matter was only related with the owner of the land. The matter was related with the contract. हा प्रश्नच येथे येत नाही. सर्वोच्च न्यायालयातसुध्दा नदीमुल्ला हुसेन आणि विजेंद्र काब्रा, शिरीष संधानी एकत्र येऊन न्यायालयापुढे प्रस्ताव सादर केले." दोन्ही पार्टीमध्ये कॉम्प्रमाईज झाले. त्या ठिकाणी सुध्दा जागा विक्रीच्या संदर्भातच प्रतिज्ञा पत्र सादर केलेले आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हा जीआर सुप्रीम कोर्टाच्या निवाड्याच्या संदर्भात सांगतात. It is not the judgement given by the Supreme Court. मला फक्त एकच सांगायचे आहे की, ज्यावेळेला अन्सेंट डिक्री पास केली जाते किंवा कन्सेंट टर्म ज्यावेळेला कोणत्याही कोर्टामध्ये फाईल केली जाते, त्यानंतर डिक्री पास केली जाते. त्यास 'टर्म्स ऑफ कन्सेंट' असे म्हटले जाते. In terms of consensus means the compromise and that is the award given by the concerned court.

श्री.नितीन गडकरी : My Learned Friend, you are absolutely correct and I accept it. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, compromise decree सगळ्यांची झाली. तो टायटल इश्यु नव्हता. तो कॉन्ट्रॅक्टचा इश्यु होता. आपण म्हणता ते बरोबर आहे, मला ते मान्य आहे.

"उपरोक्त आदेशाच्या विरोधात राज्यमंत्री, महसूल यांच्याकडे अपील केले या अपिलावर दिनांक 22-10-1985 रोजी जिल्हाधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला. सन 1973 च्या गॅझेट नोटीफिकेशनमध्ये सदर मालमत्ता वक्फ बोर्डाची असून त्याची दखल घेण्यात आलेली नाही. 10 डिसेंबर 1968 मध्ये न्यायालयामध्ये आरडी 100/1968 मध्ये कोर्ट रिसिव्हर नियुक्त केले. सदर कोर्ट रिसिव्हरने जागेचा पंचनामा करून जमिनीचा ताबा घेतला." डिसेंबर 1968 मध्ये ही जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात आहे, असे खुलाशात म्हटले आहे. ही 1968 सालापासून जागा कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असताना ती कशी इकडे वळली हा संशोधनाचा विषय आहे. माझी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू....

मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यामधून सन्माननीय सदस्य दिलीपराव देशमुख यांनी राजीनामा दिलेला आहे. माझी विनंती आहे की, हे सगळे वक्फ बोर्ड प्रकरण आहे. या महाराष्ट्रामध्ये 23,566 संस्था आहेत आणि 39000 हेक्टर जमिन आहे, त्यामध्ये झालेले हे सगळे गैरव्यवहार...गैरव्यवहार नसतील तर नसतील, हे सगळे प्रकरण आपण सीबीआयकडे चौकशीसाठी द्यावे. कारण वक्फ बोर्डाचा गैरकायदेशीर मामला आहे. आपण निर्दोष आहात आपला काही संबंधच नाही, त्यामध्ये घाबरण्याचे कारण काय आहे ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

या सगळ्या प्रकरणामध्ये मुस्लीम समाजाचा विश्वासघात करण्यात आलेला आहे, कब्रस्तान, दर्गा, इदगाह, अनाथालये यांच्या जमिनी नेत्यांनी वाटून घेतलेल्या आहेत. श्री. नवाब मलिक असे म्हणाले होते की, 4 हजार प्रकरणे आहेत. 1995 मध्ये या जमिनीला अर्बन लँड सिलिंग ॲक्ट लावला आणि या जमिनी जादा ठरविल्या. त्या सगळ्या जमिनी स्वत:ला मुस्लीम समाजाचे हितचिंतक समजणाऱ्या, समाजवादावर बोलणाऱ्या, अल्पसंख्यांकाच्या हितावर एक एक तास भाषण करणाऱ्या मंडळींनी हडपलेल्या आहेत. एकप्रकारे हा मुस्लीम समाजाचा अपमान आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सी.बी.आय.चौकशी करावी. या सगळ्या निर्णयाकरिता ॲडव्होकेट जनरल, निवृत्त न्यायमूर्ती यांचे मत घ्यावे. सत्य महाराष्ट्रातील सर्व जनतेपुढे आले पाहिजे. मी आज माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. आपण काद्री समितीचा अहवाल तीन महिने उशिरा स्वीकारला. सन्माननीय सदस्य डॉ. अझिज म्हणतात की ते चूक आहे. मग सत्य कोण सांगणार ? तुमची समिती म्हणते की, हा अहवाल आहे. मग सत्य काय आहे हे आपण ठरवावे आणि निर्णय घ्यावा. काद्री समितीचा अहवाल चूक आहे असे म्हणावे किंवा बरोबर आहे असे म्हणावे. केंद्राचा 1995 चा वक्फ कायदा आल्यानंतर दहा वर्षात जे गैरव्यवहार झाले ते योग्य आहेत काय ? हे कायदेशीर आहे काय ? हे वैधानिक आहे काय ? हे शरियत आणि मुस्लीम धर्माच्या विरोधी नाही काय ? अशा प्रकारे कब्रस्तानच्या, दर्ग्याच्या जागा नेत्यांनी हडप करणे योग्य आहे काय ? या सगळ्या प्रकरणाची सी.बी.आय.चौकशी आज माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर करावी आणि या प्रकरणाबाबत पूर्ण अहवाल महाराष्ट्राच्या जनतेसमोर तीन महिन्यांच्या आत आला पाहिजे, अशा प्रकारची घोषणा त्यांनी करावी अशी त्यांना विनंती आहे. जर या प्रकरणामध्ये त्यांनी चौकशी केली नाही आणि या प्रकरणात दुरान्वयाने त्यांच्या परिवाराचा संबंध आला तर स्वाभाविकपणे त्यांच्यासमोर संशयाचे गूढ निर्माण होऊ शकते. म्हणून माझी विनंती आहे की, जर माननीय मुख्यमंत्री दोषी नाहीत, श्री. दिलीपराव दोषी नाहीत, डॉ. अझिज दोषी नाहीत तर या सर्व प्रकरणाची सी.बी.आय.चौकशी मान्य करावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

---

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. अझिज बोलतील.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आताच एका सन्माननीय सदस्यांचे भाषण संपले आहे. यानंतर आमच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. याच्याशी ज्या संबंधित व्यक्ती असतील त्यांनी नंतर उत्तराचे भाषण करावे.

श्री. विलासराव देशमुख : याबाबत शासन उत्तर देणार आहे. डॉ. अझिज हे या सभागृहाचे सदस्य म्हणून बोलत आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा छोटासा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनामध्ये जी चर्चा चालू आहे त्यामध्ये सरकार म्हणून माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. संबंधित खात्याचे माननीय मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. औकाफ बोर्डाचे अध्यक्ष या ठिकाणी उपस्थित आहेत. हे सगळे झाले आहे असे निवेदन आमच्यासमोर झालेले आहे. बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांची जबाबदारी आहेच. या ठिकाणी सरकार आणि माननीय मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. यानंतर जर आणखी काही सन्माननीय सदस्यांकडून त्यांच्यासंदर्भात काही निदर्शनास आणले गेले तर ते परत उत्तर देण्यासाठी उभे राहणार काय ?

**सभापती** : आता ते सन्माननीय सदस्य म्हणून बोलण्यासाठी उभे आहेत. अन्य कोणी सदस्यांनी त्यांना रेफर केले तर त्यांचा तो हक्क राहणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ. अझिज यांनी आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझिज ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या ठिकाणी असा आरोप करण्यात आला की, मी मुंबईमध्ये बेकायदेशीर ऑफीस ठेवलेले आहे. हे अगदी चुकीचे आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे साहेबांकडे हे प्रकरण गेले तेव्हा ते म्हणाले की, तुम्हाला आम्ही आमदार निवासमध्ये दोन खोल्या देतो, त्या ठिकाणी तुमचे ऑफीस चालू करा. त्यानंतर आताच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक झाली. त्यांनी मान्य केले की, आम्ही आता वक्फ बोर्डाला जागा देऊ शकणार नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 15:30

(डॉ. एम.अे.अझीज...)

तुम्हाला ज्या दोन खोल्या दिलेल्या आहेत त्या ऑफिस म्हणून राहू द्याव्यात, अशा प्रकारचे आदेश शासनाने दिलेले आहेत. आम्ही जागा उपलब्ध करुन दिली असे जे सांगण्यात आलेले आहे ते चुकीचे आहे.

श्री. नितीन गडकरी : या संदर्भात ऑर्डर्स निघालेल्या नाहीत.

डॉ. एम.अे.अझीज : माझ्याकडे ऑर्डर्स आहेत... सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, कृपा करुन त्यांनी माझ्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये. सभापती महोदय, माननीय मुख्य मंत्र्यांच्या दालनात मिटींग झाली आणि त्यांनी सांगितले की, तुम्ही ऑफिस चालू ठेवा. मराठवाडा सोडून पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईच्या केसेस याठिकाणी डिसाईड व्हायला पाहिजेत. त्यावेळी आमचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पटेल हे होते. ते येथे यावयाचे. त्यांनी बैठका घेऊन कार्यवाही केली. या जागेच्या संदर्भात आम्ही निर्णय घेतलेला नाही. सेक्शन 27 अंतर्गत आम्हाला बोर्डाने काही अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार उच्च न्यायालयानेही मान्य केलेले आहेत. त्या निर्णयामध्ये असे म्हटलेले आहे की, चेअरमन, महाराष्ट्र वक्फ बोर्ड यांनी मॅटर डिसाईड केले पाहिजे. या अधिकारामध्ये आम्ही काहीही करु शकलो असतो. परंतु आम्ही काहीही केलेले नाही. दुसरे असे की, सन्माननीय सदस्यांनी 2/3 मेजॉरिटीचा उल्लेख केला. साधा न्यास असेल तर आपण कोणाला तरी ट्रस्टी करतो आणि त्यासंबंधी त्यांना पत्र पाठवितो की, तुम्हाला अमुक अमुक ट्रस्टचे ट्रस्टी केलेले आहे. हे पत्र पाठविल्यानंतर त्यानी ट्रस्टी होण्याचे मान्य केले पाहिजे. तसे त्यांनी केले तरच ते ट्रस्टी होऊ शकतात. शबाना आझमी, दिलीप कुमार यांनी तसे काही शासनाला कळविलेले नाही. मग त्यांना 2/3मध्ये कसे काय धरणार ?

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, वक्फ संदर्भातील कायदा मी अनेक वेळा वाचलेला आहे. कोणत्या पानावर कोणते कलम आहे हे देखील मी सांगू शकतो. Mr. Chairman, Sir, under Section 27 of the Wakf Act the power is given to the Chairman. It states that: " The Chairman of the Wakf Board of Maharashtra should decide and call hearing and give the decision" वक्फ संदर्भातील कायद्याबाबत मी जे काही सांगत आहे ते सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. एम.अे. अझीज...)

ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. Sir, I would request him to read Section 27 of the Act. The vacancy or a absence of its Members should not stop the proceedings of the Board. पार्लमेण्टरी कमिटीचा संपूर्ण देशामध्ये दौरा होऊन 1995मध्ये हा कायदा करण्यात आला. 1 जानेवारी 1996 पासून या कायद्याची अंमलबजावणी झाली. त्यासंदर्भात राज्य शासनाने नोटिफिकेशन काढले होते. त्यावेळी या कायद्याच्या संदर्भात राज्य शासनाने चॅरिटी कमिशनरला कळवावयास पाहिजे होते की, मुस्लिम ट्रस्टच्या संदर्भात निर्णय देण्याचा अधिकार वक्फ बोर्डाला देण्यात आलेला आहे. अद्यापही चॅरिटी कमिशनर आमच्या केसेस हाताळत आहेत. नागपूर आणि ठाणे येथील चॅरिटी कमिशनरच्या कार्यालयात केसेस चालू आहेत. आता औरंगाबादची जी केस आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यावेळी रफिक झकेरिया हे औकाफ मंत्री होते. त्यांनी मराठवाडा वक्फ बोर्डाला आदेश दिले की, ही केस करा. सन्माननीय सदस्यांनी वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी असा उल्लेख केला. वक्फ बोर्डाकडे कोणती प्रॉपर्टी आहे ? वक्फ बोर्ड हे चॅरिटी कमिशनर प्रमाणे आहे. चॅरिटी कमिशनरकडे कोणती प्रॉपर्टी असते काय ? तर नाही. त्याप्रमाणे वक्फ बोर्डाकडे कोणती प्रॉपर्टी असणार ? जमीन विकणारा मुतवल्ली आणि घेणारे दुसरे लोक असतात. आमच्याकडे वक्फ बोर्डाचे फक्त सुपरव्हिजन करण्याचे काम आहे. मी सांगू इच्छितो की, वक्फ बोर्डाच्या 93टक्के जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. आता ही अतिक्रमणे कोणी कोणी केलेली आहेत याची मी नावे सांगितली तर सभागृहातील वातावरण बिघडेल....(अडथळा) थोडया वेळानंतर मी नावे सांगतो. (अडथळा)...

...नंतर कु. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज.........

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगतो की, औरंगाबाद मध्ये " सिटी प्राईड " या बिल्डींगचे बांधकाम मी उच्च न्यायालयामधून स्टे घेऊन थांबविले होते परंतु शिवसेनेचे आणि भाजपचे कार्यकर्ते असलेले त्यावेळचे मेयर श्री.तनवानी व इतर यांनी तो स्टे उठविला होता त्यामुळे त्या बिल्डींगचे बांधकाम पूर्ण होऊन त्यातील फ्लॅट्सही विकले गेले. परंतु यामध्ये आपण कोणा एका पक्षाला दोष द्यावा, असेही माझे म्हणणे नाही.

श्री.नितीन गडकरी : फक्त शिवसेना आणि भाजपच्याच कार्यकर्त्यांची नावे का घेत आहात ? बाकीच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचीही नावे घेण्यात यावीत, अजून कोणकोणत्या लोकांनी वक्फ बोर्डाच्या जागांवर अतिक्रमण केलेले आहे ? हे देखील या सभागृहामध्ये सांगण्यात यावे.

डॉ.एम.अे.अझिज : यापूर्वी मी बोललो होतो की, गॅझेटमध्ये 400x500 अशा जागा दाखविल्या बाकी जागा गॅझेटमध्ये दाखविलेल्या नाहीत, व आमच्याकडे त्याची माहिती सुध्दा उपलब्ध नाही. सन 1963 साली इस्लामिक स्कूलमधून श्री.रफिक झकेरिया हे मंत्री असतांना त्यांनी ही केस हाताळली होती. सन 1963 साली This is land which is not Inami land so it can not be not a wakf property. त्यानंतर सन 1967 साली पुन्हा तत्कालीन डेप्यूटी कलेक्टर श्री.देशपांडे यांच्याकडे श्री.झकेरिया यांनी या जमिनीच्या संदर्भात अपिल केले होते आणि त्यानंतर पुन्हा हाय कोर्टामध्ये देखील श्री.झकेरिया अपिल केले होते त्यावेळेस सुध्दा यासंदर्भातील निर्णय वक्फ बोर्डाच्या विरोधातच लागला होता. त्यावेळेस सदर प्रॉपर्टीचे मुतवल्ली श्री. हुसैनी त्यांच्याविरुध्द हा निर्णय लागला होता. त्यानंतर पुन्हा एकदा यासंदर्भात हायकोर्टामध्ये अपिल करण्यात आले आणि दरम्यानच्या काळात उप जिल्हाधिकारी यांच्याकडे श्री. झकेरिया यांनी अपिल केले त्यावेळी सुध्दा निकाल त्यांच्या विरोधातच लागला. श्री. झकेरिया यांचे कलिग श्री.बी.जे.खताळ यांनी ही केस चालविली आणि या केसच्या संदर्भात हैद्राबादवरुन दोन विटनेस देखील बोलाविण्यात आले होते. या विटनेसकडे आवश्यक कागदपत्रे नव्हती म्हणून त्यांचे चिफ एक्झामिनेशन झाले. या केससंदर्भात श्री.खताळ साहेबांनी देखील सांगितले की, ही जमीन इनामी नाही म्हणून आपण या जागेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार करु शकत नाही, असा निर्णय झाला त्यानंतर सुप्रिम कोर्टातही जाण्याचा प्रयत्न केला

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज.........

तरी सुध्दा या केसला साधे टायटलही मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत या केसच्यासंदर्भात यानंतर कोण काय करु शकणार ? या प्रॉपर्टीचे सो-कॉल्ड मुतवल्ली श्री. हुसैनी हे होते त्यांनी या जागेपैकी एका जागेचे ॲग्रीमेंट करुन ती जमीन विकून टाकली म्हणून या जागांसदर्भात लोक भांडावयाला देखील यावयाचे. सन 1954 च्या इनामी ॲबॉलिशन ॲक्ट नुसार मंत्रालयामध्ये आजही या जागेंसदर्भातील केसच्या हिअरिंग्ज मिनिस्टर घेत आहेत.

श्री.नितीन गडकरी : कोणते मिनिस्टर हिअरिंग घेत आहेत. ?

डॉ.एम.अे.अझिज : रेव्हेन्यू मिनिस्टर या जागेसंबंधीचे हिअरिंग्ज घेत आहेत. हे झाले औरंगाबादच्या जागेबाबत. परंतु महत्वाचे म्हणजे मुंबईच्या जागांबाबत बोलावयाचे झाले तर मुंबईतील जागांचे फार मोठे विचित्र प्रकरण आहे. त्याचा ठावठिकाणा लागणे कठीणच आहे. मुंबई येथील जागा ही माधवराव शिंदे यांचे फोरफादर यांनी खोजा ट्रस्ट आणि करीम भाईला चक्क पैसे घेऊन विकली आणि म्हणून ही एन्डोमेंटली श्री.माधवराव शिंदे यांची असलेली जागा वक्फ बोर्डाची होऊ शकत नाही. त्याच्यानंतर मग काय ? त्याच्यातील अर्धी जागा महाराष्ट्र शासनाने संपादित करुन घेतली. त्यानंतर राहिलेली 4,000 स्क्वेअर मीटर एवढी जागा आम्ही ऑर्फनेजची आहे म्हणून नोटिफिकेशन्सही काढले. शेवटी त्यांनी सांगितले की, आमच्याविरुध्द ते लोक महसूल न्यायाधिकरणाकडे गेले आणि या न्यायाधिकरणाचा जो निकाल आला त्याप्रमाणे ही वक्फची जमीन नाही. यासंदर्भात इस्लामिक स्कॉलर ऑफ द फॅकल्टी ऑफ लॉ यांच्याकडून ओपिनियन मागितले असता त्यांनी आपले ओपिनियन पत्र लिहून असे दिले की, ही जागा वक्फ बोर्डाची होऊ शकत नाही. तुम्ही याबाबत कोणत्याही प्रकारचा हिशोब करु नका. त्या ठिकाणी आपले एम्प्लॉई श्री. गोडसे म्हणून वकील होते, ज्यांना सी.ई.ओ.साहेबांनी अपॉईंट केलेले होते.

यानंतर श्री.कानडे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य ज्या वकिलांचा उल्लेख करीत आहेत ते बोर्डाचे लीगल ॲडव्हायझर आहेत.

डॉ.एम.ए.अझीज : सभापती महोदय, महिना 10 हजार रुपयावर ते काम करतात.

**सभापती** : लीगर ॲडव्हायझर आहेत त्यांना मानधन दिले जाते की पगार दिला जातो ?

डॉ. एम.ए. अझीज : ते लीगर ॲडव्हायझर नाहीत. आम्ही 10/12 वकील ठेवलेले आहेत त्यातील ते एक वकील आहेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या कारभारासंबंधी आणि त्यासंबंधात केलेल्या आरोपासंबंधी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे सविस्तरपणाने बोलले आहेत आणि त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आहे. आता माननीय सदस्य डॉ. अझीज यांचे म्हणणे देखील शांतपणे ऐकून घेतले पाहिजे. त्यांची मराठी भाषेची अडचण आपण समजून घेतली पाहिजे. ते बोलतात त्याचा शब्दश: अर्थ काढून त्यांना डिस्टर्ब करणे बरोबर नाही. या सदनाच्या माध्यमातून त्यांची बाजू राज्य शासनाच्या आणि जनतेच्या समोर गेली पाहिजे. त्यांना त्यांचे मत मांडू द्यावे.

श्री. नितीन गडकरी : माननीय सदस्य म्हणाले की वकील नोकर आहेत. आम्ही 10/12 वकील ठेवलेले आहेत. वकील नोकर आहेत की मानधनावर आहेत की पगारावर आहेत याचा खुलासा करावा.

श्रीमती उषाताई दराडे :वकिली हे एक लीगल प्रोफेशन आहे. वकील नोकरीसाठी ठेवलेले आहेत हा शब्दप्रयोग बरोबर होणार नाही तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

**सभापती** : माननीय सदस्यांचे म्हणणे तसे नाही. त्यांचे मराठी मर्यादित असल्यामुळे असा शब्दप्रयोग झाला असेल.

डॉ.एम.ए.अझीज : सभापती महोदय, वकिलांच्या अनुषंगाने अनवधानाने मी बोललो असेन. ते शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकू या. दुरुस्ती करावयाला हरकत नाही. मी तयार आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य मराठीतून बोलत आहेत. वकील ठेवले आहेत हा शब्द त्यांनी त्या अर्थाने वापरला नाही असे आपणही म्हणाला आहात.

डॉ.एम.ए.अझीज : ठीक है. मैं हिंदीमें बोलता हूँ.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.एम.ए.अझीज यांनी वकिलांच्या अनुषंगाने जे वक्तव्य केलेले आहे ते रेकॉर्डवरुन वगळण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय सदस्य डॉ.अझीज यांना जे अभिप्रेत आहे ते त्यांच्या भाषणात मराठी भाषेतून बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत याचा अभिमान वाटला पाहिजे. त्यांच्या बोलण्यातून झालेली चूक आपण सभापती या नात्याने मान्य केली. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी त्यांना हिंदी भाषेतून सुचवित आहेत याचे आश्चर्य वाटते.

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्य डॉ.अझीज खुलासा करीत आहेत. अंबानी यांच्या जमिनीबद्दल इतक्या मोठ्या भाषणामध्ये सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी उल्लेख केला नव्हता. ज्याचा उल्लेख झाला नाही त्याचा खुलासा का करीत आहेत? उल्लेख टार्गेटेड होता. इतक्या मोठ्या भाषणात अंबानींना वगळले होते. जो उल्लेख झाला नाही त्याचा खुलासा का करीत आहेत?

श्री.नितीन गडकरी : मी फक्त 5 प्रकरणांचा उल्लेख केला आणि 19 प्रकरणे सोडून दिली. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांची इच्छा असेल तर मी 19 प्रकरणे वाचण्यास तयार आहे.

श्री.आर.आर.पाटील : ज्याचा उल्लेख केला नाही त्या संदर्भात खुलासा करण्याची आवश्यकता नाही. आपल्याला राग येऊ नये. आपल्याबद्दल मी कोणताही आक्षेप घेतला नाही. अंबानींचा मुद्दा का उपस्थित केला नाही हा आक्षेप नाही. मी आक्षेप घेऊ शकत नाही. जो मुद्दा उपस्थित झालाच नाही त्याचा खुलासा सन्माननीय सदस्य का करीत आहेत?

श्री.नितीन गडकरी : एका दिवसात अंबानींची सर्व रिझर्व्हेशन्स कशी बदलली हे तुमच्या बाजूला विचारुन घ्या.

श्री.विनोद तावडे : एमएमआरडीएकडून बी.के.सी.मध्ये 4 चा एफएसआय कसा दिला?

श्री.आर.आर.पाटील : अंबानींच्या नावाच्या उल्लेखाबद्दल माझा काही आक्षेप नाही. आपण समजून घ्यावे. आपल्याबद्दल माझा आक्षेप नाही. सदनामध्ये जे मुद्दे उपस्थित झाले तेवढ्यावरच माहिती दिली जावी. सदनाचा वेळ जाऊ नये. सदनामध्ये अशी प्रथा आहे की, जे मुद्दे उपस्थित केले जातात तेवढ्याच मुद्यांना उत्तरे दिली जातात. सन्माननीय सदस्य डॉ.अझीज सदनाचा वेळ घेत आहेत असा माझा आक्षेप आहे. आपण न उपस्थित केलेल्या मुद्यांवर सन्माननीय सदस्य का बोलतात यावर माझा आक्षेप आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : अंबानींना एसईझेड मंजूर केला त्याबद्दल बोलाल का?

श्री.दिवाकर रावते : या सदनामध्ये मी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सुरुवातीला विनंती केली होती की, आमची सर्वांची भाषणे झाल्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.अझीज यांनी उत्तर द्यावे. त्यावेळी सांगण्यात आले की, सन्माननीय सदस्य डॉ.अझीज हे सदनाचे सदस्य म्हणून बोलण्यास उभे आहेत. सन्माननीय उपमुख्यमंत्री म्हणाले की, जे मुद्दे उपस्थित केले नाहीत त्या संदर्भात का उत्तरे दिली जात आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.अझीज हे उत्तर देण्यासाठी उभे नाहीत. सदनाचे सदस्य म्हणून ते सदनाला माहिती देत असतील तर त्यांच्या भाषणात व्यत्यय आणू नये.

श्री.आर.आर.पाटील : ते सदनाचे सदस्य म्हणून उभे असले तरी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष म्हणून बोलत आहेत.

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य डॉ.अझीज यांना सदनाचे सदस्य म्हणून बोलण्यास परवानगी दिली होती.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना एवढेच सांगावयाचे होते की, या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले होते तेवढयाच मुद्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी स्पष्टीकरण द्यावे, यापेक्षा त्यांना अजून काहीही बोलावयाचे नव्हते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्यावर हेत्वाआरोप झालेले आहेत.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी पुन्हा एकदा खुलासा करु इच्छितो की, मला कोणावरही हेत्वाआरोप करावयाचे नव्हते. मला एवढेच म्हणावयाचे होते की, या ठिकाणी जेवढे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत तेवढयाच मुद्यांच्या संदर्भात स्पष्टीकरण करावे, एवढेच मला सांगावयाचे होते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अंबानीचे प्रकरण का काढले नाही असे मला मुळीच म्हणावयाचे नव्हते. सदनाचा किमतीवेळ वाया जाऊ नये यासाठी या ठिकाणी जेवढे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत तेवढयात मुद्यांचे स्पष्टीकरण करावे एवढेच मला म्हणावयाचे होते. यापेक्षा मला दुसरे काहीही म्हणावयाचे नव्हते. माझा कोणताही हेतू नसतांना आपल्या नाकाला मिरच्या का झोंबल्या हे समजत नाही. यासंदर्भात माझा हेतु अगदी शुध्द होता.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

( सभागृहातील विजेचा पुरवठा खंडीत होतो. साधारणत: अर्ध्या मिनिटांनी सभागृहातील विजेचा पुरवठा पूर्ववत होतो.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात अंधार का झाला याचा खुलासा सभागृहाला होणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला सुरुवातीला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा होता. सर्व सदस्यांची भाषणे झाल्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए. अझिज यांना बोलू द्यावे असे मी सांगितले होते परंतु ते आमदार म्हणून आपले विचार मांडत आहेत असा आपण निर्णय दिल्यामुळे आम्ही काही बोलू शकलो नाही. कारण तो आपला निर्णय होता. कारण सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज हे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष आहेत. या ठिकाणी जे आरोप झ ाालेले आहेत तसेच अजून ब-याच सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज यांना नंतर विचार व्यक्त करण्याची संधी द्यावयास पाहिजे अशी मी विनंती केली होती परंतु ती विनंती आपण मान्य केली नाही. ....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

आता डॉ. अझिज आमदार म्हणून बोलत आहेत की, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष म्हणून बोलत आहेत? सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. एम.ए.अझिज हे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष असल्यामुळे तसेच अजून ब-याच सन्माननीय सदस्यांना या विषयावर आपले विचार व्यक्त करावयाचे असल्यामुळे तसेच सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालावे यासाठी या चर्चेला उत्तर कोण देणार आहे?

**सभापती** : सदनाचे सन्माननीय सदस्य म्हणून मी डॉ. एम.ए.अझिज यांना बोलण्याची संधी दिलेली आहे त्यामुळे त्या मर्यादेतच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

यानंतर डॉ. एम.ए.अझिज यांचे भाषण श्री. शर्मा यांच्याकडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

डॉ. एम.ए. अझीझ : मेरे ऊपर ऐसा आरोप लगाया गया है कि पुराने मुतवल्ली को मैंने बदल दिया है. मुझे यह बताना है कि ऐसे मुतवल्ली जिन्होंने वक्फ बोर्ड की जगह बेच दी है या वहां पर अतिक्रमण किया है, ऐसे मुतवल्ली को हटाने का वक्फ के हित में बोर्ड के चेयरमेन को अधिकार है. ऐसे मुतवल्ली को मैंने हटाया है और ये लोग मेरे खिलाफ कोर्ट में गए हैं. मुंबई हाईकोर्ट के अन्दर मैं 49 केस लड़ रहा हूँ. मैं आपको यह बताना चाहूँगा कि आज भी हाईकोर्ट में ऐसी याचिका है कि यह वक्फ है या ट्रस्ट है, आज तक इसका निर्णय नहीं हुआ है. इस स्थिति में कुछ ऑर्डर कभी हम देते हैं तो चॅरिटी कमिश्नर उनको चेलेंज करता है और कभी हम चॅरिटी कमिश्नर के ऑर्डर को रोकते हैं. यह आज की परिस्थिति है.

सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. गडकरी जी ने बताया कि जब पार्लियामेंटरी कमेटी आई थी तब बाफना ने इनको पेपर्स दिए हैं. बाफना के पास हमारी करोड़ों रुपए की प्रॉपर्टी है. इसकी एक चौथाई प्रॉपर्टी को हमने बोर्ड में लेकर हमने ऐसा निर्णय लिया है कि 1 लाख रु साल और 5 लाख रुपए डोनेशन और जितना कन्सट्रक्शन होगा, उसका 7 रुपए प्रति वर्ग फुट के हिसाब से वक्फ बोर्ड को मिलेगा. हमारे इस डिसीजन के बारे में सेन्ट्रल वक्फ बोर्ड ने बाकी चेयरमेन को बताया कि महाराष्ट्र के चेयरमेन की तरह आपको काम करना है. आपने बाफना की मिसाल दी है, बाफना के पास करोड़ों रुपए की प्रॉपर्टी है. वह 10 हजार रुपए वक्फ बोर्ड को नहीं देता है, वह मुतवल्ली को देता है. इस बात का उदाहरण यहां पर किस कारण से दिया गया, यह आप जान सकते हैं. नांदेड़ की प्रॉपर्टी की बात यहां पर की गई. मक्कावली की जमीन के बारे में मैं आपको बताना चाहता हूँ कि इस जमीन की सेल डीड 5 बार हुई है. वहां पर अतिक्रमण हो गया है. वहां पर दलित लोगों की कॉलोनी है. वहां पर जो ट्रस्टी हैं, उनके पास खाने का इन्तजाम नहीं था. वे हमारे पास प्रपोजल लेकर आए कि हमें खाने को नहीं मिल रहा है तो हम मस्जिद क्या देखेंगे, दरगाह क्या देखेंगे. मेरे सी.ई.ओ. ने वहां पर जाकर मुआइना किया, उसके बाद मैं गया. मेरे जाने के बाद वहां पर तलाठी और तहसीलदार ने जाकर वेल्यूएशन किया. उसके बाद में वक्फ बोर्ड ने दिया है. इसमें एक मुद्दा यह है कि अगर वक्फ की प्रॉपर्टी से कोई फायदा नहीं है, कोई इनकम नहीं है तो उसको एलीमिनेट कर सकते हैं, उसको बेच सकते हैं, बशर्ते कि वहां पर मस्जिद, दरगाह और कब्रिस्तान न हों. अगर वहां

. . . KK 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अझीझ जारी ...

पर यतीमखाना है तो उसको बेच सकते हैं. अदला-बदली की बात यहां पर की गई है तो उसके बदले में इरीगेटेड जमीन उसको दिलाई है, उससे उसके बच्चे पल रहे हैं. मंशे वक्फ अगर पूरा नहीं होता है, उसका हेतु अगर पूरा नहीं होता है तो वह वक्फ में नहीं रह सकता है. ऐसा एक्ट के अन्दर है. लोग पहले खाएंगे, पिएंगे, उसके बाद दरगाह को देंगे. मेरा पद चॅरिटी कमिश्नर के समकक्ष है. The decisions of the Charity Commissioner are challenged in the Court and my decisions can be challenged in the specially constituted Wakf Tribunal. वक्फ ट्रिब्यूनल 1983 के तहत महाराष्ट्र सरकार ने यह अधिकार दिया है कि केवल संबंधित पार्टी ही नहीं, बल्कि आम आदमी भी मेरे डिसीजन को कोर्ट में चेलेंज कर सकता है Sir, what is the interest of the Hon. Minister to interfere in the working of the Board? If you look at the provisions of the Wakf Act and it is clearly written in clause 51 that if the Hon. Minister issues such orders, they should be quashed. It is written in the Act.

Shri Nitin Gadkari: Is it correct, Mr. Anees Ahmed?

डॉ. एम.ए. अझीझ : सभापति महोदय, उसके बाद में एक अदला-बदल का मामला है, दूसरी एक जगह की बात है. वह जगह 1 लाख रुपए साल पर 3 साल के लिए दी गई. इसके बारे में हमने केस किया कि तो हाईकोर्ट ने आदेश दिया कि मुतवल्ली 1 साल के लिए ही दे सकते हैं, 3 साल के लिए नहीं.

सभापति महोदय, मेरे ऊपर ये जो आरोप लगाए गए हैं, उर्दू में एक शेर है :

"वह बात सारे फसाने में जिसका जिक्र न था,
वह बात उनको बहुत नागवार गुजरी."

. . . भाषण जारी, नंतर तालेवार

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SBT/ पूर्वी श्री शर्मा.. डॉ. एम.ए. अझिज ..... 16:00

जहां तक जामा मस्जिद की जगह की बात है, वह अनक्लेम जमीन थी. उस जमीन को कोई भी लेने के लिए तैयार नहीं था. उसके बाद कलेक्टर ने कहा कि इस जमीन को अटेच करो. उसके बाद हमने उस जमीन के लिए मुतवल्ली रखा. उसके बाद एक्सचेंज का प्रस्ताव आया. इस प्रस्ताव के विरोध में ट्रेब्युनल में मामला दाखिल किया गया. ट्रेब्युनल में इस प्रस्ताव के खिलाफ चेलेंज किया गया. इस प्रकार का नियम है कि वक्फ़ बोर्ड के किसी फैसले के खिलाफ मामला दाखिल करना हो तो पहले ट्रेब्युनल के सामने जाना चाहिए.

सभापति महोदय, सातारा की जमीन के बारे में आरोप लगाया गया. मैं यह कहना चाहता हूं कि आरोप लगाने से पहले पूरी जानकारी प्राप्त करनी चाहिए. क्योंकि सातारा की जमीन के बारे में हमने कोई निर्णय नहीं लिया है. वह एक सीईओ है, जो क्वालिफाई नहीं है, महाराष्ट्र सरकार के खिलाफ है, फिर भी उसे वक्फ बोर्ड में भेजा गया है. मैं यह बताना चाहता हू कि इस जगह की डील नहीं हुई है. जिस जगह के बारे में डील नहीं हुंई है, उसका भी उल्लेख किया जा रहा है.

सभापति महोदय, इस प्रकार के बिना आधार के आरोप लगाए जा रहे हैं, इससे मुस्लिम समाज में यह संदेश जा रहा है कि वक्फ बोर्ड अपनी जमीन बेच रहा है. कोई भी जमीन वक्फ बोर्ड के बाप की नहीं है.

श्री नितीन गडकरी : सभापति महोदय, माननीय सदस्य ने अभी कहा कि कोई भी जमीन वक्फ बोर्ड के बाप की नहीं है. मेरा यह अनुरोध है कि " बाप " शब्द का उल्लेख निकाल दिया जाए.

**उपसभापती** : आपण त्यांची भावना समजून घ्या व त्यांना बोलू द्या.

डॉ. एम.ए. अझिज : सभापति महोदय, इस तरह के जो आरोप लगाए जा रहे हैं कि वक्फ बोर्ड जमीन बेच रहा है, सही नहीं है. वक्फ बोर्ड ने अपनी कोई भी प्रापर्टी बिना कायदा बेची नहीं है और जमीन बेचने का सवाल ही पैदा नहीं होता. वक्फ बोर्ड ने अपनी कोई प्रापर्टी बेची नहीं है. चॅरिटी कमिश्नर ने बेची है. अंबरनाथ की जमीन के बारे में कहा गया. उच्च न्यायालय का फैसला हुआ है. उच्च न्यायालय ने इस मामले में स्टे दिया है. मैं एक उदाहरण देता हूं. करीमभाई ट्रस्ट का मुस्लिमों से कोई संबंध नहीं है. खोजा मुस्लिम,बेवा, अंधा, लंगड़ा ऐसा उल्लेख है. मुस्लिम का कोई उल्लेख नहीं है. लेकिन शहर में यह वातावरण फैलाया जा रहा है कि..

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी : मैं यह बताना चाहता हूं कि खोजा भी मुस्लिम में आते हैं.

डॉ. एम.ए. अझिज :मैं यह बताना चाहता हूं कि खोजा मुसलमान .02 प्रतिशत भी नहीं है. मैं यह बताना चाहता हूं कि इस तरह से आरोप लगाने से मुस्लिम समाज में यह संदेश जा रहा है कि वक्फ बोर्ड अपनी करोड़ों रुपये की प्रापर्टी बेच रहा है. इस प्रकार के आरोपों से वक्फ बोर्ड की बदनामी हो रही है. बिना आधार के आरोप करना ठीक नहीं है. इस प्रकार के बिना आधार के आरोप लगाने का परिणाम यह होगा कि वक्फ की प्रापर्टी डेवेलप करने के लिए कोई तैयार नहीं होगा. इतना ही मुझे कहना है. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

..........

यानंतर श्री.रोझेकर.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ही अडीच तासांची चर्चा होती. चर्चा दुपारी 2.00 वाजता सुरु झाली आहे. चर्चा सुरु होऊन आता दोन तास झाले आहेत त्यामुळे आता आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर सुरु करु. अल्पकालीन चर्चेसाठी अडीच तासांचा कालावधी असतो. चर्चा सुरु करतांना मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, आमच्या पक्षाकडून मी स्वत: व आणखी केवळ 1/2 सदस्य बोलतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहात अनेक वेळा अशा प्रकारची चर्चा झालेली आहे. अनेक वेळा चर्चेची वेळ वाढवून देण्यात आली आहे. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांचीही चर्चा करण्याची तयारी आहे. त्यामुळे माझ ी विनंती आहे की, चर्चेची वेळ वाढवून देण्यात यावी.

**उपसभापती** : या चर्चेचे गांभीर्य आता संपून गेलेले आहे. कुणीही गांभीर्याने चर्चा करीत नाही. काय गांभीर्य आहे ? मला चर्चा सुरु ठेवण्यास कुठलीही अडचण नाही. तुम्ही मला जास्त सोयीचे आहात म्हणून चर्चा संपवावी, अशी मी विनंती करतो आहे. सभागृहाचे नेते, सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांना काही म्हणणे मांडावयाचे असेल तर ते त्यांनी मांडावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना विचारण्यात आले होते, परंतु ते प्रदीर्घ बोलत होते. सुरुवातीला अल्पकालीन चर्चेची वेळ माननीय सभापतींकडून सांगण्यात आली होती. सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी हे नेहमी सत्य बोलतात, नियमाला धरुन बोलतात तसेच दिलेला शब्दही पाळतात. शब्दाला पक्का असणारा विदर्भवीर एकच आहे, हेच आपण आपल्या भाषणात तीन वेळा सांगितले आहे. चर्चेसाठी वेळ वाढविणे हे आम्ही महत्वाचे मानत नाही. परंतु, शब्दाला पक्क्या असणा-या माणसाला बट्टा लागू नये, याची मला अधिक चिंता आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे मित्र माझ्या इज्जतीची किती चिंता करतात, हे बघून मला अतिशय समाधान वाटले. मी या सभागृहाचा 18 वर्षे सदस्य आहे. अल्पकालीन चर्चेची वेळ सत्तारुढ व विरोधी पक्षाच्या सम्मतीने अनेक वेळा वाढविण्यात येते. हा अतिशय महत्वाचा विषय आहे, करोडो लोकांच्या भावनेचा प्रश्न आहे, या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांना बोलावयाचे आहे, सन्माननीय सदस्य, श्री.दिलीप देशमुख यांनाही आपले म्हणणे मांडावयाचे आहे आणि

श्री.गडकरी............

माननीय मंत्र्यांनाही उत्तर द्यावयाचे आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, उदार अंत:करणाने चर्चेची वेळ आपण वाढवून द्यावी. सरकार चर्चेला का घाबरत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी बहुतांशी सर्व मुद्दे मांडलेले आहेत. पुन्हा पुन्हा त्याच मुद्यांची पुनरावृत्ती करुन सदनाची वेळ का घेता ? सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरींसारख्या अभ्यासू सदस्याने एखाद्या विषयावर विस्तृत चर्चा केल्यानंतर मागे काही शिल्लक रहात असेल, असे मला वाटत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अद्याप अनेक सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांचा अनुभव व अभ्यास पहाता भारतीय जनता पक्षात आपले वजन त्यांच्यापेक्षा जास्त असले तरी त्यांच्या तोडीचे मुद्दे आपण मांडू शकत नाही, त्यामुळे आपण त्यांची बरोबर करु नका.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांच्या भाषणात काही मुद्दे राहून गेल्याची आठवण आपणच करुन दिली आहे. आम्हालाही आमचे म्हणणे मांडू द्या.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आमचा आजपर्यन्तचा अनुभव असा आहे की, एकदा सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी बोलल्यानंतर कुठलेही मुद्दे शिल्लक रहात नाहीत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आज केलेल्या भाषणात या विषयावरील केवळ 30 टक्के मुद्दे आलेले आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी उदार अंत:करणाने सांगत आहेत की, ते जे काही बोलले त्यामध्ये केवळ 30 टक्केच मुद्दे आलेले आहेत.

श्री.आर.आर.पाटील : म्हणजेच ते जे बोलले त्यात 30 टक्के मुद्दे होते व बाकीचे सर्व निरर्थक होते, असे आम्ही मानतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री अगोदर सांगतात की, एखाद्या विषयावर मी बोललो की, मुद्दे शिल्लक रहात नाहीत व आता असे म्हणतात की, माझ्या भाषणात मुद्देच नाहीत. मला याची कल्पना आहे की, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना किती आनंद

..3.........



SRR/ MAP/ 16:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी............

झाला आहे. त्यांच्या चेह-यावर मला समाधान दिसून आले. पहिल्यांदा आयुष्यात त्यांचा एवढा प्रफुल्लित चेहरा मी बघतो आहे.

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी आपली भाषणे एवढी लांबवू नयेत. नाही तर वक्फ बोर्ड परवडले पण ती भाषणे नकोत, असे वाटू लागेल.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी त्याच मुद्यांची पुन्हा पुन्हा उजळणी होऊ नये, अशी विनंती केली. सभागृहातील सदस्यांना त्यांनी असे सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बोलल्यानंतर इतर सन्माननीय सदस्यांकडे मुद्देच शिल्लक नसतात. उपमुख्यमंत्री श्री.रा.रा.पाटील यांच्या वक्तव्याचा आदर ठेवून सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जे मुद्दे मांडलेले नाहीत आणि त्यांच्या कल्पनेतही जे मुद्दे नाहीत ते मुद्दे मांडण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. भ्रष्टाचाराची बाजू चारही बाजूंनी विळखा घालून बसलेली आहे, असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांचे काय टारगेट होते, ते मला माहीत नाही. कारण माननीय मुख्यमंत्री महोदय जागेवर बसून टारगेट-टारगेट असे बोलत होते. माझे टारगेट काहीच नाही. अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी माननीय पंतप्रधानांनी काही तरी केलेले आहे, त्याबाबतची लेखी माहिती मला पिजन होलमध्ये मिळाली. तुम्ही माहिती दिल्यामुळे आता आम्हाला सुध्दा अल्पसंख्यांकांची चिंता करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, या विषयासंदर्भात माझा खास अभ्यास आहे, असे मी म्हणणार नाही. या विषयासंदर्भात मी अभ्यासही केलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना जेवढया झेरॉक्स कॉपी मिळाल्या त्यातील एकही कॉपी मला मिळाली नाही. संबंधितांनी मला झेरॉक्स कॉपी दिली नाही तर मी काय करणार ? त्यांनी मला झेरॉक्स कॉपी दिली असती तर मी त्यांची बाजू मांडली असती.

सभापती महोदय, रविवारच्या लोकसत्ता वृत्तपत्रातील "दुखणे वक्फचे" हा लेख माझ्या वाचण्यात आला आणि माझी उत्सुकता चाळली गेली की, वक्फचे दुखणे काय असू शकेल. श्री.अजित गोगटे यांना मी धन्यवाद देतो. श्री.अजित गोगटे यांनी वक्फ बोर्ड आणि सरकार या दोघांचेही चुकले या मथळयाखाली वक्फ बोर्ड म्हणजे काय ? वक्फ बोर्डाची जमीन कशी असते ? त्याचा कायदा काय ? याबाबत आमच्यासारख्या महाराष्ट्रातील तमाम मराठी वाचकांच्या मनात निर्माण झालेल्या शंकेबद्दल त्यांनी व्यवस्थित खुलासा केला. वक्फ बोर्ड म्हणजे काय आणि वक्फ बोर्डाचा कायदा काय ? यासंदर्भात त्यांनी खुलासा केलेला आहे. कारण आम्ही कुराण वाचत नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी उल्लेख केल्याप्रमाणे मुस्लीम धर्म आणि शरियत बद्दल

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .......

आम्हाला काही माहिती नाही. आम्हाला माहीत असलेला शरियत असा आहे की, चोरी केली तर हात तोडले जातील, महिलांकडे वाकडया नजरेने बघितले तर फासावर चढविले जाईल. दुबई व इतर मुस्लीम राष्ट्रांमध्ये मुस्लिमांकरिता कडक कायदे आहेत, असे आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचतो. तो धर्म यांना मान्य नाही. भारतामध्ये हे मोकाटपणा करुन कधी आमच्या घटनेचा, कधी शरियतचा वापर करुन मौज-मजेने राहतात. त्यामुळे तुम्ही जो उल्लेख केला त्याबाबत मला माहिती नाही. दर्गा, इदगाह, मस्जिद, कब्रस्तान अमुक-तमुक हे इतके मर्यादित आहे की, आपण तेथे जात सुध्दा नाही. श्री.अजित गोगटे यांनी आमचे जे प्रबोधन केले ते आम्हाला महत्वाचे वाटते. त्यांनी त्यामध्ये एक फोटो छापलेला आहे. खरे म्हणजे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मध्येच उठावयास नको होते. जे आम्ही विचारत होतो, त्याचे उत्तर आम्हाला मिळत होते. आता ते उत्तर सरकार म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना द्यावे लागेल. वादाचा विषय बनलेली अंबानी यांची टोलेजंग इमारत. काल आम्ही आपापसामध्ये चर्चा करीत होतो त्यावेळी मी विचारले की, ही काय भानगड आहे ? हा कोणता प्लॉट आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे उठून बोलले तेव्हा मला कळले की, चार एफ.एस.आय. मिळालेली ती हीच इमारत. (...अडथळा...) ठीक आहे. ती दुसरी बिल्डींग आहे. सभापती महोदय, याचा सुंदर मागोवा श्री.सतीश संतोष प्रधान यांनी दिलेला आहे. श्री.सतीश संतोष प्रधान यांनी याचा पर्दाफाश करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

महाराष्ट्र शासनामध्ये असलेल्या संबंधितांनी निर्माण केलेली भानगड श्री.संतोष प्रधान यांनी या लेखाद्वारे बाहेर काढलेली आहे. सरकारच्या भानगडी सांगण्यामध्ये सभागृहाचा वेळ वाया जात आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. कोणीतरी कोणाला टारगेट करण्याकरिता, मंत्रिपदावरुन एकमेकांना घालविण्याकरीता कफन बांधले आहे, असे बोलले जात आहे. माननीय मंत्री महोदय श्री.अनिस अहमद यांनी कफन बांधलेले आहे ही चांगली बाब आहे. सभापती महोदय, श्री.संतोष प्रधान यांच्या लेखातील काही उल्लेख मला आवर्जून सभागृहात करावेसे वाटतात. हा संपूर्ण लेख रेकॉर्डवर घ्यावा असा आहे.

डॉ.पतंगराव कदम : वृत्तपत्रातील बातम्या किंवा लेख सभागृहात ग्राहय धरले जात नाहीत.

श्री.दिवाकर रावते : श्री.संतोष प्रधान यांनी त्यांच्या लेखात म्हटले आहे की, वक्फ बोर्ड कसे असावे ? मुस्लिमेतर व्यक्तींनी मुस्लीम समाजाच्या उपयोगासाठी व लाभासाठी वरील प्रकारे कायमस्वरुपी केलेल्या दानाचा उल्लेख वक्फ कायद्यात केलेला आहे. अशा प्रकारे व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. वृतपत्राच्या बातम्या ग्राहय धरायच्या नसतील व विश्वासर्हता वाटत नसेल तर माननीय मंत्री महोदयांनी पत्रकार परिषदा घेऊ नयेत. वर्तमानपत्रात मंत्री महोदयांची जी वक्तव्ये येतात, ती गांभीर्याने घ्यावयाची नाहीत असाच यातून अर्थ निघतो. मंत्री महोदयांनी ही बाब सांगितल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या श्री.संतोष प्रधान यांच्या लेखातून माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरुध्द षडयंत्र रचण्याकरिता माननीय औकाफ मंत्र्यांनी कशा प्रकारे घोळ केलेला आहे याचा खुलासा आलेला आहे. तसेच वक्फ बोर्डाने फार मोठया प्रकारचा भ्रष्टाचार केल्याचाही या लेखामध्ये उल्लेख आहे. श्री.संतोष प्रधान यांनी एकतर्फी असे काही लिहिलेले नाही. सभापती महोदय, याबाबत पर्दाफाश होत नव्हता. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष काय कामकाज करत आहेत ? हे माननीय मंत्र्यांना कळत नव्हते. औकाफ मंत्र्यांनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न केलेला होता, ते खात्याचे मंत्री असूनही बोर्डाचे अध्यक्ष त्यांना काही सांगत नव्हते. याबाबत थोडया वेळापूर्वी माननीय मंत्री महोदय इंग्रजीमध्ये बोलले आहेत. आम्ही मंत्री महोदयांना सांगितले की, आम्हाला समजावून सांगा, परंतु त्यावेळी गोंधळामध्ये राहून गेले. वक्फ बोर्ड त्यांच्या कायद्यानुसार संबंधित मंत्र्यांना महत्व देत नाही असा शुध्द मराठीमध्ये मी अर्थ काढला आहे. वक्फ बोर्ड हा महाराष्ट्र व मराठवाडयातील महत्वाचा विषय आहे. मराठवाडयामध्ये वक्फ बोर्डाची 1 लाख 39

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते .....

हजार एकर अशी प्रचंड जमीन आहे. परंतु बोर्डाच्या मालमत्तेबाबत कट कारस्थान झालेले आहे. वक्फ बोर्डाचा कार्यकारी अध्यक्ष हा आपल्या विश्वासातील असेल तर आतील गोटातील बातम्या मिळतील अशा प्रकारचे नियोजन माननीय मंत्री महोदयांनी केले आहे. घडलेला सर्व प्रकार पुढे येणार आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, वृत्तपत्रातील बातम्या खऱ्या नसतात. परंतु या बातमीमध्ये तथ्य शोधण्याचा मी प्रयत्न केला असून मी ते पुराव्यासह मांडणार आहे. माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे बरोबर आहे की, वक्फ बोर्डामध्ये काय चालले आहे ? हे त्यांना कळाले पाहिजे. त्यांचे चुकीचे काहीच नाही. परंतु तिकडे एखादा जाँबाज माणूस अध्यक्ष असेल तर तो मंत्री महोदयांना इकडे काही कळू देत नाही. सर्व फाईल्स त्यांनी स्वत:कडे ठेवल्या असतील तर काय चालले आहे हे कळायला मार्ग नसतो. वक्फ बोर्डाच्या एका सदस्याने सरकारकडे अर्ज केला की, ताबडतोब हया फाईल्स ताब्यात घ्या, नाही तर ते जाळून टाकतील, पुरावा नष्ट करतील. अशा प्रकारची दयनीय परिस्थिती असेल तर माननीय मंत्री महोदयांनी केलेली कृती बरोबर आहे.

याबाबत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. श्री.शेख नावाचा अधिकारी ग्रामविकास खात्याच्या अंतर्गत विदर्भामध्ये एका जिल्हा परिषदेमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत आहे. त्यांची प्रतिनियुक्ती लवकर मंजूर करण्यासाठी माझ्याकडे जी माहिती आलेली आहे, ती सांगतो. याबाबत माननीय मंत्री महोदय श्री.अनिस अहमद यांनी ग्रामविकास मंत्री श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकडे बऱ्याच चकरा मारल्या. एक मंत्री दुसऱ्या मंत्र्याकडे जाऊन श्री.शेख हया नावाचा माणूस मला दे म्हणून चकरा मारतो, हे बरे वाटत नाही. ग्रामविकास मंत्री श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांनी श्री.शेख यांची प्रतिनियुक्ती मान्य केली. श्री.शेख यांची कारकिर्द वादग्रस्त आहे. विदर्भातील एका जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करणारे हे शेख चौकशीच्या कचाटयात सापडले होते.

यानंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

अनुभवी माणूस निवडलेला आहे. या श्री.शेख यांना त्यांच्या मूळ विभागाकडून, मूळ पदावरून रिलीव केले आणि मंत्री महोदयांनी त्यांना वक्फ बोर्डावर नेमले. त्यानंतर मग व्यवस्थित कागदपत्रे जमा इाली. हे सगळे दुखणे आहे ते या श्री.शेख यांनी मंत्र्यांसाठी काही जमा केले असा या लेखाचा मतितार्थ आहे. सभापती महोदय, मी या लेखातील सगळे रिमार्क्स काही येथे वाचून दाखवित नाही. कारण ते वर्तमानपत्रातील आहे. परंतु श्री.मुकेश अंबानी यांच्या अल्टा माऊंट इमारतीला नोटीस बजावल्यानंतर मात्र ते प्रकरण अधिक वाढू नये याची काळजी अगदी काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी घेतली असल्याचा उल्लेखही यात आहे. मग आता याबाबत खुलासा करावयाचा की नाही हे आपणच ठरवायचे आहे. खुलासा करा अथवा न करा. पण मग आता हे श्री.शेख कोण आहेत ? त्यांना माननीय मंत्री महोदयांनीच यात आणले आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी दिलेल्या टीव्हीच्या कॅसेटमध्ये ते सारे आले आहे की नाही याची मला माहिती नाही. पण अशा प्रकारे या श्री.शेख यांची नियुक्त करता येते काय ? हे पाहण्यासाठी म्हणून मी हा ॲक्ट आपल्या लायब्ररीतून मागवून घेतला. त्यात या संबंधात म्हटले आहे की, "... appointment to the post of the Chief Executive Officer, under sub-section 2 of Section 23 of the Act shall be made by the State Government in consultation with the Board and not with the Minister. मग कोण असला पाहिजे ? ..... The transfer on deputation of the person holding the post not below the rank of Dy.Secretary to the Govt. in any Deptt. of the Mantralaya or Addl. Collector at the Dist. level. .... ही जी नेमणूक आहे ... appointment of the suitable retired Govt. officer, who is holding the post not below the rank of Dy.Secretary at the time of retirement. तर मग हे श्री.शेख महोदय यामध्ये मोडतात का ? ते यामध्ये मोडत नाहीत असे माझे म्हणणे आहे. मग असे असेल तर ही बेकायदेशीर नियुक्ती का करण्यात आली ? गॅझेटमध्ये देखील ही बाब आली पाहिजे होती. त्याबाबतही कायद्यात तरतूद आहे. त्यात असे म्हटले आहे की, " .... under Sec. 23 of the Wakf Act 1995. The C.E.O. is appointed by the State Govt. by notification in official Gazette. He is appointed by the State Govt. in consultation with the

...... पीपी 2 ...



श्री. रावते .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Wakf Board." हे करण्यात आले आहे काय ? याचाही खुलासा येथे होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, हे सगळे श्री.शेख आल्यानंतर चालू झाले आहे. 1995 ला वक्फ बोर्ड आले आणि त्यावर 2002 साली अध्यक्ष आले. त्यानंतर पाच वर्षे काहीही ओरड झाली नाही आणि नंतर अचानक हे सारे निर्माण झाले आहे. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांना धन्यवाद देतो. त्यांनी या प्रसंगी सरकारला विचारले आहे की, कोणाकोणाची जमीन यामध्ये आहे ? त्यांनी नाव न घेता उल्लेख केलेला आहे. हे श्री.शेख यामध्ये वसुलीचे काम करावयाचे असे माझ्या कानावर आले आहे. मंत्र्यांच्या वतीने श्री.शेख हे करीत होते. परंतु वसुली करण्यासाठी वट लागते, दबदबा असावा लागतो. तसा तो श्री.शेख यांच्याकडे होता का ? वक्फ बोर्डाच्या सचिवाला कोणत्याही प्रकारचा प्रोटोकॉल नाही. तरीही हे श्री.शेख आपला दबदबा, वट दाखविण्यासाठी लाल-पिवळ्या दिव्याची गाडी घेऊन जायचे. मग त्यांना संभाजी नगर म्हणजे औरंगाबादच्या परिवहन अधिकाऱ्याने वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्याच्या गाडीवरील पिवळा दिवा काढण्याबाबत नोटीस बजावली. त्यात त्याने स्पष्ट म्हटले की, आपल्याला विनंती आहे की, आपल्या गाडीवर आपण पिवळा दिवा लावला आहे, परंतु तसा दिवा लावण्याचा अधिकार आपल्याला नाही. तरी आपण त्वरित तो काढून टाकावा अन्यथा आपल्या विरूद्ध कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या प्रस्तावावर उत्तर देणार असतील तर त्यांनी माझ्या काही प्रश्नांचीही उत्तरे द्यावीत. त्यातील पहिला प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे बेकायदेशीररित्या आपल्या गाडीवर पिवळा दिवा लावून हे श्री.शेख महोदय, काय वसुली करीत होते ? त्याचा आपण तपास केला आहे काय ? नसल्यास, सीबीआयच्या तपासामध्ये हाही विषय आपण समाविष्ट करावा. तसेच या संबंधित अधिकाऱ्याने अशा प्रकारे बेकायदेशीर काम केले असेल तर त्याची चौकशी आपण केली पाहिजे. सभापती महोदय, परिवहन खात्याच्या अधिकाऱ्याने या श्री.शेख महोदयांना जेव्हा नोटीस बजावली तेव्हा त्यावर उत्तर देताना त्यांनी महाराष्ट्र स्टेट वक्फ बोर्डाच्या लेटरहेडवर लिहून दिले आहे की, अशा प्रकारे पिवळा दिवा गाडीवर लावण्यात आला होता तो आम्ही काढून टाकत आहोत. सभापती महोदय, हे त्यांनी लिहून दिले आहे. तेव्हा आपल्या शासनाचेच एक अधिकारी अशा प्रकारे सेवेत असताना बेकायदेशीरपणे काही करीत असतील वा केले असेल तर त्याबद्दल त्यांचेवर आपण काय कारवाई करायची ती आपणास करावी लागेल. ...

( यानंतर श्री. सरफरे ...... क्यूक्यू 1 ...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब म्हणाल्याप्रमाणे वक्फ बोर्डाचा व्याप खूप मोठा वाढला आहे. आम्ही आतापर्यंत मराठवाडयाविषयी बोलत होते. परंतु वक्फ बोर्डाचे अध्यक्ष म्हणाले की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनी आहेत. म्हणून त्यांनी मुंबईमध्ये कार्यालयाकरिता जागा कां हवी आहे हा मुद्दा मांडला. याबाबतचे जस्टिफिकेशन ते देत होते. परंतु त्यांच्या शेख साहेबांना वाटले की, आपण कुठेतरी कमी पडत आहोत म्हणून त्यांच्या कायद्यामध्ये अधिकार नसतांनाही त्यांनी आपल्या स्थायी आदेशानुसार आणखी एका ऑफिस सुपरिटेंडेंटची नेमणूक केली. सरकारी अधिकाऱ्याचे सर्व अधिकार त्याला काम करण्याकरिता बहाल केले. अशाप्रकारे वक्फ बोर्डामध्ये काम करणारा हा शेख कुणाच्या जमिनी वाचविण्याकरिता होता आणि कुणाचा भांडाफोड करण्याकरिता होता? याचा शोध आपण जी चौकशी समिती नेमणार आहात त्या समितीमार्फत झाला पाहिजे. त्यांचा वापर करुन दोन्ही बाजूंनी वक्फ बोर्डाची मालमत्ता लाटण्याचे कट कारस्थान निर्माण झाले आहे त्या संदर्भात ही चर्चा आहे. या ठिकाणी ईदगाह असेल, दर्गा असेल, कब्रस्तान असेल याची जी काही प्रॉपर्टी असेल. या बाबत अशाप्रकारे एस. के. जाफर नावाच्या ऑफिस सुपरिटेंडेंटला अधिकार देणारे लेटर हेडवरील आदेश आहेत.

सभापती महोदय, मी आता मूळ विषयाकडे येतो. वक्फ बोर्डाच्या जमिनी कुणी कुणी लाटल्या? त्यावर निर्बंध आणणे आणि अशा प्रकारे गैरमार्गाने, किंवा चांगल्या मार्गाने जमिनी लाटल्या गेल्या असतील तर त्या संदर्भात कायद्यातील तरतुदीनुसार औकाफ बोर्डाच्या हिताची बाब करणे हे औकाफ मंत्र्यांचे काम आहे. औकाफ मंत्र्यांनीच बोर्डाची जमीन घेतली असेल तर तो गंभीर विषय आहे? तसे जर असेल तर औकाफ मंत्र्यांनी या सदनामध्ये ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे. या संदर्भातील विषय मांडण्यासाठी मी उभा आहे. एकाच वक्त्याने सर्वच भ्रष्टाचार एकाच तोंडामधून मांडणे बरोबर नाही असे आपण सांगितले. सभापती महोदय, फिर्जापूर मस्जिद, नागपूरची प्रॉपर्टी आहे. तिचा खाते क्र. 1141 आहे, ही मालमत्ता कुणाच्या नावे आहे? सचिव, महमूद शिक्षण आणि ग्रामीण विकास बहुद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर. ही वक्फ बोर्डाची मालमत्ता त्यांच्याकडे कशी आली? त्यामध्ये माननीय जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश पत्र क्रमांक राजस्व 03-1361, 7.5.2003 च्या आदेशानुसार नागपूर यांचे ताबा पावती दिनांकानुसार हे सर्व दिले आहे. आणि जिल्हाधिकाऱ्यांनी ही जमीन यु.एल.सी. अंतर्गत 7 हजार 50 चौरस मीटर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अतिरिक्त ठरलेल्या जागेचा ताबा सचिव,महमूद शिक्षण आणि ग्रामीण विकास बहुद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर. यांना मिळाली असे आदेशाप्रमाणे नोंद करुन घेण्यात येत आहे. ही नोंद त्यांनी ताबा पावती वरुन केली आहे. जी ताबा पावती आहे त्यामध्ये संबंधित संस्थेच्या सचिव माननीय मंत्रिमहोदयांच्या आदरणीय पत्नी आहेत., त्या आमच्या भाभी आहेत. सौ. आसमा अनिस अहमद यांनी ताबा घेतला आहे. त्याबाबतच्या तीन वेगवेगळया पावत्या माझ्याकडे आहेत. त्यांच्या मूळ ताबा पावत्या आणि त्यावरील सहया इतक्या डिफर होतात. कुणी ताबा पावती घेतांना त्यांच्या नावाने लिहिलेल्या असाव्यात. हे मंत्रिमहोदयांनी केले आहे असे मी म्हणणार नाही. मंत्रिमहोदयांकडे अनेक कर्मचारी असतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

अशाप्रकारे वक्फची अतिरिक्त जमीन ताब्यात घेण्याकरिता ताबा पावतीवर देखील चुकीच्या सह्या करण्याबाबतचा आक्षेप मी येथे उपस्थित करत आहे. मूळ दस्तऐवजामध्ये ताबा पावत्या आहेत, त्या तपासाव्यात. तशाप्रकारे चुकीची सही करून ताबा घेतला असेल तर त्या संबंधातील कारवाई करणे, हे शासनाचे काम आहे. कारण हा प्रश्न मंत्री महोदयांच्या शिक्षण संस्थेच्या संदर्भातील आहे. वक्फ बोर्डाचे मर्यादित अधिकार आहेत असे जे सांगितले ते मला काही पटले नाही. आम्ही एवढे ठेवले, तेवढे ठेवले, त्यापैकी एक आहे, वगैरे वगैरे. वक्फ बोर्डाचे ते सल्लागार आहेत. प्रत्येकवेळेला सल्ला घेतला जातो. अशाप्रकारे आपल्याकडे काही घडले असेल तर आपण त्यामध्ये दोषी आहात. आपण यामध्ये का लक्ष घातले नाही, हाही प्रश्न माझ्यासमोर उपस्थित होतो. वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांनी यामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असेल तर वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांवरही कारवाई झाली पाहिजे. ही जी शिक्षण संस्था आहे,या शिक्षण संस्थेची नोंदणी आपल्या महाराष्ट्र राज्य नोंदणी कायद्याप्रमाणे झालेली आहेत. ही नोंदणी झाल्यानंतर या नोंदणीनुसार या संस्थेला महाराष्ट्र राज्याकडून निधी उपलब्ध व्हावा याकरिता अर्ज करण्यात आला. या संस्थेने दिनांक 27-02-2004 ला अर्ज केला आणि संस्थेला 15-06-2004 ला 10 लाखाची ग्रॅन्ट मिळाली. या मेहम्मूद शिक्षण महिला ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था अहमद कॉम्प्लेक्स, कोलचा मार्ग, सरदार नगर हा त्या संस्थेचा पत्ता आहे. चांगल्या शिक्षण संस्थेला सरकारने मदत केली, त्याबद्दल मला आनंद आहे. याच शिक्षण संस्थेने नंतर रजिस्टर ऑफ वक्फ अंडर सेक्शन 30 ऑफ वक्फ 1995 खाली पुन्हा रजिस्ट्रेशन ऑफ वक्फ ॲक्ट अंतर्गत रजिस्ट्रेशन करिता अर्ज केला. या सेक्शन अंतर्गत वक्फचे रजिस्टेशन मागितले. मेहमूद शिक्षण महिला ग्राम विकास बहुउद्देशीय वक्फ संस्था, नागपूर या संस्थेच्या सेक्रेटरी श्रीमती अस्मा अनिस वाईफ ऑफ हाजि अनिस अहमद यांनी has given an application along with the development plan and estimate for obtaining a loan of Rs.9,18,86,000/ चे कर्ज मागितले. संस्थेची कामे चांगली असतील. एकच संस्था आपल्या निधीकरिता दोन ठिकाणी नोंदणी करतील. आता हा मार्ग गैर आहे की काय, हे मी म्हणणार नाही. मी याबाबत जास्त बोलणार नाही परंतु माझ्याकडे दै.'हितवाद' नावाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

SKK/ MAP/ KGS/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

नागपूरहून निघणाऱ्या दिनांक 29 जून 2007 रोजीच्या वर्तमानपत्रातील कात्रण आहे. माननीय मंत्री महोदय प्रामाणिकपणे या वर्तमानपत्राकडे आले. याबाबत महसूल मंत्र्यांनी विश्वास ठेवायचा की नाही, ते त्यांनी पहावे. पण मला त्याचा रेफरन्स म्हणून मला ते वाचावयाचे आहे. यामध्ये असे म्हटलेले आहे की,

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

"The Minister is ready to part with the wakf board land. Anees Ahmed, Maharashtra Minister for Dairy Development and Wakf, is willing to surrender 7050 sq mt. disputed wakf land at Jingabai Takli to Maharashtra Govt. This land was allotted to Mohammed Shikshan and Mahila Gramin Vikas Shikshan Sanstha and trust registered in Anees Ahmed's name and run by his wife Asma Ahmed. The society got the land for educational purpose under ULC Act in 2004." सभापती महोदय, मला एक गोष्ट येथे निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, तुमच्या संस्थेचे पहिले जे रजिस्ट्रेशन आहे ते फार चांगले आहे. ते बहुउद्देशीय रजिस्ट्रेशन आहे. आपली नोंदणी ही या संस्थेतून प्रामाणिकपणे जे काम चालणार आहे त्याचा लाभ सर्व समाजाला मिळावा अशी आहे. परंतु पुन्हा आपल्याला काही लाभ मिळावा याकरिता या समितीला अल्पसंख्यांक असे जाहीर करुन, ही अल्पसंख्यांकाची समिती आहे म्हणून पुन्हा 8-9 कोटी रुपये मिळविण्याचा आपण जो प्रयत्न केलेला आहे तो कोणत्या नैतिकतेमध्ये बसतो ? मी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बोलणार नाही. आपले स्वत:चे असे स्टेटमेंट आहे की, मी जमीन परत देण्यास तयार आहे. याचा अर्थ जमीन घेतली हे आपण मान्य केले आहे. मी वक्फ बोर्डाच्या बाबतीत सगळे काही सांगत नाही. या केसमध्ये श्री. हनिफ महंमद आहेत. या ट्रस्टमध्ये कोण कोण आहेत ? In the court of Third Joint Civil Judge, Junior Division, Nagpur, regular suit No. 6053/95 exhibit No.113 यामध्ये जी नावे आहेत त्यामध्ये आमच्या माननीय मंत्रिमहोदयांचे भाऊ श्री. अब्दुल मजीद आहेत. श्री. अब्दुल मजीद अहमद शेख हे त्यांचे वडील आहेत. स्वत: माननीय मंत्रिमहोदय यामध्ये आहेत. त्यांच्या पत्नी यामध्ये आहेत. अशा प्रकारचा हा ट्रस्ट आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्यामध्ये औकाफची जमीन ही कोणाची जमीन आहे हा आमचा विषय नाही. शेवटी त्याचे संरक्षण औकाफ बोर्डाने कायद्या प्रमाणे करावयाचे आहे. पण माननीय औकाफ मंत्र्यांकडून आणखी कोणाला तरी ती दिली जाते. अनेक एन.ओ.सी. माझ्याकडे आहेत. त्या मला वाचावयाच्या नाहीत. औकाफ बोर्डाची जी प्रचंड जमीन आहे तिची जी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

काही लयलूट चालली आहे त्याबाबत मला असे वाटते की, आपण सरकारमध्ये बसला आहात तेव्हा आपण जनतेच्या या सगळ्या मालमत्तचे संरक्षक आहात. त्यांचे संरक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. आपण प्रामाणिकपणे जमीन परत देतो असे म्हटले आहे. परंतु आमच्या आबासाहेबांच्या डिपार्टमेंटमध्ये अशी पध्दत आहे की, एकदा चोर पकडला की, त्यांच्याकडून चोरी कबूल करुन घेतात, माल वसूल करुन घेतात, ज्याचा माल आहे त्याला परत देतात, पण चोरी केल्याची सजा भोगावीच लागते. तसा कायदाच आहे. माननीय मंत्रिमहोदय, आपण कफन बांधून निघालेला आहात असे आम्हाला सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी सांगितले. मला माहीत नाही पण आज आपण हे कफन बांधाच. चुकून का होईना धर्माकरिता, कळत नकळत जर माझ्या हातून असा गुन्हा झाला असेल तर आज मी माझी कुर्बानी देत आहे असे सांगावे. जर आज या चर्चेला फार मोठी उंची द्यावयाची असेल तर सी.बी.आय.ची चौकशी होईल आणि विलासराव दोषी आहेत की, दिलीपराव दोषी आहेत वगैरे हा माझा विषय नाही. कारण सन्माननीय सदस्यांनी तो विषय एवढ्या विस्तृतपणे मांडलेला आहे की, त्यामध्ये कोर्टकचेऱ्या, हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट, औकाफचा कायदा, हा कायदा, तो कायदा यामुळे माझ्या डोक्यात गोंधळ निर्माण झालेला आहे. आपण काही वकील नाही. ते वकील आहेत. सन्माननीय सदस्य कुलकर्णी साहेब वकील आहेत. आमच्या सन्माननीय सदस्य श्रीमती दराडेताई वकील आहेत. माझी अशी नम्र विनंती आहे की, एवढ्या गांभीर्याने या सदनामध्ये मांडलेले डॉक्युमेंट्स खोटे असतील माझे काही म्हणणे नाही. त्याबाबत काय करावयाचे हा माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रश्न आहे. परंतु ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे पिवळा दिवा लावून गैरप्रकार केले असतील तर त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. या कारवाईमुळे असे अनेक नको ते पिवळे दिवे फिरत असतील तर ते तरी बंद होतील. या निमित्ताने एक चांगला संदेश जाईल. यासंदर्भात मी आपल्या सदनापुढे जे मांडलेले आहे त्यामध्ये आमच्या आदरणीय श्री. गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही सी.बी.आय.ची चौकशी मागितलेली आहे ती चौकशी व्हायलाच पाहिजे असा आमचा आग्रह आहे. त्यामध्ये जर हेही प्रकरण असेल तर आणि माननीय मंत्रिमहोदय स्वच्छ असतील तर माझे काही म्हणणे नाही. परंतु प्रत्येक वेळी आरोपांचा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

गदारोळ उडत असताना हे सगळे घडत असते. माननीय मंत्रिमहोदय, आपण वर्तमानपत्रातून जाहीर केले की, औकाफची जमीन मी परत देण्यास तयार आहे. ती जमीन तुम्ही घेतली हे स्वत:च कबूल केले आहे. वर्तमानपत्राने चुकीचे लिहिले असेल तर त्यांनी खुलासा करावा. आपण त्या ठिकाणी खुलासा पाठविलेला नाही. आज आपण कफन वगैरे बांधून कुर्बानी घेतली तर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांना किती आनंद होईल ? ते वाट पाहात आहेत. ते तरी आपण करावे. आजच्या या औकाफ बोर्डाच्या चर्चेच्या निमित्ताने निश्चित स्वरुपात आपण राजीनामा द्यावा आणि आजची ही कुर्बानी सिध्द करुन दाखवावी. कारण कुर्बानीला आपल्या धर्मामध्ये फार मोठे महत्व आहे असे आम्ही ऐकून आहोत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. माननीय पंतप्रधानांनी सच्चर कमिशन नेमले. काँगेस पक्षाने या कमिशनचा खूप उदो उदो केला. सच्चर कमिशनचा अहवाल महाराष्ट्र वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि संबंधित मंत्री महोदयांनी जरुर वाचावा. वक्फ बोर्ड हे उद्दिष्टांच्या विरुध्द काम करते अशा प्रकारचा निष्कर्ष सच्चर अहवालामध्ये काढण्यात आलेला आहे. अशा प्रकारचा अहवाल शिवसेना किंवा भारतीय जनता पक्षाने दिलेला नाही. उत्तर प्रदेश राज्याला डोळ्यासमोर ठेवून सच्चर आयोग नेमण्यात आला. या आयोगाने असे म्हटलेले आहे की, वक्फ बोर्ड उद्दिष्टांच्या विरोधात काम करीत आहे. या बोर्डाने जर चांगले काम केले असते तर शहाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात तत्कालीन पंतप्रधान कै. राजीव गांधी यांना घटना दुरुस्ती करावी लागली नसती. वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात तज्ज्ञ लोकांची कमिटी नेमा असे सच्चर कमिशनने सुचविलेले आहे. ही कमिटी नेमली तर जागेची लूटमार आपोआप थांबेल. या सच्चर कमिशनच्या अहवालामध्ये मी जाऊ इच्छित नाही. सन्माननीय सदस्य डॉ. एम.अे.अझीज यांनी सांगितले की, "जी कमिटी नेमण्यात आली तिचे अध्यक्ष श्री. काद्री हे माझ्या हाताखालील अधिकारी असल्यामुळे ते माझ ी चौकशी कशी काय करु शकतात ?" ही बाब कदाचित खरी देखील असू शकेल, असे मी समजतो. काद्री कमिटीचा अहवाल फक्त कॅबिनेट मंत्र्यानी दिला नाही तर माननीय मुख्य मंत्र्यांची देखील त्यावर नोटींग आहे. त्या अहवालामध्ये म्हटलेले आहे की, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एम.अे.अझीज यांच्या संगनमताने बोर्डाच्या मालमत्तेचा हेतुपुरस्सर गैरवापर करुन अनेक अनियमितता केलेल्या आहेत. या सर्व प्रकरणी गुप्तवार्ता विभागाकडून चौकशी करावी, अशा प्रकारची शिफारस अहवालामध्ये केलेली आहे. जर ही चौकशी राज्य गुप्तवार्ता विभागाकडे गेली तर आपल्या अधिकारात ती राहाणार नाही म्हणून की काय, शिफारशीमध्ये पुढे असेही म्हटलेले आहे की, गुप्तवार्ता विभागाकडून चौकशी झाल्यानंतर शासनस्तरावर चौकशी करता येणे शक्य होणार नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या हातात फाईल गेल्यानंतर आपल्याकडे काही राहू शकणार नाही. आपल्याच विभागामध्ये चौकशी झालेली बरी, यादृष्टीने नोटींग झालेले आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

आता यासंदर्भात जो एक अहवाल आला आहे, त्या अहवालावर जी डेस्क ऑफिसरपासून ते सचिवांपर्यंत नोटिंग झालेली आहे, ती आल्यानंतर सुध्दा डॉ. अझिज साहेब म्हणतात त्याप्रमाणे खरे आहे पण अतिरिक्त मुख्य सचिवांनी या नोटिंगमध्ये काय म्हटले ते माननीय मुख्यमंत्र्यांना पुरेसे वाटले नाही म्हणून मुख्यमंत्री सचिवालयाने ते पुन्हा मुख्य सचिवांकडे पाहावयाला पाठविले चौकशी अहवालात चौकशी अधिका-याने शिफारशींबाबत कारवाई होण्याकरिता प्रस्तावित करणे व कारवाई करणे उचित होईल, असे मुख्य सचिवांनी म्हटले परंतु याबाबत काद्री कसे आहेत ? ते संबंधित अधिकारी नाहीत, माननीय मुख्यमंत्री यांच्या आदेशाप्रमाणे क्वासी ज्यूडिशियल अध्यक्षांची चौकशी करण्याची कायद्यात तरतूद नाही हे मुख्य सचिवांना माहित नाही मुख्यमंत्र्यांचे आदेश झाले की, अ,ब व क यातील शिफारशींवर चौकशी करा  यासंदर्भात जरी मुख्यमंत्र्यांना माहित नाही, मुख्य सचिवांना माहिती नाही, अतिरिक्त मुख्य सचिवांना माहिती नाही पण डॉ.अझिज यांना माहित आहे की काद्री यासंदर्भात चौकशी करु शकत नाही, यातील वास्तव काय आहे ? आम्हालाही मध्यंतरी वर्तमानपत्रातूनच कळल की, " यासंदर्भात मला काही माहिती नाही " असे माननीय मुख्यमंत्र्यांनी वक्तव्य केले, परंतु त्या वर्तमानपत्राची तारीख आणि या अहवालाची तारीख पाहिली तर असे आढळून आले की, पेपरची तारीख ही या अहवालावर सही झाल्यानंतरची होती. यामधील वास्तवाचा खुलासा होणे आवश्यक आहे व हे फार मोठे प्रश्नचिन्ह आमच्यासमोर उभे राहते बाकी सर्व गोष्टी डॉ.अझिज साहेबांनी सांगितलेल्या आहेत, त्यामुळे मी त्यांची पुनरावृत्ती करणार नाही. या अहवालामध्ये अ,ब व क या तीन शिफारशी केलेल्या आहेत, यामध्ये सकृतदर्शनी असे दिसून येते की, डॉ. अझिज यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबतच्या ज्या  सन 1995 च्या वक्फ च्या कलम 30 अन्वये ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या योग्य आहेत, आता हे झाले मुख्यमंत्री लेव्हलवर बाकी यासंदर्भात हायकमांडकडे डॉ.अझिज यांचे पत्र आहे,हायकमांड म्हणजे संबंधित पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष.  मला या प्रकरणासंदर्भात कुठून व कशी डिटेल माहिती येते हे कळत नाही सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणतात त्याप्रमाणे वर्तमानपत्रातून येते ते खरे आहे, कारण मला वाटते की, सर्वात प्रथम लोकमत या वर्तमानपत्रामध्ये या विषयासंदर्भात लेखांची एक माला सुरु झाली होती, याला शोध पत्रकारिता की अजून काही म्हटले पाहिजे माहित नाही पण हरकत नाही परंतु जे काही आहे ते चांगले आहे कारण यामुळे हा विषय जनतेपर्यंत येऊन पोहोचला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

आहे. यासंदर्भात माननीय डॉ.अझिज साहेबांनी माननीय सोनिया गांधींना पत्र लिहिले त्या पत्रामध्ये "मेहमुदा शिक्षण" आणि "महिला ग्रामविकास बहुउद्देशीय संस्था" यामध्ये हे कसे चालू झाले हे माहित नाही आणि महिला ग्रामविकास बहुउद्देशीय संस्था,नागपूर यामध्ये हे कसे सुरु झाले ? त्यात त्यांनी म्हटले की, " Supreme Court has also given a ruling that once a Wakf is always a Wakf." That means no Wakf property could be sold and however, Mr. Anees Ahmed being a Minister of Aukaf using his position have grabbed a Wakf property illegally. असे डॉ.अझिज साहेब यांनी माननीय सोनियाजींना पत्राद्वारे लिहिले. Mrs. Asama Anees Ahmed had applied for no objection. हे भांडण सुरु कधी झाले ? Certificate required to be recommended from the Maharashtra Wakf Board to get a fund of Rs.9,18,86,000/ खरी जी माशी शिंकली ती येथे शिंकली. मध्यंतरीच्या काळामध्ये जशी सिध्दीविनायकाच्या मंदिरातून लूट चालली होती तेव्हा हायकोर्टाने ब्रेक मारला. वक्फच्या बोर्डाच्या जमिनींची लूट या ठिकाणी चाललेली आहे म्हणून वक्फ बोर्ड हे फक्त मुस्लिम धर्मीयांमध्येच आहे, असे नाही तर हिंदू धमीर्यांमध्ये देखील सिध्दीविनायकाच्या मंदिरामध्ये गेल्या सात - आठ वर्षांपासून लूट चालू आहे परंतु हाय कोर्टाने ब्रेक मारल्यामुळे ती लूट थांबली. ज्याप्रकारे मुस्लिम धमीर्यांमध्ये वक्फ बोर्डाच्या जमिनींच्या व्यवहारामध्ये गैरकारभार होतो त्याचप्रमाणे सिध्दीविनायकाच्या मंदिरामध्ये देखील पैशांची लूट चालली होती. The Minister has pressurized me to approve and I refused and did not yield to his pressure, therefore, he has started abusing me through false propaganda in News Papers and Electronic Media and further set up a Committee against me, collecting the so called complaints against from the public members. ते फक्त एवढयावरच थांबले नाही Due to it, Mr. Anees Ahmed has taken one point programme against me and threatened to me to remove from the Chairmanship of Wakf Board. श्री.गडकरी साहेब आपणही बघा. He has threatened me in the name of Shri Ahmed Patel, Political Advisor to your honour.श्री.अहमद पटेल यांचे महत्व तर आम्हीं जाणतो. त्यांच्या





श्री.विनोद तावडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आशिर्वादामुळे काही जण येथे आहेत  Mr. Anees Ahmed belongs to the same region from where Mr.Ahmed Patel comes i.e. from Gujarat. He has started abusing me on phone and stated that he can go to any extent as he has strong connection with New Delhi.

श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आपण जे बोलत आहात तो डिबेटचा भाग कसा होतो ? वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांचे पत्र येथे कशासाठी वाचून दाखवत आहात ? राजकीय पत्र आहे.

श्री.विनोद तावडे : वक्फ बोर्डाच्या अध्यक्षांची तक्रार आहे. माननीय मुख्यमंत्री ऐकत नसतील म्हणून त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे दाद मागितली असण्याची शक्यता आहे. विषयाशी संबंधित पत्र आहे.It further states that: "Mr. Anees Ahmed should be removed from the Aukaf Portfolio as he himself involved in grabbing the land and acquiring the property"...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, गडकरी साहेब बोलत असताना आम्ही समजत होतो की ते डॉ. अझीज यांच्याविरोधात बोलत आहेत. श्री. रावते साहेब बोलत असतानाआम्ही समजत होतो की ते श्री. अनिस अहमद यांच्याविरोधात बोलत आहेत. परंतु माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे कोणाच्या बाजूने वा कोणाच्या विरोधात बोलत आहेत ते समजत नाही.

श्री. विनोद तावडे : माननीय सदस्य श्री. गडकरी जे बोलले असतील त्याबाबतीत मी बोलणार नाही. परंतु मी राष्ट्रवादीच्या हिताचे बोलत आहे. या सगळया प्रकारामुळे मुस्लीम समाजात कॉंग्रेसची बदनामी झालेली आहे आणि ती मते आपल्या पक्षाकडे कशी वळविता येतील यासाठी आपल्या बैठका सुरु झालेल्या आहेत हे आर.आर.आबा यांना माहीत आहे. मी आता यावर जास्त बोलत नाही.

सभापती महोदय, मघाशी खंबाला हिल येथील जमिनीच्या संदर्भात माननीय सदस्य डॉ. अझीज यांनी एक मुद्दा मांडला होता त्यांनी ही जमीन वक्फ बोर्डाची आहे किंवा नाही याबाबत चर्चा केली. परंतु माझ्याकडे 10 जुलै, 1876 चे डाक्युमेंट आहे. आमच्या दृष्टीने हे भारतीय नागरिकांसाठी केले होते. त्याची लूट कोणीतरी करीत आहे म्हणून आम्ही याठिकाणी बोलत आहोत. त्यामुळे ही जमीन वक्फकडे आहे हे सिध्द करणारे डाक्युमेंट आहेत ते आपण पहावेत म्हणजे आपल्याला ते पटेल. डॉ. अझीज म्हणाले की ट्रॅब्युनलकडे गेले आणि ट्रॅब्युनलने निर्णय

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

दिला. ट्रॅब्युनलकडे गेल्यानंतर सरकारच्या वकिलांनी सांगितले की, We have no objections necessary orders may be given . तुम्ही म्हणता आमचे काही ऑब्जेक्शन नाही आणि ट्रॅब्युनलने निर्णय दिला तो आम्ही स्वीकारला. हे कशासाठी ? आम्ही स्वीकारला कशासाठी ? " यतीनखाने पर अमीरखाना बनाया जा रहा है, और आपण वक्फ बोर्डके अध्यक्षके नाते देख रहे है. इसका मेसेज क्या गया है वो आपको पता है उससे आपकी आवाज काँप रही है.महाराष्ट्रात जे लॅन्ड ग्रॅपिंग चाललेले आहे, मुंबईमध्ये एफएसआय वाढविणे असेल,ज्यांच्या लीज संपल्या आहेत त्यांच्या जागा ताब्यात न देणे असेल अशा पध्दतीने ठिकठिकाणी भूखंड हडपण्याचे जे काम चालले आहे ते चालवणाऱ्या सरकारला मला टॉलस्टॉयची गोष्ट सांगावयाची आहे. How much land a man need आणि....................

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

त्याचे उत्तर आहे, साडेपाच फूट जमीन. एका माणसाला प्रचंड श्रीमंत व्हावयाचे असल्याने तो देवाची आराधना करतो. त्याच्या आराधनेमुळे देव त्याला प्रसन्न होतो. देव त्याला म्हणतो की, सूर्योदय झाल्यानंतर तू धावायला लाग. सूर्योदयापासून तू जितका धावशील तितकी जमीन तूझ्या मालकीची होईल. तो रात्रभर जागा राहतो. पहाटे सूर्योदयाची पहिली किरणे दिसल्याबरोबर तो धावायला सुरु करतो. दिवसभर धावत राहतो. सूर्योदय झाल्यानंतर तो एका ठिकाणी धाडकन कोसळतो आणि तो उठतच नाही. गावातील लोक येऊन त्याला साडेपाच फूट जमिनीमध्ये पुरतात. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारला मी एवढेच सांगू इच्छितो की, Man needs 5.5 feet जमीन एवढे लक्षात ठेवावे आणि या प्रश्नासंबंधी सी.बी.आय.चौकशी करण्यात यावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज वक्फ बोर्डाच्या जमिनीसंदर्भात आणि एकूणच वक्फ बोर्डाच्या कार्यपध्दतीविषयी जी चर्चा चालू आहे त्यासंबंधी माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे तर ही चर्चा करताना मला एका गोष्टीचे दु:ख होते. मुस्लीम समाजातील काही दानशूर लोकांनी समाजाच्या विकासासाठी, धार्मिक कार्यासाठी, कल्याणकारी कामासाठी आपल्या संपत्तीतून दिलेल्या जमिनींची आज महाराष्ट्रात काय अवस्था आहे ती सगळ्यात महत्वाची गोष्ट आहे. खरे तर ज्याचे जळते त्याला कळते. मी त्या समाजातून आलो, ज्या समाजाची चर्चा चालू आहे. 92 हजार एकराच्या आसपास जमीन शहरालगत, मुख्य रस्त्यावर असलेली समाजाच्या भल्यासाठी वापरता आली असती. परंतु या जमिनींच्या संदर्भात मागील 2-3 महिने वृत्तपत्रात ज्या बातम्या छापून आल्या ते पाहता माझ्यासमोर एक प्रश्न उपस्थित झाला आहे. तो प्रश्न असा आहे की, ज्या लोकांनी समाजाच्या नेत्यांना निवडून दिले त्याच नेत्यांनी जमिनींवर ताबा मिळविला आहे. खरे तर या जमिनी त्या समाजाच्या विकासासाठी वापरावयाच्या होत्या. तो समाज कुठे आहे? दलितापेक्षा दलित असलेला समाज म्हणजे मुस्लिम समाज आहे. आज 45 टक्के मुस्लिम समाज झोपडपट्टीमध्ये राहतो आणि कारागृहातील एकूण बंदींपैकी 40 टक्के लोक या समाजाचे आहेत. शिक्षणामध्ये पिछाडलेला, न्याय व्यवस्थेशी बिलकूल संबंध नाही, बँकिंग व्यवहारामध्ये येऊ देत नाहीत. सरकार स्थापन करण्यामध्ये हातभार लावणाऱ्या या समाजाला सरकारमध्ये वाटा मिळत नाही. या शासनामध्ये कोण गंभीर आहे? सभागृहातील सदस्य गंभीर झ ााले. मी एक महत्वाचे पत्र वाचून दाखविणार आहे. दिनांक 26 मार्च, 1976 रोजी देशाच्या माजी पंतप्रधान कै.इंदिरा गांधी या देशातील सर्व मुख्यमंत्र्यांना एक पत्र पाठविले होते. त्या पत्रात त्या काय म्हणाल्या होत्या?

(यानंतर हिंदी श्री.शर्मा यांचेकडे...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद पाशा पटेल जारी

"कुछ समय से मैं वक्फ प्रशासन को सुधारने के लिए चिंतित हूँ. राज्य सरकारों को चाहिए कि वो यह सुनिश्चित करे कि वक्फों की ठीक से देख भाल की जाए और राज्य वक्फ बोर्ड उनका संचालन 1954 के वक्फ अधिनियम के हिसाब से करें. कुछ निम्नलिखित मुद्दों पर आपको फौरन ध्यान देने की जरुरत है.

कई कारणों से जिनमें विभाजन के बाद की विपरीत परिस्थितियां भी शामिल हैं, बड़ी संख्या में वक्फ संपत्तियां निजी पक्षों और साथ ही राज्य सरकार के विभागों और स्थानीय निकायों द्वारा कब्जा ली गई हैं. वक्फ बोर्ड जब चाहे संबंधित राज्य सरकार के विभागों के खिलाफ कानूनी कार्रवाई शुरु कर सकते हैं. ऐसे आरोप वांछनीय नहीं हैं, इसलिए आपको इस मुद्दे को प्रशासनिक आधार पर सुलझाना होगा. बहुत पहले 1961 में ही ऐसे मामलों को जल्द निपटाने के लिए तीन निम्नलिखित ठोस सुझाव दिए गए थे.

1. जहां भी संभव हो वक्फ सम्पत्ति को खाली कर दिया जाए और संबंधित वक्फ को वापस कर दिया जाय.
2. जहां जमीन पर मंहगे भवनों का निर्माण किया जा चुका है और उनको खाली करना संभव नहीं है, सरकारी विभागों को वक्फ बोर्डों के साथ सदा के लिए संबंध स्थापित कर लेने चाहिए और इन बोर्डों को बाजार के हिसाब से इकट्ठी राशि दे दी जानी चाहिए, या
3. वैकल्पिक रुप से राज्य सरकार बोर्डों से उचित बाजार की कीमत के हिसाब से जमीन खरीद सकती है. अगर वह जमीन पर अपने अधिकार छोड़ने को तैयार हो जाएं. प्रत्यक्ष रुप से इनका संचालन करने वाले या संबंधित मुतवल्लियों से उनकी हामी और उनके अधिकार छोड़ने के लिए जरुरी कागज हासिल किए जा सकें.

मैं समझती हूँ कि वक्फ बोर्डो ने आपको उन वक्फ संपत्तियों की सरकारी सूचियां भेज दी है जिससे कि सरकारी विभागों और स्थानीय निकायों के सुझावों पर अमल करते हुए इन सबसे निपट लिया जाए. समय समय पर समीक्षा भी की जा सकती है. और मुझे तथा वक्फ के मुतवल्लियों को इसकी मासिक रिपोर्ट भेजी जानी चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद पाशा पटेल जारी

अधिकतर वक्फ संपत्तियां बहुत ही कम दाम पर किराए पर दी गई है, जो कि किराया नियंत्रण अधिनियम के तहत बढ़ाया नहीं जा सकता. वक्फ जांच समिति की आंतरिक रिपोर्ट में सुझाव दिया गया है कि धार्मिक और कल्याणकारी उद्देश्यों के लिए बनाए गए सभी सार्वजनिक वक्फों, बल्कि किसी भी समुदाय के सभी सार्वजनिक ट्रस्टों और अनुदानों को किराया नियंत्रण अधिनियम के प्रावधानों से छूट दे दी जानी चाहिए.

. . . नंतर जुन्नरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

सभापती महोदय, एकेकाळी म्हणजे 1976 मध्ये या देशाच्या पंप्रधानांनी सगळया राज्याच्या मुख्यमंत्र्यांना वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या संदर्भात सूचना दिलेल्या होत्या. परंतु या जमिनीच्या संदर्भात सगळीकडे गोंधळच चालू आहे. या जमिनीमध्ये कोणाचा बळी जाणार आहे या समाजाचा बळी जाऊ एवढेच मला वाटते. वक्फ बोर्डाच्या संदर्भात या ठिकाणी जवळ जवळ अडीच तीन तास चर्चा झालेली आहे. परंतु या चर्चेतून वक्फ बोर्डाच्या जमिनी कोणी कोणी हडप केल्या यासंदर्भात शासन श्वेत पत्रिका काढणार आहे काय? वक्फ बोर्डाचा किती निधी लंपास झाला याची माहिती मिळणार आहे काय? मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी, मुस्लीम समाजातील लोकांना वर आणण्यासाठी प्रयत्न झाले तरच या चर्चेला न्याय मिळाला तरच या चर्चेला काही तरी अर्थ राहील. सभापती महोदय, मुस्लीम समाजामध्ये दोनच व्यक्तींच्या नावासंबंधी चर्चा सुरु आहे एक म्हणजे राजेंद्र सच्चर नावाच्या एका हिंदू व्यक्तीने मुस्लीम समाजाचा एक्सरे काढण्याचे काम केलेले आहे त्या व्यक्तीच्या नावाने चर्चा सुरु असून एका बाजूला वक्फ बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एम.ए. अझिज यांच्या बाबत समाजात चर्चा सुरु आहे. यामध्ये डॉ. एम.ए.अझिज दोषी आहेत की, नाहीत हे माहिती नाही परंतु वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी विकून खाल्ली किंवा प्रॉपर्टी विकण्यास मदत केली अशी समाजामध्ये जोरदार चर्चा सुरु आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनी कोणी कोणी विकल्या हे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष म्हणून डॉ. एम.ए.अझिज यांनी सांगणे आवश्यक आहे. वक्फ बोर्डामध्ये शबाना आझमी, दिलीप कुमार सुध्दा आणि अजून कोण कोण सदस्य आहेत याची माहिती जनतेला मिळत नाही तसेच बरेच सदस्य बैठकीस उपस्थित राहत नाहीत अशीही चर्चा समाजात सुरु आहे. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला सर्व गोष्टीकडे लक्ष द्यावे लागणार आहे. यामध्ये जे दोषी आहेत त्यांना सजा मिळाली पाहिजे. वक्फ बोर्डाचे जे ट्रस्टी आहेत त्याचे रजिस्ट्रेशन झाले पाहिजे. मुस्लीम समाजाच्या जमिनी हडप करण्याचे काम चालले आहे. आपल्या बाजूने कोण आहे हे समाज आता ठरविणार आहे. सभापती महोदय, दर्ग्यामध्ये बकरे कापले जातात, त्या बक-यांची कातडी विकण्यामध्ये सुध्दा लोकांनी कमिशन घेतलेले आहे. हे कमिशन जनतेला दिसत नाहीत का ? खरे म्हणजे मुस्लीम समाज कोठे चालला आहे याकडे आपले लक्ष असावयास पाहिजे परंतु तसे दिसत नाही. ( अडथळा) माझ्याकडे जी माहिती आहे ती मी वाचून दाखवितो.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..............

सभापती महोदय, बकऱ्यांच्या कातड्याचे टेंडर काढण्यात आले त्याचे दर मी वाचून दाखवितो. सन 1995-96 मध्ये 6 लाख 85 हजार, 1996-97 मध्ये 5 लाख 55 हजार, 1997-98 मध्ये 8 लाख 7 हजार, 1998-99 मध्ये 4 लाख 99 हजार, 1999-2000 मध्ये 2 लाख 50 हजार, 2000-2001 मध्ये 9 लाख 31 हजार, 2001-02 मध्ये 10 लाख 64 हजार, 2002-03 मध्ये 12 लाख 1 हजार, 2003-04 मध्ये 7 लाख 20 हजार, 2004-05 मध्ये 9 लाख 2 हजार आणि 2005-06 मध्ये 3 लाख 66 हजार असे दर आहेत आणि याबाबतचे अधिकार अध्यक्षांना आहेत. मी जे सांगितलेले आहे ते राज्य शासनाने नेमलेल्या काद्री समितीच्या अहवालात आहे. मी माझ्याकडील माहिती सांगितलेली नाही की वर्तमानपत्रातील माहिती सांगितलेली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांची सही असलेली माहिती वाचलेली आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब म्हणजे देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी सच्चर समिती नेमली होती. त्या समितीने केलेल्या शिफारशी मी वाचून दाखवितो.

"अतिक्रमण को खाली कराने के लिए सरकार को और कड़ा रवैया अपनाना होगा. यह सारी सम्पत्ति खाली कराना आवश्यक है. इससे पिछड़े हुए समाज को न्याय मिलेगा."

तेव्हा या संदर्भात शासन विचार करेल अशी अपेक्षा आहे. या चर्चेमधून काही फलनिष्पत्ती निघाली पाहिजे, समाजाचे भले व्हावयास पाहिजे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पुरे करतो.

--------------

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.अनिस अहमद (औकाफ मंत्री) : सभापति महोदय, मैं इस विभाग का मंत्री हूँ और आपने मुझे बोलने के लिए परवानगी दी है, इसके लिए मैं आपका आभारी हूँ. यहां पर माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते जी ने मेरे पिताजी का नाम लिया. उनके नाम को लेकर यहां पर रिकार्ड में गलत नहीं आना चाहिए, इसलिए मेरा स्पष्टीकरण देना अत्यन्त आवश्यक है. 1932 में जब खतीजाबाई ट्रस्ट बना था तो उस ट्रस्ट में मेरे पिताजी ने सदस्य के रुप में काम किया था. वे अभी इस दुनिया में नहीं हैं. उनके ऊपर जो आरोप लगाए गए हैं, वे सरासर गलत हैं. इस ट्रस्ट के अन्तर्गत एक आई.टी.आई. चल रहा है, जहां पर केवल रजिस्ट्रेशन फी के रुप में 25 रुपए लिए जाते हैं. इस प्रकार से गरीब और अनाथ बच्चों को पढ़ाने लिखाने का काम इस ट्रस्ट के माध्यम से हो रहा है. यह ट्रस्ट मेरे पिताजी ने 1932 में शुरु किया था. इस ट्रस्ट के बारे में आज तक कोई आरोप नहीं लगा है. इस ट्रस्ट ने ईमानदारी से लोगों की मदद करने का काम किया है. मा. सदस्य श्री. रावते जी ने जो आरोप लगाए हैं, वे सरासर गलत हैं. इसलिए इस बारे में मेरा यहां पर खुलासा करना बहुत जरुरी है.

सभापति महोदय, यहां पर इस प्रकार का आरोप लगाया गया कि महमूदा शिक्षण संस्था को यू.एल.सी. के अन्तर्गत शतरंजी ट्रस्ट की जमीन दी गई है. मैं सभागृह में यह बात स्पष्ट कर देना चाहता हूँ कि यू.एल.सी. के अन्तर्गत सिर्फ इसी एक संस्था को जमीन नहीं दी गई है. सीलिंग के अन्दर सरकार के पास जो जमीन जमा हो जाती है, वह यू.एल.सी. के तहत संस्थाओं को दी जाती है और महाराष्ट्र में एक हजार संस्थाओं को इस प्रकार से जमीन दी गई है. सीलिंग की जमीन अगर किसी संस्था से निकालना है तो तलेगांव दाभोडा स्कीम में डालकर उसको वापस निकालते हैं. 7200 वर्ग मीटर की सरप्लस जमीन सिर्फ ग्राउन्ड का इस्तेमाल करने के लिए एज्यूकेशनल इन्सटिट्यूट को दी गई थी. यह इन्सटिट्यूट वक्फ में रजिस्टर्ड है. वक्फ की जमीन का मकसद यह है कि उसके पास जो जमीन है, उसका इस्तेमाल गरीब बच्चों की तालीम के लिए किया जाए, जिससे कि वे बच्चे समाज में अच्छा काम करने के लिए आगे आएं. बच्चों को आगे बढ़ाने के परपज से महमूदा शिक्षण संस्था को सिर्फ ग्राउन्ड का इस्तेमाल करने के लिए

. . . ZZ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. अनिस अहमद जारी

यह जमीन दी गई. लेकिन जब संस्था के ऊपर उंगली उठाई गई तो ठराव करके अरबन सीलिंग की यह जमीन जो सरकार से मिली थी वह नैतिक आधार पर सरकार को वापस कर दी. हमारी संस्था के ऊपर उंगली नहीं उठनी चाहिए.

सभापति महोदय, यह बात सच है कि हमारी संस्था ने लोन मांगा था. लेकिन देश में और महाराष्ट्र में जो बड़े बड़े नेता कॉलेज चलाते है, संस्था चलाते हैं, सभी लोग किसी न किसी बँक या वित्तीय संस्था से लोन लेते हैं. इस संस्था के पास पैसा न रहने की वजह से अगर हॉस्पीटल के लिए, चेरिटेबल काम के लिए लोन मांगा था तो लोन मांगना कोई नाजायज मामला नहीं है और इसलिए इसमें किसी को कोई अड़चन नहीं होनी चाहिए. मा. सदस्य श्री. रावते जी ने हमारे ऊपर इल्जाम तो लगा दिया, लेकिन मैं उनको बताना चाहता हूँ कि हमारी 3 एकड़ जमीन पर कब्रिस्तान बनाने के लिए मुंबई महानगरपालिका ने आज तक ठराव पास नहीं किया है. स्मशान भूमि का ठराव आपने पास कर दिया, लेकिन मुंबई महानगरपालिका में आपकी सरकार है और उसने पिछले 3 साल से कब्रिस्तान के लिए एन.ओ.सी. नहीं दिया है. मुंबई महानगरपालिका के अन्दर आपकी सरकार कब्रिस्तान को रोकने का काम कर रही है और आपने बड़ी आसानी से महमूदा शिक्षण संस्था के ऊपर आरोप लगा दिया. महमूदा शिक्षण संस्था को यू.एल.सी. के अन्तर्गत जमीन मिली थी, लेकिन वक्फ के अन्तर्गत 3 साल के अन्दर जमीन दी जा सकती है और हमने उस जमीन को वापस कर दिया है.

सभापति महोदय, कादरी कमेटी नवम्बर के महीने में अपाइंट हुई और यह कमेटी इसलिए अपाइंट हुई कि सरकार के बारे में अगर यह कहा गया कि महाराष्ट्र सरकार के पास कुछ पावर्स नहीं है, मिनिस्टर कुछ बोल नहीं सकता है. लेकिन अगर औकाफ मिनिस्ट्री यहां पर है और उसका मंत्री मुझे बनाया गया है और मेरे पास ऐसी शिकायतें आती हैं कि जमीन की धांधलियां हो रही है, जमीन की अदला-बदली हो रही है, मराठवाडे के इलाके में नांदेड, औरंगाबाद, परभणी, लातूर में जो करोड़ो रुपए की जमीन थी, उस जमीन की अदला-बदल की गई है तो उसकी जांच करने के लिए कादरी कमेटी अपाइंट की गई. मेरा ऐसा मानना है कि अगर कोई अपनी जमीन वक्फ को अल्लाह के नाम पर अच्छे काम के लिए देता है तो किसी को भी, यहां तक कि सरकार को भी पावर्स नहीं है कि वह जमीन की अदला-बदल कर दे. मेरे पास पूरी

ZZ 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. अनिस अहमद जारी

जमीन की लिस्ट है. 40-50 प्रकरण मेरे पास हैं. मराठवाडा के विभिन्न जिलों में अलग अलग दरगाहों के नाम पर में 300-400 एकड़ की जमीन पिछले 2-3 साल के अन्दर अदला-बदल की गई है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SBT/ पूर्वी श्री शर्मा... श्री अनिस अहमद... 17:15

और गलत तरीके से एनओसी देने का काम कोई करता है और मैं मंत्री होते हुए भी केवल देखता रहूं तो मैं यह समझता हूं कि अपनी जिम्मेदारी पूरी नहीं कर रहा हूं.अगर कोई यह कहता है कि उन्हें क्वासी ज्युडिशियल पावर है इसलिए वे कुछ भी करते रहे,बार बार किसी नेता का नाम लेकर यह कहते रहे कि वे किसी नेता की छत्रछाया में है और उनका कोई कुछ बिगाड़ नहीं सकता, तो मैं यह समझता हूं कि यह गलत है. अगर कोई किसी नेता का नाम लेकर अपने आपको बचाने का काम करेगा तो मैं यह बता देना चाहता हूं कि मुस्लिम समाज ने मुझे यहां पर मंत्री बनाकर बैठाया है. हाई कमांड ने मुझे यहां बैठाया है. मैं किसी से डरूंगा नहीं. मुझे ऊपर वाले को जवाब देना है और मुझे जवाब देने का हक है. मैं पूरी ईमानदारी के साथ जवाब दूंगा. कादरी कमेटी ने अपनी रिपोर्ट में वक्फ बोर्ड पर आरोप करते हुए लिखा है कि सारी जमीन बदली गई है, गलत तरीके से बेची गई है और गलत तरीके से एनओसी दी गई है. कादरी कमेटी ने अपनी रिपोर्ट में यह भी लिखा है कि मुंबई के ऑफिस में डुप्लीकेट मिनिट्स की किताब रखी गई. औरंगाबाद में बैठक होनी होती है. सीईओ के पास मिनिट्स की किताब रहनी चाहिए.लेकिन ऐसा न करके मुंबई में आमदार निवास में दो रुम में वक्फ बोर्ड का काम चलाकर गलत तरीके से ठराव लिया गया और करोड़ों रुपये की प्रापर्टी अदल-बदल की गई. तो इस तरह से गलत तरीके से वक्फ बोर्ड की प्रापर्टी बिक रही थी, मैं उसे न रोकता तो वह प्रापर्टी अदल-बदल हो जाती. इस तरह से मुंबई में दरगाह की जमीन बेची गई, कब्रस्तान की जमीन बेची गई. मस्जिद की जमीन बेची गई. औकाफ मंत्री होने के नाते मेरी यह जिम्मेदारी है कि मैं गलत काम को रोकू. इसलिए जिस कुर्सी पर मैं बैठा हूं, उस पर मुझें ईमानदारी से काम करना चाहिए.कादरी कमेटी 19 नवंबर को नियुक्त की गई थी. कादरी कमेटी ने पेपर में विज्ञापन दिया था कि संबंधित व्यक्ति या संस्था जिस किसी को इस मामले की जानकारी हो वे कादरी कमेटी के सामने अपनी जानकारी प्रस्तुत करें. कादरी कमेटी ने अनेक संस्थाओं से जानकारी ली. जितनी भी संस्थाएं कादरी कमेटी के सामने जानकारी देने के लिए आई, उसके बारे में कादरी कमेटी ने अपनी रिपोर्ट में लिखा है. अगर कोई यह कहता है कि मैं बहुत बड़ा हूं, मुझे क्वासी ज्युडिशिअल पावर है. मुझे कोई काम करने से रोक नहीं सकता. लेकिन सवाल यह है कि गलत तरीके से जमीन बेची गई है या नही, गलत तरीके से जमीन अदल-बदल हुई है या नहीं, किसके आशीर्वाद से यह हो रहा है, किसकी परमीशन से यह हो रहा है ? उन्होंने बड़े बड़े नेताओं का नाम लेकर

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जमीन अदल-बदल की है. इसलिए इस मामले की जरुर जांच होनी चाहिए और मैं अपनी भी जांच करवाने के लिए तैयार हूं कादरी कमेटी की रिपोर्ट आने के बाद वे सारी जमीनें वापस कैसे आएगी, इस मामले में चर्चा करने के लिए मैंने बैठक बुलाई थी. तो उस समय बहुत सारे लोग सुबह 5.00 बजे से लेकर रात के 12 बजे तक मेरे ऑफिस में बैठे रहे और बोलते रहे की बैठक रोको. लेकिन मैंने पूरी ईमानदारी के साथ काम किया. कोई भी कितना भी बड़ा ताकतवर राजनीतिज्ञ हो, मैं किसी से डरता नहीं हूं. मै सिर्फ अल्लाह ताला से डरता हूं.

श्री गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय येथे शासनाची भूमिका मांडत आहेत की वैयक्तिक अनिस अहमद म्हणून भूमिका मांडत आहेत ?

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री महोदयांवर आरोप झालेले आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : आरोपाचे उत्तर देत असतांना शासनाचा प्रतिनिधी म्हणून ते खुलासा करीत आहेत की वैयक्तिक खुलासा करीत आहेत, याबाबतचे स्पष्टीकरण सन्माननीय मंत्री महोदयांनी करावे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय सुध्दा दोन्ही सदनामध्ये अशा पद्धतीने येऊ शकतात. एखाद्या इश्यूवर, एखाद्या बाबतीमध्ये जर त्यांना व्यक्तिगत काही स्पष्टीकरण द्यावयाचे असेल तर ते सुध्दा देणे शक्य आहे.

यानंतर श्री शर्मा..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, यहां मेरे ऊपर व्यक्तिगत आरोप हुए हैं. चेरिटेबल संस्था चलाना कोई गुनाह नहीं है. इल्लीगल तरीके से कोई जमीन लेता है तो बात अलग है, लेकिन केबिनेट की सब कमेटी किसी को जमीन देती है और सिर्फ अकेले इसी संस्था को जमीन नहीं देती है, बल्कि नागपुर शहर के अन्दर, महाराष्ट्र के अन्दर अनेक संस्थाओं को जमीन दी गई है. इसलिए इस संस्था को चेरिटेबल काम करने के लिए जमीन दी गई है. लेकिन वक्फ की जमीन कभी भी किसी बिल्डर को नहीं दी जाती है. वक्फ की जमीन इसलिए होती है कि वह यतीम बच्चों के काम में आए, उनकी तालीम के काम में आए. बिल्डरों के लिए पुणे शहर के अन्दर पडित जमीन की अदला-बदली तहसीलदार और वक्फ बोर्ड कर देते हैं, यह बात कादरी कमेटी की रिपोर्ट में सामने आई है. अब इसकी सी.आई.डी जांच होनी चाहिए और जितनी जमीन की अदला-बदल हुई है, वह सारी जमीन रेस्टोर होनी चाहिए. इस बारे में स्पेशल ऑडिट होना चाहिए, इसलिए सरकार ने कादरी कमेटी अपाइंट की थी. यह कहा जाता है कि वक्फ मिनिस्ट्री को कोई पावर्स नहीं है, वह सिर्फ नाम के लिए है और बोर्ड के पास सारे पावर्स हैं. लेकिन मैं आपको बताना चाहता हूँ कि बोर्ड को दो तिहाई बहुमत से रिजोल्यूशन पास करना चाहिए और बोर्ड नाजायज रिजोल्यूशन नहीं ले सकता है. मेरे ऊपर आरोप लगाया गया कि बोर्ड ने एन.ओ.सी. नहीं दिया है. लेकिन बोर्ड का एन.ओ.सी. मेरे पास है और मैं उसको सभागृह के पटल रखता हूँ. मुझे किसी से व्यक्तिगत दुश्मनी नहीं है. वक्फ की प्रॉपर्टी प्रोटेक्ट करने के लिए महाराष्ट्र सरकार ने औकाफ मिनिस्ट्री बनाई गई है और मुझे इस विभाग का मंत्री बनाया गया है. इस प्रॉपर्टी का इस्तेमाल अच्छे काम के लिए होना चाहिए. यह प्रॉपर्टी बिल्डर को मॉल बनाने के लिए नहीं दी जानी चाहिए. यहां पर जितने भी माननीय सदस्य बैठे हुए हैं, उन सब की जिम्मेदारी यह देखने की है. मैं यहां पर व्यक्तिगत रुप से कुछ नहीं बोल रहा हूँ. मैं यहां पर औकाफ मंत्री के हिसाब से बोल रहा हूँ. मैं पूरी ईमानदारी के साथ कहना चाहता हूँ कि जिस तरीके से वक्फ की प्रॉपटी बेचने की शुरुआत हो गई है, वह ठीक नहीं है. औरंगाबाद शहर के बीचोंबीच में करोड़ों रुपए की सम्पत्ति है, वह समाज के लिए दी गई थी. सरकार इसके इस्तेमाल के लिए अच्छी योजनाएं बनाए और जो बच्चे गलत राह पर चल रहे हैं उनको अच्छी तालीम देकर रोजगार दिया जा सकता है. जिस तरीके से उस्मानाबाद, नांदेड़ के अन्दर दरगाह को दी गई जमीन की अदला-बदली की गई है, उसकी जांच करने के लिए कादरी कमेटी अपाइंट की गई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. अनिस अहमद जारी

थी. कादरी कमेटी की रिपोर्ट में यह बात साबित हो गई है कि इसमें बहुत ज्यादा भ्रष्टाचार हुआ है. बहुत सारे बिल्डर्स के नाम सामने आए हैं और उनको आयडेन्टिफाय किया गया है. ग्रामीण इलाके की लाखों रुपए की जमीन की करोड़ों रुपए की शहर की जमीन से अदला-बदल की गई है. इसलिए सेक्शन 51 के अन्तर्गत पूरे वक्फ बोर्ड की मेरे कार्यालय में मीटिंग बुलाई और सरकार ने निर्णय लिया है कि जितनी भी जमीन इल्लीगल तरीके से बेची गई है या लीज पर दी गई है या इल्लीगल तरीके से लोगों को दी गई है, वह सारी जमीन रेस्टोर होनी चाहिए. वक्फ की प्रॉपर्टी बिल्डरों के लिए नहीं है. इसका उपयोग चेरिटेबल ट्रस्ट के लिए होना चाहिए, ताकि वे अच्छा काम कर सकें. महाराष्ट्र में बहुत सारी वक्फ बोर्ड की प्रॉपर्टी पर अतिक्रमण हुआ है. इसको बचाना जरुरी है. जिस तरह से सरकार की प्रॉपर्टी पर इविक्शन लॉ लागू होता है, उसी तरह से वक्फ की प्रॉपर्टी से अतिक्रमण हटाने के लिए इविक्शन लॉ लाना होगा.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SBT/ पूर्वी श्री शर्मा श्री अनिस अहमद.. 17:25

जिस जमीन पर अतिक्रमण हुआ है, जिस दरगाह और कब्रस्तान की जमीन पर अतिक्रमण हुआ है, इन जमीनों को प्राप्त करने के लिए इव्हिक्शन कानून करना जरुरी है. यह कानून बनाने के बाद वह सारी जमीन हम प्राप्त कर सकेंगे. इस प्रकार से हमें 80 हजार एकड़ से ज्यादा जमीन प्राप्त होगी और इस जमीन पर हम योजना कर सकते हैं, विभिन्न योजनाओं से जो आय प्राप्त होगी उससे तालीम देने का काम कर सकते है, अच्छे अच्छे काम कर सकते हैं. यह मैं आपको बताना चाहता हूं.

सभापति महोदय, मुझ पर यह आरोप लगाया गया कि मैंने 5 एनओसी दी हैं. मैं यह बताना चाहता हूं कि मैंने 5 एनओसी नहीं दी है. बल्कि यह कहा गया कि औकाफ मंत्री को कोई अधिकार नहीं है. औकाफ मंत्री बनने के बाद मैंने केवल एक ही निर्णय लिया है और यह निर्णय लिया कि इल्लीगल तरीके से जितनी भी जमीन दी गई है, वह सेक्शन 51 के तहत वापस मिलनी चाहिए. केवल यही एक निर्णय मैंने लिया है.

सभापति महोदय, सेक्शन 23 के तहत और यूएलसी एक्ट के अन्तर्गत जिन्हें जमीन दी है, उन सभी संस्थाओं और नेताओं की सूची मेरे पास है, मैं वह सूची पटल पर रखता हूं. मेरे पास एक पत्र आया है. भूतपूर्व मंत्री श्री अझीम साहब के शहजादे ने पत्र लिखा है. जो मैं बताने जा रहा हूं वह मैं नहीं कह रहा हूं, बल्कि वह पत्र में लिखा है. उन्होंने अपने पत्र में लिखा है कि वक्फ बोर्ड ने बहुत बड़ी दलाली का काम किया है. भूतपूर्व मंत्री अब्दुल अझीम के भाई हाई कमांड को गुमराह करके एमएलसी बने. उन्होंने कादरी कमीशन को पत्र लिखा है. उन्होंने कादरी कमीशन को खरीदने और गुमराह करने की कोशिश की है. लेकिन कादरी साहब अच्छे आदमी है. उन्होंने पूरी ईमानदारी के साथ अपनी रिपोर्ट दी. कादरी कमेटी ने जमीन वापस लेने के लिए कहा है. वह जमीन वापस लेनी चाहिए. वक्फ बोर्ड पर गैर कानूनी ढंग से काम करने का आरोप लगाया गया है. गुंडागर्दी का आरोप लगाया गया है, झूठे आरोप करने का आरोप है, उल्हासनगर, जिला ठाणे की एक जज श्रीमती शहाणे का आदेश है.... अबरनाथ पुलिस स्टेशन में वक्फ बोर्ड के खिलाफ चोरी का आरोप दर्ज है. सेक्शन 458,852, 448,406,501, 508,109,114,144 इत्यादि के अंतर्गत क्रिमिनल केस दाखिल हैं. इसके साथ ही साथ औरंगाबाद वक्फ टेब्युनल ने 10 हजार रुपये फाईन भी किया है. ये सारी चीज़े लोगों के सामने हैं. वक्फ बोर्ड ने जितनी भी एनओसी दी है, वे सारे विवादास्पद मामले हैं.औरंगाबाद में ऐसे भी मामले हुए

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

है, जिसमें वक्फ बोर्ड ने पहले नोटिस दी है और फिर बाद में खुद ही क्लियरेंस सर्टिफिकेट भी दी है. सभी लोगों को पहले वक्फ बोर्ड ने नोटिस दी थी और फिर बाद में वक्फ बोर्ड ने खुद ही क्लियरेंस सर्टिफिकेट भी दिए. एक मामला और है. खतीजाबाई ट्रस्ट, एडव्होकेट जनरल, हाई कोर्ट प्रिमाईसेस, मुंबई.उस समय एक विधवा श्रीमती जैनतबाई, नागपुर. ...14 अक्तूबर को मुंबई हाई कोर्ट के आदेश से खतीजाबाई ट्रस्ट स्थापित हुआ था.

इसके बाद श्री शर्मा..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री अनिस अहमद..

इस ट्रस्ट ने यतीम बच्चों को पढ़ाने का काम किया है और उनको रोजगार देने का काम किया है. इस ट्रस्ट के ऊपर गलत तरीके से इल्जाम लगाया गया है और इससे इस ट्रस्ट के बारे में लोगों में कुप्रचार हो गया है. 1940 से खतीजाबाई ट्रस्ट काम कर रहा है और इसके बारे में पूरी जानकारी मैं सभागृह के पटल पर रखता हूॅं. इसको कोई भी देख सकता है.

सभापति महोदय, मैं अन्त में इतना ही कहूंगा कि अगर मुझे औकाफ मंत्री बनाया गया है तो औकाफ मंत्री के रुप में मेरे पास पूरी ताकत है. मैं केवल मंत्री के रुप में ही नहीं, बल्कि सरकार के रुप में काम कर रहा हूॅं. मैंने सेक्शन 20 के अन्तर्गत वक्फ बोर्ड को नोटिस दी है कि 15 दिन के अन्दर इसका हिसाब दिया जाए नहीं तो आपके ऊपर कार्रवाई होगी. मैं औकाफ मंत्री के रुप में वक्फ की प्रॉपर्टीज के हित में काम करना चाहता हूॅं. इतना कहकर मैं अपना भाषण पूर्ण करता हूॅं. धन्यवाद.

.. . . भाषण पूर्ण, नंतर सुंबरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख (मुख्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एका अतिशय महत्त्वाच्या प्रश्नावर आज या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे. गेल्या महिनाभरापासून प्रामुख्याने वक्फ बोर्डाची जी प्रॉपर्टी आहे त्या संबंधात राज्यात उलट सुलट अनेक प्रकारे चर्चा सुरू आहे. त्यात नेमकी राज्य सरकारची भूमिका काय आहे ? हे साऱ्यांच्या समोरे, राज्यासमोर निश्चितपणे येणे अपेक्षित आहे. राज्य सरकार या संबंधात नेमकी काय भूमिका घेणार आहे हेही या निमित्ताने राज्यासमोर येणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे या संबंधात केंद्र सरकारचा नवा 1995 चा कायदा आहे जो 1.1.1996 पासून लागू झालेला आहे. मला या ठिकाणी आवर्जून सांगितले पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे एखादे प्रकरण हाती घेतात तेव्हा त्याचा ते संपूर्ण अभ्यास करतात, ज्याला आपण रिसर्च म्हणतो तसा रिसर्च करूनच ते तो प्रश्न सतत मांडत असतात आणि ते मांडत असताना त्यांचा हे स्पष्ट असतो, प्रामाणिक असतो, जनहिताचा असतो त्यामुळे त्यांच्या हेतूबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. मात्र हे सारे करीत असताना त्यांच्यासमोर एक लक्ष्य असते, टार्गेट असते. ते केव्हाही हवेत गोळीबार करीत नाहीत. कारण हवेत गोळीबार केल्याने कोणाला गोळी लागेल याचा अंदाज लागत नाही. तेव्हा त्यांचे काम हे नेहमीच टार्गेटेड काम असते हे साऱ्या महाराष्ट्रालाच माहिती आहे. त्यांचे माझे संबंध हे नेहमीच प्रेमाचे राहिलेले आहेत. एखाद्या प्रकरणात मुख्यमंत्री गुंतत नाहीत वा गुंतविले जात नाहीत तोपर्यंत त्याला काही महत्त्व येत नाही. त्याला मग मोठे कव्हरेज देखील मिळत नाही. नाही तरी हल्ली आपल्याला सगळ्याच चॅनेल्सवर हेच पहावयास मिळते. काही चॅनेल्स तर यासाठी अगदी डेडिकेटेड झालेली आहेत. अर्थात हे त्यांचे कामच आहे. शिवाय विरोधी पक्ष म्हणून राज्यामध्ये आम्ही काही काम करीत आहोत हेही दाखविता येते. त्यातही प्रामुख्याने मुस्लिम समाजाच्या जमिनींबाबत काही घडत असेल तर त्यांनी बोलावयाचे नाही तर मग आणखी कोणी बोलायचे ? त्याबाबत त्यांचे धोरण, त्यांचे निर्णय, आतापर्यंतचे त्यांचे काम सगळ्यांनाच माहिती आहे आणि म्हणूनच आज तो समाजदेखील आश्चर्याने त्यांच्याकडे पहात असेल इतक्या तडफेने ते हा विषय मांडत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे आमच्याच जिल्ह्यातील आहेत. शेतकरी संघटनेचा ते एक हाडाचे कार्यकर्ते आहेत. ते काम करीत असताना या सभागृहामध्ये पोहोचणे त्यांना महत्त्वाचे होते आणि ते त्याप्रमाणे पोहोचले आहेत आणि त्यांनीही या बाबत काही गोष्टी येथे तडफेने मांडलेल्या आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....... 3इ 1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

मी यामध्ये राजकारण मानत नाही. शेवटी कोणताही विषय राजकारणाशी निगडीत केला पाहिजे असा प्रयत्न सातत्याने होत असतो. वक्फ बोर्डाच्या सर्व जमिनी "हडप" केल्या जात आहेत असे चित्र निर्माण केले जात आहे. याठिकाणी "हडप" शब्द चांगला वापरला आहे. माननीय सदस्य नेहमी चांगले मराठी शब्द वापरतात. कसे बोलावे याबाबत त्यांच्या अंगी विशेष गुण आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांसमोर हा मोठा आदर्श आहे. या सभागृहाच्या इतिहासामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांची अशाप्रकारे अवस्था कधीही रिडयूस झाली नव्हती. या ठिकाणी कुणालाही संधी नाही. तेव्हा ते जे बोलतील ते प्रमाण असते. मग ते माननीय सभापतींनी, आम्ही सर्वांनी ऐकले पाहिजे. पत्रकार मंडळी तर ऐकत असतात. सभापती महोदय, या ठिकाणी संपूर्ण वक्फ बोर्डाच्या जमिनी संदर्भात चर्चा उपस्थित होते तेव्हा वक्फची जमीन म्हणजे नेमके काय? वक्फ प्लॅन कुणाला म्हणावयाचे हे पहिल्यांदा ठरले पाहिजे. वक्फ प्लॅन मध्ये असलेली जमीन हस्तांतरित झाली असेल तर त्याबाबतचा दोष निश्चितपणे त्या बोर्डावर येतो. माननीय औकाफ मंत्र्यांनी या ठिकाणी व्यक्तिगत खुलासा करतांना आपली भूमिका अत्यंत प्रामाणिकपणे मांडली. त्यांच्या भूमिकेचे आपण स्वागत केले. त्यांचे भय दूर करण्याचे काम, मशागत आपण 15 दिवसापासून करीत आहात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्यावर टीका झाली असल्यामुळे मी खुलासा करतो की, गेल्या 15 दिवसामध्ये माननीय श्री. अनिस अहमद यांचेशी एक-दोन वेळा फोनवर बोलणे झाले. या व्यतिरिक्त त्यांच्याबरोबर माझा कोणताही व्यवहार झालेला नाही. आपल्या मंत्रिमंडळामधील एखाद्या कॅबिनेट मंत्र्याविषयी अशा प्रकारे या ठिकाणी बोलणे आणि त्या संदर्भात माझ्यावर हेत्वारोप करणे बरोबर नाही. या संदर्भात आपण माझ्यावर वार करावे.

श्री. आर. आर. पाटील : 15 दिवसामध्ये माननीय मंत्रिमहोदयांचे आपणाबरोबर फोनवर बोलणे झाले आहे...

श्री. विलासराव देशमुख : मी 15 दिवस बाहेर असल्यामुळे त्यांच्याशी बोलणे झाले असेल. मी कुणावरही हेत्वारोप करीत नाही. ते माझे सहकारी आहेत. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी माझ्या सर्व कामामध्ये मला सहकार्य केले आहे. त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी मी बोलत नाही. त्यांची भूमिका त्यांनी प्रामाणिकपणे मांडली. ज्या कामासाठी त्यांना नेमले आहे ते काम ते उत्तम पध्दतीने करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख...

आहेत याबद्दल शंका नाही. याबाबत त्यांच्यावर कुणाचाही दबाव असण्याचे कारण नाही. शेवटी एका समाजाची हजारो एकर जमीन चुकीच्या मार्गाने हस्तांतरीत होत असेल तर कोणत्याही औकाफ मंत्र्यांना झोप येऊ शकत नाही हे सरळ आहे. यामध्ये चुकीचे काहीही नाही. म्हणून मी सांगत होतो की, ही वक्फची जमीन कोणती आहे? एखाद्या संस्थेने किंवा एखाद्या व्यक्तीने आपल्याकडील जमीन, चल किंवा अचल मालमत्ता वक्फ प्लॅन म्हणून दान किंवा देणगी दिली असेल तर ती वक्फची मालमत्ता होते. म्हणून वक्फच्या प्रॉपर्टीच्या संदर्भात ही चर्चा समजू शकतो. परंतु जी प्रॉपर्टी वक्फची नाही, आणि ती आहे अशाप्रकारे सतत त्या बाबतचे दाखले, उतारे या ठिकाणी दिले जात आहेत. सुप्रिम कोर्टातील वकिलाला सुध्दा काही वेळेस कायद्यातील कलम सापडणार नाही अशापध्दतीचे सुंदर ऑर्ग्युमेंट केले जाते. या सभागृहामध्ये एक चांगला विधिज्ञ आल्यामुळे या राज्याचे नुकसान झाले आहे. काही हजारो लोकांना ते न्याय देऊ शकले असते. याबाबत आपले कौतुक केले पाहिजे. यामध्ये न्याय देतांना आपण आरोपीचीच बाजू घेतली असती. आणि म्हणून या ठिकाणी एक गोष्ट खरी आहे की, सन 2002 मध्ये वक्फ बोर्ड नेमण्यात आले तेव्हा या वक्फ बोर्डाच्या घटनेमध्ये पदसिध्द सदस्य आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरू....

वक्फ बोर्डाच्या घट□चे जे स्ट्रक्चर आहे, त्यामध्ये पदसिद्ध सदस्य आहेत. त्यावर □□लाही □मता येते अशी परिस्थिती □ही. त्यामध्ये दो□ □सदार हे मुस्लीम समाजाचे असले पाहिजेत अशी अट आहे. त्यामुळे त्यावेळेस श्रीमती शबा□ आझमी या राज्यसभेच्या सदस्या होत्या, श्री.दिलीप □मार हेही राज्यसभेचे सदस्य होते, म्ह□□ आम्ही त्यांची □□युक्ती □ली. पदसिद्ध □म□□ ही □□च्या □वा□ असत □ही. त्या दोघां□ही वक्फ बोर्डाच्या बैठ□ला जा□याचे □ष्ट घेतलेले □हीत. त्यां□ सांि□ले □, आम्हाला त्यामध्ये फारसा रस □ही. परंतु आम्हाला त्यांच्या □म□□ □र□ □रजेचे होते. □र□ □यद्याप्रमा□ ज्या तरतुदी होत्या त्याप्रमा□ त्यांच्या □म□□ आम्हाला □राव्या ला□ल्या. इतर ज्या □टे□रीज आहेत, त्यामधून सदस्य म्ह□□ □□युक्ती □ली जाते. त्या बोर्डाच्या सदस्यांमधू□ अध्य□ची □□वड □ली जाते. त्या ठि□□ जे □ही सदस्य उपस्थित होते, त्या उपस्थित सदस्यां□ बोर्डाचे अध्य□ची □□वड □लेली आहे. बोर्डाचे अध्य□ हे □मि□□ने □□वडले जात □हीत. □रे म्ह□जे अध्य□ची 2002 मध्ये □□वड झाली, आज 2007 साल आहे. या दरम्या□च्या □ळामध्ये □धीही □□त्याही प्रश्□ची चर्चा, विवाद, □□ष्पन झालेले □हीत. अ□ी अली□डेच □ही □□□यामुळे गैरसमजुतीने वाद निर्माण झाले असतील. त्या संबंधा□ आप□ □द्री समिती □मली. □द्री समिती □म□याचा प्रस्ताव मंत्री महोदयां□ पाठविला, त्यावर मी सही □ली. बोर्डाचे अध्य□ डॉ.अझिज हे माझ्या जवळचे आहेत, त्यां□ मी □हीतरी संर□□ देतो आहे, माझ्या संर□□त □ली हा □रभार चाललेला आहे,म्ह□□ माझ्यावर हेत्वारोप □ला जातो. श्री. चांद पाशा इ□मदाराबद्दल स्टाईलमध्ये अंडरलाई□ □रू□ सन्माननीय सदस्यांनी उल्ले□ □ला, ते आम्हाला □ळते. आम्हाला □ळत □ही अशातला भा□ □ही. जसे सन्माननीय सदस्य इत□ दिवस ति□डे आहेत तसे आम्हीही इ□डे आहोत. त्यामुळे आम्ही एकमेकांना चां□ले ओळ□□ आहोत. बोर्डावर □□चीही □□युक्ती □रता□ तुम्ही □साही □रभार □रा असे प्रमा□पत्र आम्ही त्यां□ दिलेले □ही. ते ट्रस्टी म्हणून काम करत आहेत त्यामुळे या स□ळया जमि□चे संर□□ □र□याची त्यांची जबाबदारी आहे. ते ही जबाबदारी प्रामा□□□□ पार पाडत नसतील तर त्याची चौ□शी करण्याबाबतचे आदेश सुध्दा आम्हीच पारित □लेले आहेत. या संबंधात मंत्री महोदयां□ पाठविलेला प्रस्ताव आम्हीच मंजूर □लेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सां□ले □, ती□ महि□

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ....

त्या अहवालावर मुख्यमंत्र्यांनी सही केली नाही. त्या प्रस्तावावर केव्हा सही करावी याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यावर आजच सही करा, उद्याच सही करा, असे म्हणता येत नाही. याबाबतचा जो अहवाल आला तो आम्ही स्वीकारला. वक्फ बोर्डाच्या जास्तीत जास्त प्रॉपर्टीज मराठवाड्यामध्ये आहेत. आमच्या लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, जालन्यामध्ये, बीडमध्ये आहेत. कारण आम्ही अनेक वर्षे निजाम राजवटीमध्येच राहिलो. त्यामुळे त्या ठिकाणी वक्फ बोर्डाच्या मोठयाप्रमाणात जमिनी आहेत. हे मान्यच केले पाहिजे की, या बहुतांश जमिनीवर अतिक्रमण आहेत. ज्या उद्देशासाठी हे वक्फ बोर्ड निर्माण केले, त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. गरीब विद्यार्थी असतील, दीन लोक असतील त्यांची व्यवस्था व्हावी, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी, या सत्कार्याच्या कामासाठी त्या ठिकाणच्या पैशाचा उपयोग व्हावा, त्या जमिनीतून उत्पन्न घ्यावे आणि विकास करावा, ही मूळ कल्पना आहे. परंतु ही मूळ कल्पना साकार होऊ शकलेली नाही. ही गोष्ट खरी आहे की, जसे मंत्री महोदय म्हणाले की, या जमिनी आपल्याला परत घ्यावयाच्या असतील तर त्यासाठी वेगळ्या कायद्याची आवश्यकता आहे. या त्यांच्या मताशी मी 100 टक्के सहमत आहे. अशाप्रकारचा कायदा इतर राज्यांनी केलेला आहे. तसा कायदा महाराष्ट्र राज्यानेही केला पाहिजे. अवश्य राज्य सरकार यासंबंधीचा कायदा करण्याच्या दृष्टीने पावले उचलेल आणि जमिनीवर जे अतिक्रमण आहे ते काढण्याचा प्रयत्न निश्चित केला जाईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. मी एवढेच सांगू इच्छितो की, माझ्या बाबतीत सातत्याने अनेक दिवस रसाळ चर्चा चाललेली आहे की, या प्रकरणामध्ये प्रचंड घोटाळा आम्ही केलेला आहे. मला सांगावयाचे आहे की, सदरची जमीन वक्फची आहे की नाही ? एवढाच मर्यादित मुद्दा आहे. ती वक्फची जमीन नसेल तर बाकीच्या चर्चेला काही अर्थच नाही आणि ती असेल तर या चर्चेला अर्थ आहे. वक्फच्या प्लॅनमध्ये ती जमीन नाही हे कोर्टाच्या अनेक निर्णयामधून सिध्द झालेले असेल आणि त्यानंतर व्यवहार झालेले असतील तर त्याचा या सदनाशी, या चर्चेशी सुतराम संबंध नाही. कारण 1956 सालापासूनची क्रोनोलॉजिकल माहिती माझ्याकडे आहे, ती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. त्या माहितीचा कोणीही अभ्यास करावा. अनेक कोर्टाच्या निर्णयामध्ये सिध्द झालेले आहे की,.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

ही खाजगी जमीन आहे. ही जमीन त्यांनी एकाला विकली. एकाची इसार पावती केली. सय्यद नदिमुल्ला हुसेन यांनी पहिल्यांदा श्री. विजयेंद्र काब्राला ती जमीन विकली. त्याची इसार पावती केली. त्यानंतर त्यांनी इतरांशी करार केला. त्यामुळे भांडण निर्माण झाले. श्री. काब्रा आणि दुसरे श्री. अग्रवाल या दोघांच्यामध्ये वाद निर्माण झाला. कारण इसार पावती एकाची केली होती. जर ती वक्फची प्रापर्टी असती तर त्यांनी खाजगी माणसाची इसार पावती केली नसती. दोन व्यक्तींना जमीन विकल्यामुळे त्या दोघांमध्ये वाद निर्माण झाले. तीन वर्षानंतर ते स्वत: असे म्हणावयास लागले की, ही वक्फची जमीन आहे. सभापती महोदय, या सगळ्या संदर्भामध्ये दोघांमध्ये वाद निर्माण झाला. श्री. विजयेंद्र काब्रा यांच्याबद्दल मराठवाड्यात सर्वांना माहीत आहे की, ते ज्येष्ठ स्वातंत्र्य संग्राम सेनानी आहेत आणि हैद्राबाद मुक्ती लढ्यामध्ये त्यांनी आपले सारे आयुष्य घातले. मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो की, श्री. विजयेंद्र काब्रा हे स्वत: कधीही अशा पध्दतीने वक्फची जमीन घेणार नाहीत. ज्यांनी आयुष्यभर लढा दिला, जे परवापर्यंत आमच्याकडे स्वातंत्र्य संग्राम सेनानींचे अध्यक्ष म्हणून राहिले ते अशा पध्दतीने चुकीच्या मार्गाने वक्फची जमीन कधीही खरेदी करणार नाहीत. सातत्याने वेगवेगळ्या ठिकाणी मग ती वक्फची जमीन नसेल तर ईनामी आहे काय यासंदर्भामध्ये उपजिल्हाधिकारी त्यानंतर राज्यमंत्र्यांपर्यंत हे सगळे प्रकरण तपासले गेले आणि प्रत्येकाचे निकाल आहेत की, ही जमीन वक्फची नाही आणि ईनामी सुध्दा नाही. यामध्ये जे रेकॉर्ड त्यांच्यासमोर आलेले आहेत आणि जे निर्णय झाले तेवढे मी सांगतो. सन्माननीय सदस्यांनी ज्या गॅझेटचा उल्लेख केला त्या गॅझेटच्या मोठ्या पुस्तकामध्ये सुध्दा आपण सांगितल्याप्रमाणे फक्त 400 बाय 50 एवढ्या जमिनीचा मसजीदबद्दलचा उल्लेख आहे आणि ती जमीन सुरक्षित आहे. त्या जमिनीला कोणीही हात लावलेला नाही. 80 कोटी रुपयांची जमीन 8 कोटी रुपयांना घेतली, 9 कोटी रुपयांना घेतली हे सगळे जे काही प्रचाराचे काम चालले आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, या जमिनीचे एकूण क्षेत्रफळ 13 एकर 30 गुंठे आहे. सार्वजनिक वाचनालयासाठी 2 एकर 4 गुंठे जमीन प्रत्यक्षात गेलेली आहे. महानगरपालिकेच्या रस्त्यासाठी 2 एकर 28 गुंठे जमीन प्रत्यक्षात गेलेली आहे. औरंगाबाद महापालिकेच्या उद्यान आरक्षणासाठी 1 एकर 20 गुंठे जमीन गेलेली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

आहे. त्याचबरोबर नागरिकांनी अतिक्रमण केलेली जवळपास 2 एकर जमीन आहे आणि औरंगाबाद व्यापारी संकुल आणि पार्किन्गसाठी 1 एकर 14 गुंठे जमीन गेलेली आहे. म्हणजे 13 एकरामधील प्रत्यक्षात जी जमीन भारत निर्माण कंपनीने घेतलेली आहे त्यामध्ये त्यांच्याकडे फक्त 4 एकर जमीन उपलब्ध आहे. आज ती जी मसजिद आहे आणि जे रिझर्वेशन आहे ते सगळे अबाधित आहे. कोणत्याही मसजिदला कोणी हात लावलेला नाही. परंतु जी वातावरण निर्मिती केली जात आहे त्यामध्ये यात फार मोठा घोटाळा झालेला आहे आणि त्या ठिकाणी मुस्लीम समाजाच्या जमिनी मुख्यमंत्र्यांचे बंधू घेत आहेत असे वातावरण दुर्दैवाने निर्माण केले जात आहे. म्हणून या ठिकाणी मी मुद्दाम सदनाला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, मग राजीनामा का दिला ? सन्माननीय सदस्यांनी चांगला प्रश्न विचारला. एक वकीलच हा प्रश्न विचारु शकतो. कारण ही गोष्ट नक्की आहे की, जमीन घेताना सर्व रेकॉर्ड तपासल्यानंतर, सुप्रीम कोर्टामध्ये डिक्री केल्यानंतर जमीन घेतली असताना जर अशा प्रकारची चर्चा होणार असेल आणि स्थानिक लोक जर हेत्वारोप करणार असतील तर त्या संस्थेमध्ये आपण राहणे योग्य नाही म्हणून बाहेर पडावे लागले. आपण त्यामध्ये तसेच राहू असे काही नाही. जरी ते बाजूला गेले तरी चर्चा थोडीच बाजूला जाते ? आपण ती चर्चा थोडेच बाजूला जाऊ देणार आहात ? जमीन घेतली तर का घेतली आणि बाहेर गेला तर का गेलात हे दोन्ही प्रश्न आपणच विचारु शकता. दुसरे कोण विचारणार ? अध्यक्ष महोदय, हेत्वारोप व्हावयास लागले म्हणून बाहेर गेले. त्या सगळ्या हेत्वारोपामध्ये आपण कशासाठी गुंतून राहावयाचे म्हणून 2005 मध्येच राजीनामा दिला. ही चर्चा 2007 मध्ये होत आहे. 2005 मध्ये सांगणे ठीक आहे की, आम्ही गूडफेथमध्ये जमीन विकत घ्यावी या हेतूने जमीन घेतली, क्लिअर टायटल आहे हे बघून जमीन घेतली. परंतु जर लोकांच्या मनामध्ये शंकाच असेल, संशयच असेल आणि मुख्यमंत्र्याशी संबंध जोडण्यापर्यंत ही गोष्ट जात असेल तर सार्वजनिक जीवनातील असल्यामुळे कारण नसताना आपण कशासाठी वाद निर्माण करावयाचा म्हणून आपण बाजूला गेले पाहिजे म्हणून आपण त्यातून बाजूला गेलेलो आहोत. त्या कंपनीने रीतसर खुलासा केला. सन्माननीय सदस्यांनी असे ऑब्जेक्शन घेतले की, तो खुलासा आपण "सामना" या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

वृत्तपत्रामध्येच का केला ? आता "सामना" वर्तमानपत्रावर तुमचा का राग आहे हे मला माहीत नाही. मला अजून ते कळलेले नाही. त्या कंपनीला असे वाटले की, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी हे तातडीने पहिला पेपर जर कोणता वाचत असतील तर तो "सामना". ते वृत्तपत्र त्यांच्या जवळचे आहे. म्हणून त्यांनी गुडफेथमध्ये, तुमच्याकडे हा खुलासा लवकर पोहोचावा या हेतूने त्या वर्तमानपत्रात खुलासा केला. कारण त्याचा परिणाम होणार नव्हता. कारण तुमचे ठरलेले होते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख...)

झोपलेल्या माणसाला जागे करता येते, पण ज्याने झोपेचे सोंग घेतलेले आहे अशा माणसाला जागे करता येत नाही. आज सभागृहातील कामकाज बंद पाडायचे हे सन्माननीय सदस्यांचे ठरलेलेच होते. असे प्रकार मी समजू शकतो. माणसाला गंगास्नान आवश्यक असते. आपल्या हिंदू धर्मामध्ये अशी प्रथा आहे की, आपल्या हातून खूप पापे घडली की, गंगेमध्ये जाऊन स्नान करायचे. मला असे वाटते की, आजचे आपले हे गंगास्नान आहे. आपण समाजासाठी खूप काही करुन ठेवलेले आहे. आपले विचार, आपले वक्तव्य, आपले निर्णय यामधून मागच्या काळात आपण एवढे काही प्रचंड करुन ठेवलेले आहे की त्यातून उतराई होण्यासाठी काही करावे हा शुध्द हेतू या पाठीमागे असला पाहिजे. या निमित्ताने आमच्यामध्ये काही अंतर वाढविता आले किंवा भांडणे लावता आली तर तसे करुन बघण्याचा प्रयत्न झाला. परंतु तेही जमलेले नाही... आम्ही तुमच्या नशिबाला आहोतच, त्याला मी तरी काय करणार ? आपण सर्व प्रयत्न करुन थकलात. शेवटचा प्रयत्न हा राजकीय हेतूने प्रेरीत होऊन केलेला असून आपण या सदनाचा वेळ घेतलेला आहे. माझ्यावर आरोप करण्यात आले. त्याबाबत तयारी करावी लागते. आपणा सारखा स्वच्छ कारभार करणे शक्य होणार नाही. आपल्या वक्तृत्वाला कर्तृत्वाची जोड आहे. जे काम आपण हाती घेतले, ज्या संस्था आपण काढल्या त्यांना पुरस्कार प्रदान झालेले आहेत. आपण काढलेल्या साखर कारखान्याला ॲवार्ड मिळालेले आहे. आम्ही आमच्या मांजरा कारखान्याला अवॉर्ड घेऊन थकलो म्हणून तुमच्या कारखान्याला यंदा अवॉर्ड देऊन टाका, असे सांगितले. मांजरा चॅरिटेबल ट्रस्टने जमीन का घेतली, अवॉर्ड का घेतले अशा प्रकारचे प्रश्न आपण विचारु शकता...(अडथळा)... मी क्वचितच टी.व्ही. बघतो. पण तुम्ही त्या चॅनलचे प्राईम टाईम झालेले आहात. खुर्चीमध्ये निवांत बसून आपले जे निवेदन चाललेले असते ते आम्ही बघतो. हे फार चांगले आहे. टीव्हीवाल्यांना देखील दुसरे काही दाखविण्याची गरज नाही. मी हे सांगू इच्छितो की, ज्या ज्या संस्था त्यांनी निर्माण केलेल्या आहेत त्यांचा कारभार अतिशय उत्तम चाललेला आहे. काही वेळा अडचणी आल्या तरी त्यांचे कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा अजोड असा संगम बघायला मिळतो... आजच्या घडीला साखरेला भाव नाही. भाव कधी पडणार आणि भाव कधी चांगला येणार हे तुम्हाला चांगले माहीत आहे. आम्हाला ते जमत नाही.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख...

सभापती महोदय, वक्फ बोर्डाचा कारभार पारदर्शक असला पाहिजे याबद्दल कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. हजारो एकर जमीन अतिक्रमणामध्ये गुंतलेली आहे. या सर्व बाबतीत कमिटीचा जो काही अहवाल आहे त्या संदर्भात चर्चा, निर्णय आणि ॲक्शन या तीन गोष्टी व्हाव्यात अशी त्यांची अपेक्षा आहे. काद्री कमिटीने सी.आय.डी. चौकशीची शिफारस केली त्यावेळी आपण सी.बी.आय. चौकशी सांगितली. सभापती महोदय, या विषयाला खरोखर न्याय द्यावयाचा असेल तर तो न्याय कोण देऊ शकतो हे आपण मला सांगावे. कारण हे प्रकरण जरी सी.बी.आय.कडे दिले तरी हा विषय सिव्हिल मॅटरचा आहे. जमिनीचा ताबा, 7/12 उतारा, ताबा घेण्याचा निर्णय इत्यादी सर्व गोष्टी ह्या सिव्हिल मॅटरच्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी सी.बी.आय.कडे जरी सोपविली तरी ते याबाबतीत फार काही शोधून काढतील असे वाटत नाही. वक्फ बोर्डाच्या किती जमिनी आहेत, किती जमिनी प्रत्यक्षपणे ताब्यात आहेत, किती जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे, यासंदर्भात ज्याला सिव्हिल मॅटरचा चांगला अभ्यास असेल अशा एखाद्या निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी व्हायला पाहिजे. प्रत्येक जिल्हयामध्ये जाऊन लोकांची निवेदने घेणे, कोणाच्या ताब्यात किती जमीन आहे, लिज केव्हा संपणार आहे इत्यादी चौकशी झाली नाही तर त्या चौकशीला काही अर्थ राहाणार नाही. काद्री कमिटीच्या कक्षेमध्ये ज्या काही गोष्टी येतात त्या प्रकरणी त्यानी सी.आय.डी. चौकशीची शिफारस केली. परंतु काद्री कमिटीच्या कक्षेत न येणा-या अशा अनेक जमिनी आहेत.

.....नंतर कु.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख.......

अशी जमीन कोणती व कुठे आहे ? काद्री कमिटीला जेवढया तक्रारी केल्या होत्या तेवढयापुरतेच काद्री कमिटीच्या अहवालामध्ये कारवाई करण्यात आल्याचे दाखविण्यात आलेले आहे आणि तेवढेच निर्णय घेण्यात आल्याचे दिसून येत आहे. वर्क प्लॅनच्या बाबतीमध्ये जर आपल्याला कोणते निर्णय घ्यावयाचे असतील तर मला असे वाटते की, यामध्ये चौकशीसाठी एखादा जज् नियुक्त करावा लागेल. यासंदर्भामध्ये चौकशी आयोगामध्ये किंवा समितीमध्ये रिटायर्ड डिस्ट्रिक्ट जज् किंवा हाय कोर्टातील जज् नियुक्त करण्यात आला तर ते या सिव्हील मॅटरमधील निर्णय अतिशय चांगल्या प्रकारे घेऊ शकतील. शेवटी मलाही या प्रश्नाला न्याय द्यावयाचा आहे आणि तुम्हालाही न्याय द्यावयाचा आहे म्हणजे आम्हाला असे वाटते की, हे किती व्यवस्थित असू शकते जिल्हया-जिल्हयाच्या ठिकाणी मराठवाडयामध्ये किती जमिनी होत्या त्यातील किती जमिनींवर अतिक्रमण करण्यात आले आहे ? आणि किती जमिनींची खरेदी विक्रीची नोंद झालेली आहे याबाबतची आकडेवारी आहे या ज्यूडिशियल कमिशन मार्फत आपण येत्या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये देण्याची विनंती करु किंवा सहा महिन्यांनंतर अहवाल यासंदर्भात अहवाल घेऊ. या अहवालात जर कोणी दोषी आढळला तर कोणालाही पाठीशी घालण्याची या सरकारची भूमिका नाही. या संदर्भामध्ये आमच्या कोणाच्याही मनामध्ये शंका नाही. शासनाच्या हातून काही चुका घडल्या असतील किंवा शासनातर्फे चूकीचे निर्णय घेण्यात आले असतील तर त्याबाबतची शिक्षा आयुक्तांमार्फत सुचविली ती शिक्षा सुध्दा स्वीकारण्याची आमची तयारी आहे. माझी या सदनाला विनंती आहे की, यासंदर्भातील आरोप सातत्याने माझ्या भोवती फिरविण्याचा जो काही प्रयत्न होत आहे त्याच्यामध्ये कसल्याही प्रकारचे तथ्य नाही ही सगळी बाब कायदेशीरपणे तपासूनच निर्णय झालेले आहेत. केवळ या विषयाबाबत राजकीय वातावरण तयार करुन आणि राजकीय हेतूने प्रेरित होऊन अशा प्रकारचे आरोप करणे अतिशय गैर आहे, असे मला वाटते. या ठिकाणी यासंदर्भात काही संस्थामार्फत विधायक अशा प्रकारचा खुलासा करावायाला हवा होता म्हणून माझी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि दिवाकर रावते यांना विनंती राहील की, यासंदर्भातील चौकशी करण्यासाठी ज्यूडिशियल कमिशन नेमले तर त्यातून काहीतरी मार्ग निघू शकेल. परंतु सी.बी.आय चौकशीमधून या प्रकरणामध्ये काहीही साध्य होणार नाही, कारण सी.बी.आय.मध्ये या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .........

प्रकरणासारख्या सिव्हील मॅटर्सची चौकशी करण्याकरिता कोणीही एक्स्पर्टाईज असतील असे मला वाटत नाही. यासंदर्भामध्ये राज्यसरकारची पूर्णपणे चौकशी करण्याची तयारी आहे. बोर्डाच्या वतीने गरीब व होतकरु लोकांसाठी या जागा देण्यात आल्या पाहिजेत म्हणजे वसतिगृह चालविण्याकरिता, शाळा किंवा इतर समाजोपयोगी कामांकरिता या जागांचा वापर करण्यात आला पाहिजे, यासंदर्भात राज्यसरकार या जागांचा वापर समाजोपयोगी कामांकरिताच करण्यासाठी पूर्णपणे तयार आहे.

-----------

.........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे या जमिनीसंबंधीची रजिस्ट्री आहे परंतु त्या जमिनीच्या 7/12 च्या उताऱ्यावर ईनामी जमीन असा उल्लेख नाही. परंतु माझ्याकडे यासंबंधीचा पुरावा असून त्यामध्ये ही जमीन ईनामी असल्याची नोंद 7/12 च्या उताऱ्यावर आहे, तो पुरावा मी आपल्याकडे पाठवित आहे. तसेच या सभागृहामध्ये माझ्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी जे गौरवोद्‌गार काढले त्यामुळे मी अतिशय भारावून गेलेलो आहे. माझ्याकडे आता बोलण्यासाठी शब्द देखील सापडत नाहीत. खरे म्हणजे मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाच्या संदर्भात चौकशी करण्याबाबत सांगत असतांना निवृत्त हाय कोर्ट न्यायाधीशांमार्फत ही चौकशी करण्यात येईल. या प्रकरणाच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक करण्यास आमची काही हरकत नाही, आम्ही ते स्वीकारतो. कारण या प्रकरणाची चौकशी तर झालीच पाहिजे व यामध्ये जमिनींबाबत जो काही गैरव्यवहार आहे तो उघडकीला येऊन सदर जमिनी गरीब व होतकरु जनतेच्या विकासाकरिता वापरल्या पाहिजेत, या मताचे आम्ही देखील आहोत. ज्या ज्यूडिशियल कमिशन मार्फत ही चौकशी करण्यात येईल त्या कमिशनच्या अहवालाचा कालावधी निश्चित करतांना तो सहा महिन्यांऐवजी एक वर्षाचा केला तर अधिक बरे होईल.

श्री.आर.आर.पाटील : नाही नाही, हा कालावधी सहा महिन्यांचाच राहिला पाहिजे.

श्री.विलासराव देशमुख : सहा महिन्यात जर अहवाल आला नाही तर आम्ही त्यांना सहा महिने आणखी वाढवून देऊ.

श्री.नितीन गडकरी : या अहवालामध्ये वर्तमान वक्फ बोर्डाच्या गैरकारभारासंबंधी चौकशी करणा-या अधिका-यांनीच जर काही गैरव्यवहार केला तर त्यांच्यावर क्रिमिनल केसेस दाखल करण्याची परवानगी देण्याचे आश्वासनही आपण आता या सदनामध्ये द्यावे.

श्री.विलासराव देशमुख : माझ्या भाषणामध्ये यासंदर्भात क्रिमिनल केसेस दाखल करण्याच्या संदर्भात देखील मी बोललो होतो परंतु आपण इतके भारावून गेले होतात की हे माझे शब्द आपल्या कानांवर पडलेच नाहीत.

यानंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 18:00

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्री बरेच अस्वस्थ झालेले आहेत....

**सभापती** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब या विषयावर जवळजवळ दीड तास बोलले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांचे या चर्चेवरील उत्तर झालेले आहे तेव्हा ही चर्चा आपण येथे संपवू.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री माझ्याबद्दल 10-12 मिनिटे बोलले आहेत...

**सभापती** : आपल्याबद्दल ते अत्यंत चांगूलपणाने बोलले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या चांगूलपणाची परतफेड मला करु द्या. याठिकाणी सन्माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष वारंवार मला सांगत आहेत की, माझ्यामागे मोठे नेते आहेत ते कोण आहेत हे मात्र श्री. अनिस अहमद यांनी सभागृहात सांगितलेले नाही ......

**सभापती** : आता ही चर्चा येथे संपलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला खुलासा करावयाचा आहे....

**सभापती** : या विषयावरील चर्चा संपलेली आहे.

---------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पृ.शी./मु.शी.</u> :** सभापती तालिका नामनिर्देशित करणे.

**सभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1. श्री. उल्हास पवार
2. श्रीमती उषाताई दराडे
3. श्री. रामनाथ मोते
4. ॲड. अनिल परब

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपल्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांनी करावयाची घोषणा.

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 18 जुलै, 2007 रोजी दुपारी 12.00 वा. पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 1 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 18 जुलै, 2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही